म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ११५८०

REFBK-0009758

# ताटी उघडा ज्ञानेश्वरा



स. कृ. जोशी

मनोहर ग्रंथमाला प्रकाशन ९६ वें

# ताटी उघडा ज्ञानेश्वरा

: लेखक :

स. कृ. जोशी

REFBK-0009758

किंमत २ रुपये

प्रकाशक :
मनोहर महादेव केळकर
मनोहर ग्रंथमाला,
१६०९ सदाशिव पेठ, पुणें २.

प्रसिद्धी दिनांक :
८ डिसेंबर १९५८
श्रीज्ञानेश्वरपुण्यतिथी
कार्तिक वद्य १२, शके १८८०

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

मुद्रक :
द. शं. गांगण
अक्षर मुद्रणालय,
४३८ अ सदाशिव पेठ, पुणें २.

शेवटच्या क्षणापर्यंत ज्ञानेश्वरांविषयीं
ज्यांच्या मनांत उत्कट प्रीति वसत
होती त्या माझ्या प्रेमळ पित्यास
सविनय समर्पण—

परि गीता ईश्वर भोळा । ले व्यासोक्ति कुसुममाळा ।
तरि माझिया दूर्वादळा । ना न म्हणे कीं ॥
आणि क्षीरसिंधूचिया तटा । पाणिया येती गजघटा ।
तेथ काय मुरकुटा । वारिजत असे ॥
पांखकुंटे पाखिरूं । नुडे तरी नभींच स्थिरु ॥
गगन आक्रमी सत्वरु । तो गरुडहि तेथ ॥
राजहंसाचें चालणें । भूतळीं जालिया शहाणें ॥
आणिकें काय कोणें । चालावेंचि ना ॥
जी आपुलेनि अवकाशें । अगाध जल घेये कलशें ॥
चुळीं चूळपणा ऐसें । भरुनि न निघे ॥
दिवटीच्या आंगीं थोरी । तरी ते बहु तेज धरी ॥
वाती आपुलिया परी । आणीच कीं ना ॥
जी समुद्राचेनि पैसें । समुद्रीं आकाश आभासें ॥
थिल्लरीं थिल्लरा ऐसें । बिंबेचि पैं ॥

— ज्ञानदेव

# प्रस्तावना

डोंबिवलीचे तरुण लेखक श्री. स. कृ. जोशी यांच्या ' ताटी उघडा ज्ञानेश्वरा ' या ललित लेखांच्या संग्रहाला प्रस्तावना लिहितांना मला थोडा संकोच वाटत आहे. कारण, ज्या भावनोत्कट वृत्तीनें त्यांनीं ज्ञानदेव, नामदेव, मोरोपंत आणि चोखामेळा यांचीं जीवनें या लेखांत चित्रित केलीं आहेत, ती वृत्ति माझ्या ठिकाणीं नाहीं; व त्याबरोबरच ज्या सगुण भक्तीचा जिव्हाळा त्यांच्या या लेखांतून नुसता ओसंडत आहे, तो भक्तिभावहि माझ्या ठिकाणीं नाहीं. मी मराठी संतकवींचें वाङ्मय आदरानें आणि गोडीनें वाचलेलें असलें, तरी त्या वाङ्मयाशीं समरस होण्याइतकें वेदान्ती किंवा वैराग्यशील मन माझ्यापाशीं नाहीं. त्या दृष्टीनें श्री. जोशी यांच्या या लेख-संग्रहाला प्रस्तावना लिहावयाला मी खरोखरीच अनधिकारी आहें.

तरीसुद्धां रसिकतेचा जो एक समान धर्म आम्हां दोघांत आहे, त्यामुळें त्यांच्या या ललित लेखांना आपण प्रस्तावना लिहिणें एका अर्थानें उचित होईल, अशा विश्वासानें मी हे चार शब्द लिहीत आहें. त्यांचे हे लेख वाचतांना दोन गोष्टी मला विशेष जाणवल्या. पहिली गोष्ट ही कीं, अलिकडील तरुण ललित लेखकांत सहसा न आढळणारा भक्तीचा जिव्हाळा त्यांच्या ठिकाणीं ओतप्रोत आहे; व दुसरी गोष्ट ही कीं, संतांच्या साहित्यांत त्यांच्या मनोजीवनाचें जें प्रतिबिंब पडलेलें आहे, तें सहृदयतेनें आणि कल्पकतेनें आत्मसात् करून त्या जीवनाचें चित्र हुबेहूब उभें करण्याची कलाहि त्यांना साधलेली आहे. महाराष्ट्रांतील पराक्रमी ऐतिहासिक व्यक्तींवर मराठींत विपुल कथात्मक वाङ्मय गेल्या दीडशें वर्षांत निर्माण

झालेलें आहे. पण, आमच्या संतांच्या चरित्राचीं रसाळ आख्यानें जरी महिपतीपासून दासगणूमहाराजांपर्यंत अनेक भाविक कवींनीं लिहिलेलीं असलीं, तरी आधुनिक लेखकांपैकीं कोणीहि रसिकतेनें त्यांच्या जीवनांत शिरण्याचा आणि तें आत्मौपम्यबुद्धीनें उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केलेला निदान माझ्या तरी पहाण्यांत नाहीं. कै. ह. भ. प. ल. रा. पांगारकर यांनीं लिहिलेलीं ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम आणि मोरोपंत यांचीं चरित्रें अतिशयच सुरस आहेत, यांत शंका नाहीं. पण, त्यांनीं हीं चरित्रें ऐतिहासिक दृष्टीनें लिहिलेलीं असल्यामुळें, त्यांत संतांच्या चरित्रांतील महत्त्वाच्या घटनांचें लालित्यपूर्ण चित्रण साहजिकच पहावयाला मिळत नाहीं.

उलट, श्री. जोशी यांनीं 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' या आपल्या पहिल्या प्रबंधांत श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें चरित्र, आधुनिक प्रदीर्घ कथेच्या तंत्रानुसार, इतक्या चटकदार शैलीनें चित्रित केलेलें आहे कीं, तें वाचून त्या श्रेष्ठ संताच्या जीवनांतील सगळा संघर्ष आणि सगळें सौंदर्य सामान्य वाचकाच्या मनावर उत्तम रीतीनें ठसेल. आधुनिक कथेच्या साच्यांत अशा रीतीनें संतचरित्र बसविण्याचा हा बहुधा पहिलाच यशस्वी प्रयत्न असावा. अर्थात् बोलपटांत ज्ञानेश्वराची भूमिका करणाऱ्या नटाचें त्या भूमिकेंतील लोकप्रिय झालेलें चित्र जसें अनेक चिकित्सकांना अवास्तव आणि म्हणून त्याज्य वाटतें, त्याप्रमाणें श्री. जोशी यांनीं गुंफिलेलीं श्रीज्ञानेश्वरमहाराजांची ही चरित्रकथा इतिहासाच्या अभ्यासकांना काल्पनिक आणि म्हणून अप्रशस्त वाटेल, अशी शक्यता आहे. पण ज्यांच्याविषयीं चरित्र-विषयक अशी विस्तृत माहिती मुळींच उपलब्ध नाहीं व त्यामुळें कल्पनाशक्तीच्या सहाय्यानेंच ज्यांचा चरित्राचा पट तयार करावा लागतो, अशा आमच्या संतकवींच्या चरित्रकथा या प्रकारच्या लालित्यपूर्ण शैलीनें लिहिण्यांत कांहीं विशेष हानि आहे असें वाटत नाहीं. नाहीं तरी महिपतीनें जीं संतांचीं चरित्रें रचलेलीं आहेत, तींसुद्धां त्या त्या संतांसंबंधीं त्या काळीं प्रचलित असलेल्या दंतकथांचा उपयोग करूनच रचलेलीं आहेत कीं नाहीं? त्या मानानें, श्री. जोशी

यांनीं, आधुनिक कथेच्या साच्यांत श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें चरित्र बसवितांना, चमत्कारांचा उपयोग तारतम्यानें केला असल्याचें अनुभवाला येतें.

अशा प्रकारच्या वास्तवाला कल्पनेची जोड देऊन लिहिलेल्या कथात्मक चरित्रांतून फक्त एकाच बाबतींत दक्षता घ्यावयाला हवी. ती म्हणजे सत्याचा अपलाप, विपर्यय किंवा विपर्यास न होण्याबद्दल. त्या दृष्टीनें प्रस्तुत लेखसंग्रहांत मला जीं दोन दोषस्थळें आढळलीं, तीं पुढील आवृत्तींतून काढून टाकण्याच्या दृष्टीनें, मी मुद्दाम उल्लेखीत आहें. 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' या प्रबंधांतील 'समाधि' या प्रकरणाच्या पहिल्या परिच्छेदांत "हेंचि दान दे गा देवा" हें अवतरण आहे. हा चरणार्ध श्रीतुकाराममहाराजांच्या अत्यंत लोकप्रिय अभंगांतील असल्यामुळें, श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीच्या वर्णनाच्या ओघांत, तो येण्यांत कालविपर्यय झाला आहे. त्याहिपेक्षां 'बारामतीचीं बोरें' या मोरोपंतांच्या चरित्रावरील सरस लेखांत झालेली ऐतिहासिक घटनांची गल्लत अधिक रसापकर्षक आहे. मोरोपंतांचें देहावसान १७९४ सालीं झालें; व त्या नंतर वर्ष-दीड वर्षानें दुसरा बाजीराव गादीवर आला. अर्थात् श्री. जोशी यांनीं दुसऱ्या बाजीरावाचा मोरोपंतांवर राग झाल्याची जी आख्यायिका आपल्या लेखांत इतकी रंगवून दिलेली आहे, तिला दंतकथेचा असला तरी इतिहासाचा आधार नाहीं, हें उघड आहे. त्यामुळें, एरवीं हा त्यांचा लेख मोठा हृद्य झालेला असतांनासुद्धां, इतिहासाचें अवधान सुटल्यामुळें, त्यांतील बाजीरावाच्या भेटीचें वर्णन वाचून विरस होतो.

श्री. जोशी यांच्या या ललित लेखांचा आणखी एक महत्त्वाचा गुण हा कीं, त्यांनीं संतांच्या चरित्रांतील प्रसंग वर्णन करतांना त्यांच्या स्वतःच्या आणि समकालीनांच्याहि ग्रंथांतील हृदयंगम उतारे जागोजाग दिलेले असल्यामुळें, त्या वर्णनाला जशी वास्तवतेची शोभा आलेली आहे, त्याचप्रमाणें त्या संतांचें हृद्गत तत्कालीन भाषेंत प्रतिबिंबित झालेलें पहाण्याचीहि उत्कृष्ट संधि वाचकांना मिळते.

विशेषतः महिपतीप्रभृति भाविक कवींनीं लिहिलेलीं संतचरित्रें वाचण्याची प्रथा दिवसेंदिवस झपाट्यानें कमी होत चाललेली असल्यामुळें श्री. जोशी यांच्या या ललित लेखांतील उतारे आणि अवतरणें लोकांच्या व्यासंगांतून लोपत चाललेल्या या जुन्या वाङ्मयांतील गोडवा वाचकांच्या निदर्शनाला आणून देण्याच्या कामीं उपयोगी पडतील.

श्री. जोशी यांची भाषाशैली संतांच्या प्रासादिक वाणींतील गोडव्यानें ओथंबलेली असून, त्यांचीं वर्णनें वेधक आणि मधून मधून घातलेलीं सुभाषितें भेदक आहेत. 'अलडिके'सारखे त्यांनीं बनविलेले नवीन शब्द रूढ होण्यासारखे आहेत. त्याचप्रमाणें "पहिला आणि शेवटचा संसारी संन्याशी आपल्या भार्येसह प्रयागक्षेत्रांत कायमचा विसावला" अशा प्रकारचीं ठसकेदार वाक्यें त्यांच्या शैलीच्या रोचकतेंत भर घालतात.

श्री. जोशी यांच्या या लेखसंग्रहामुळें ज्ञानेश्वर, नामदेव, मोरोपंत आणि चोखामेळा या महाराष्ट्रांतील चार थोर कवींचें जीवनदर्शन वाचकांना आधुनिक कथेच्या माध्यमांतून घडेल, हा मी एक लाभ समजतों. या लेखसंग्रहाच्या वाचनानें संतकवींच्या जीवनांतील हृद्यता आणि साहित्यांतील भव्यता यांची ओळख सर्वसामान्य वाचकाला उत्कृष्ट रीतीनें होईल व त्याबरोबरच त्या त्या काळांतील सामाजिक परिस्थितीचेंहि ज्ञान होऊन मराठी मनाचा आणि जीवनाचा विकास कशा रीतीनें होत गेला, याचें मर्म त्याच्या मनावर ठसेल. त्या दृष्टीनें संतचरित्रें लिहिण्याची श्री. जोशी यांची ही अभिनव शैली मला स्वागतार्ह वाटते.

ता. २४-१०-५८<br>'प्रसाद' धनतोली,<br>नागपूर १.

ग. त्र्यं. माडखोलकर

## अनुक्रम

ताटी उघडा ज्ञानेश्वरा ... १
भक्तांचा मुकुटमणी नामदेव ... ४७
बारामतीचीं बोरें ... ६५
निर्मळ मनाचा महार-संत चोखामेळा ... ९२

# ताटी
# उघडा
# ज्ञानेश्वरा



# प्रस्थान : १

मध्यान्हीच्या सूर्याची प्रखरता नि त्याचें तेज बालरवीच्या सौम्य नि कोवळ्या किरणांतच सामावलेलें असतें. लहानशा बीजाचेंच पुढें प्रचंड वृक्षांत रूपांतर होतें. नदीच्या भव्य पात्राचा उद्भव लहानशा ओहोळांतच असतो. प्रचंड अग्नीचा लोळ एखाद्या ठिणगींतच होतो. लहानशा कारणांतूनच एखाद्या मोठ्या गोष्टीचा जन्म होतो. त्या लहान गोष्टीची, त्या लहान उगमाची कोणाला कल्पनाहि नसते. भव्यता दृष्टीस पडली कीं, मगच मन लहान उगमाचा ठावठिकाणा पाहूं लागतें. पैठणजवळच्या आपेगांवच्या, शास्त्रांचें अध्ययन झालेल्या, मूर्तिमंत वैराग्य असलेल्या अशा एका तरुणानें तीर्थयात्रा करीत करीत ज्या क्षणीं इंद्रायणीच्या तीरावर पाऊल टाकलें त्या वेळच्या क्षणाच्या पोटांत भविष्यकाळच्या काय काय गोष्टी सामावल्या होत्या ह्याची दाद प्रत्यक्ष त्यालाहि नसावी.

हा ब्राम्हण आपेगांवहून निघून उत्तरेकडे गेला. तिकडील तीर्थें करीत करीत स्वारी द्वारकेस आली. तेथें कांहीं दिवस राहून गोमतीचें स्नान, श्रीकृष्णमूर्तीचें दर्शन, नंतर सुदामपुरी, मूळमाधव, भालुकातीर्थ, प्रभासपाटण इत्यादि क्षेत्रें पायीं चालत असतां मुखानें त्याचें अखंड नामस्मरण चालू होतें. सरितांचे सुंदर प्रवाह, पर्वतांचे प्रचंड देखावे, सूर्योदय नि सूर्यास्ताची शोभा, अमावास्येचा काळोख नि पौर्णिमेची शुभ्रता पाहात, पाखरांची गोड किलबिल कानीं घेत, ब्रम्हगिरी, कपालेश्वर, त्रिंबकेश्वर, कुशावर्त इत्यादि तीर्थाटनें केल्यावर हा तरुण अलंकापुरीस–आळंदीस–येऊन दाखल झाला.

अलंकापुरी हें पुरातन शिवपीठ आहे. पूर्वीं खूप श्रेष्ठ अशा लोकांनीं येथें तप केलें आहे. प्रत्यक्ष इंद्रानें खालीं येऊन या भूमीवर यज्ञयाग केले आहेत. येथें त्रिवेणी गुप्तरूपानें वसत असते. याच्या

आसमंतात वृक्षवल्लींचीं दाट राई आहे. सकाळच्या वेळीं ह्या दाट राईतून सूर्याचे किरण इंद्रायणींत आपले पाय बुडवीत होते आणि त्याच वेळीं तीर्थयात्रा करून दमला भागलेला हा आपेगांवचा ब्राह्मण अलंकापुरीच्या वेशींतून प्रवेश करीत होता.

गांवांत आल्यावर चक्रतीर्थांत स्नान करून त्यानें आपली संध्या आटोपली. मागें पाहिलें तर अश्वत्थ सळसळत होता. संध्यावंदनादिक कर्मे आटोपल्यावर हा तरुण ह्या झाडाच्या सांवलीखालीं एकाग्र चित्तानें ध्यानस्थ बसला. इतक्यांत त्या गांवचे कुलकर्णी सिधोपंत स्नानाकरतां तेथें आले. स्नान झाल्यानंतर घालावयास लागणारीं आपलीं वस्त्रें ते नेहमींच्या जागेवर ठेवावयास गेले तर हा ध्यानस्थ बसलेला तरुण त्यांच्या दृष्टीस पडला. वाटेंत एखादा हिरा सांपडावा असेंच त्यांना झालें. त्या तरुणाचें तेज हिऱ्याप्रमाणें होतें व तो त्यांना अकस्मात् भेटला होता. त्यांनीं आपलीं वस्त्रें बाजूस ठेवून स्नान आटोपलें तर त्या तरुणाचीहि आराधना तोंपर्यंत संपली होती. सिधोपंतांनीं त्यांना नमस्कार केला व पृच्छा केली,

" आपण कोठून आलां आहांत ? "

" तीर्थयात्रा करीत इथं आलों मी. "

" राहाणार कोठचे आपण ? "

" आपेगांवचा. "

" आपलं नांव ? "

" विठ्ठल म्हणतात मला. "

" मोठं गोड नांव आहे. "

" माझ्या आईनें ठेवलें आहे तें. "

" माझें पूर्वसुकृत उदयास आल्यामुळेंच जणूं आपल्या दर्शनाचा अलभ्य लाभ मला झाला. "

" असं कां बोलतां आपण ? आपण वडील आहांत. आपल्या दर्शनानें मलाहि आनंद झाला आहे. "

" आपले ओळखीचे इथें कोणी आहेत का ? "

" नाहीं. प्रथमच आलों आहें मी इथें "

" आपण राहाणार कोठें मग ? "

" प्रवाशाला प्रस्थान म्हणजे धर्मशाळा. "

" माझ्या पर्णकुटींत आलांत तर आनंद वाटेल मला. "

" इतक्या प्रेमानें आपण या म्हणत असतांना कुठल्या तोंडानें मी नाहीं म्हणूं ? "

सिधोपंत पुढें झाले नि त्यांच्या मागून हा तरुण विठ्ठल त्यांच्या घराच्या दिशेनें पावलें टाकूं लागला. त्या पावलांत नियती एक नवीनच रूप घेत होती. हा तरुण विठ्ठल सिधोपंतानें जेव्हां ध्यानस्थ पाहिला तेव्हां तो त्यांच्या मोठा मनास आला. त्यांना मीनाक्षी नांवाची एक मुलगी होती. तिच्या लग्नाची काळजी त्यांना होतीच. हा तरुण दृष्टीस पडल्यावर आपल्या मुलीला साजेसें ठिकाण सांपडल्याचा त्यांना आनंद झाला. पावलें टाकतांना सिधोपंतांना मुंडावळ्या बांधलेली आपली मुलगी दिसूं लागली. त्यांच्या कानीं सनईचे सूर पडूं लागले. जांवई-लेक आपल्याला नमस्कार करीत आहेत असा भास होऊन त्यांना आशीर्वाद देण्याकरतां त्यांनीं हातहि वर उचलला. विठ्ठलाला मात्र त्याची कांहींच कल्पना नव्हती. तो शांतचित्तानें पावलें टाकीत होता. साऱ्या विश्वाची शांति जणूं त्याच्या हृदयांत वस्ती करून राहिली होती. साऱ्या विश्वाला गीता मराठींत सांगणारा एक बालयोगी आपल्या पावलांच्या गर्तींत लुडबुड करीत आहे याची त्याला जाणीव नव्हती. पुढें जाणारे सिधोपंत आणि मागें चालणारा विठ्ठल यांच्यांत शरीरानें अंतर फार नसलें तरी मनानें मात्र तें कितीतरी योजनें दूर होतें. जवळून चालत असतांहि सिधोपंतांच्या मनांतील खळखळ विठ्ठलाला समजत नव्हती.

इतका वेळ झाला तरी बाबा अजून कां येत नाहींत म्हणून मीनाक्षी दाराच्या उंबरठ्यांत सिधोपंतांची वाट पाहात उभी होती. सिधोपंतांना तिनें फाटकांतून आंत येतांना पाहिलें. आणि त्यांच्या मागून येणारा तो नवखा तरुण जेव्हां तिच्या दृष्टीस पडला तेव्हां

वडिलांना उशीर होण्याचें कारण तिच्या ध्यानांत आलें. आईस सांगण्यासाठीं ती धांवतच आंत गेली. हा नवखा तरुण आपला स्वामी होणार आहे व आपण त्याची गृहिणी होणार आहोंत ह्याची त्या अल्लडिकेला कल्पनाहि नव्हती.

मीनाक्षी स्वयंपाकघरांत पोहोंचली तेव्हां सिधोपंत बैठकीच्या खोलींत आले. तो तरुण बैठकीवर बसला. सिधोपंतांनीं धूतवस्त्रें वाळत घातलीं व आपल्या कन्येस ते हांक मारणार तेवढ्यांत मीनाक्षी घासलेलें स्वच्छ तांब्याभांडें घेऊन बैठकीच्या खोलींत आली. तिच्या हातून तांब्याभांडें घेत ते म्हणाले,

"अग लबाडे, आम्ही येतांना पाहिलंस वाटतं तूं?"

"हें काय हो बाबा, उन्हांतून आलांत म्हणून पाणी आणलं मीं."

"बरं जा, आईला म्हणावें पाहुणे आले आहेत. जेवणाचं झालं म्हणजे कळवा. जरा लवकर बरं का—"

पंचपक्वान्नांचें भोजन झाल्यावर विठ्ठलानें तेथें विश्रांति घेतली. आग्रह फार झाला म्हणून त्यांनीं तेथला मुक्काम वाढविला. तीर्थाटणाच्या श्रमाचा परिहार झाल्यावर सिधोपंतांची परवानगी घेण्याकरतां तो तरुण त्यांना म्हणाला,

"उदईक आम्ही दक्षिणेकडील यात्रेकरतां प्रयाण करणार आहोंत. आपली अनुज्ञा असावी."

"माझी मुलगी—मीनाक्षी—आपण पाहिलीच आहे. आपल्या पदरांत तिला घालावी अशी माझी फार इच्छा आहे. आपल्याला जांवई म्हणून.—"

"मी घरादाराचा त्याग केला. मी अध्ययन केलें. तीर्थयात्रा झाल्या माझ्या. आतां सारं आयुष्य ईश्वराचिंतनांत घालवावं हीच माझी इच्छा आहे. मग ह्या जंजाळांत आपण मला कशाकरतां घालीत आहांत?"

"तुमचें दोघांचें लग्न व्हावें अशी त्या परमेश्वराचीच इच्छा आहे."

" म्हणजे ? "

" काल रात्रीं त्यानें स्वप्नांत येऊन मला सांगितलें तसें. "

" पण मला अजून कांहीं तशी आज्ञा केली नाहीं त्यानें. "

" तुम्हांलाहि तशी आज्ञा करील तो. "

" त्याची आज्ञा झाल्यावर पाहूं मग. "

सिधोपंतांच्या आग्रहास्तव विठ्ठल रात्रीच्या वस्तीपुरता त्या दिवशीं तेथें राहिला.

तरुण विठ्ठलाला त्या रात्रीं स्वप्नदृष्टान्त झाला. ईश्वराच्या मनांतून खरोखरच हा योग जडावा अशी इच्छा आहे ह्याबद्दल विठ्ठलाची खात्री झाली. त्यांनीं सिधोपंतांस होकार दिला व मीनाक्षीचें नामाभिधान रुक्मिणी झालें. सिधोपंतांना विद्वान्, सदाचारी, भगवद्भक्त, कुलशीलवान् जांवई मिळाला म्हणून धन्यता वाटली.

विवाहकार्य आटोपल्यावर विठ्ठलपंत दक्षिणेकडे संचार करीत श्रीशैलमल्लिकार्जुन, निवृत्तिसंगम, अहोबळनारासिंहतीर्थ, वासुदेवतीर्थ, व्यंकटगिरी, गोकर्ण महाबळेश्वर वगैरे पाहात ते पुन्हां आळंदीस आले. आल्यावर ते आपल्या सासऱ्यास म्हणाले,

" घर सोडून मला बरेच दिवस झाले आहेत. वृद्ध मातापित्यांच्या दर्शनाची आतां ओढ लागली आहे—"

" साहजिकच आहे. "

" तेव्हां आपण स्वगृहीं जाण्याची मला परवानगी द्यावी. "

" आम्ही पण आपल्या मातापित्यांना भेटण्याकरतां आपल्याबरोबर येतों. "

" अवश्य चला. आपल्या भेटीनें आनंदच होईल त्यांना. "

विठ्ठलपंत मातापित्यांच्या दर्शनास निघाले. सिधोपंत व्याह्यांच्या भेटीस चालले. पुष्कळ दिवसांनीं आणि तेहि आपला मुलगा सपत्निक आलेला पाहून विठ्ठलपंतांच्या मातापितरांस आनंद झाला. व्याही उराउरीं भेटले. कांहीं दिवस राहून सिधोपंत आपल्या भार्येसह स्वगृहीं निघाले. रुक्मिणीनें डोळे भरून त्यांना निरोप दिला.

कांहीं काल लोटल्यावर विठ्ठलपंतांचे वडील व मातोश्री निधन

पावले. आईवडिलांच्या मृत्यूचा कोवळ्या मनाच्या विठ्ठलपंतांवर प्रखर आघात झाला. अल्पवयांतच त्यांच्या शिरावर प्रपंचाचा सर्व भार पडला. विरक्तवृत्तीनें ते संसार करूं लागले. आपले व्याही सकुटुंब निवर्तल्याची बातमी सिधोपंतास कळतांच त्यांना वाईट वाटलें. ते आपेगांवीं गेले व आपल्या जांवयास नि लेकीस घेऊन आळंदीस आले. सिधोपंतास एकुलत्या एक लेकीशिवाय दुसरें अपत्य नव्हतेंच. विठ्ठलपंतांना त्यांनीं घरजांवई केलें. विठ्ठलपंतांचे वडील वारले तेव्हां त्यांची जागा सिधोपंतांनीं घेतली व पोटच्या पोराप्रमाणें ते त्यांच्यावर प्रेम करूं लागले.

आळंदीसारख्या क्षेत्राच्या ठिकाणीं विठ्ठलपंतासारख्या व्रतस्थ व ज्ञानसंपन्न पुरुषाचें वैराग्य आणखीनच प्रखर झालें. भगवद्गीता व योगवासिष्ठ या ग्रंथांचे ते अवलोकन करीत. एकदां रात्रीचे ते असेच वाचीत बसले असतां त्यांना वैराग्याचा झटका आला व ते संसार सोडून जावें म्हणून रात्रीचे बाहेर पडूं लागले. बाहेर पडतांना निद्रिस्त अशा सुशील रुक्मिणीबाईच्या खोप्यास त्यांचा पाय लागला. ते तेथेंच उभे राहिले. अशा साध्वी स्त्रीस न कळवितां पळून जाणें बरें नाहीं म्हणून त्यांचा पाय अडखळला. निष्कपटभावानें व ममतेनें जिनें आपली सेवा केली तिला अशा रीतीनें टाकून जाणें हा त्यांना अधर्म वाटला. शेवटीं त्यांनीं तिला उठविलें. रुक्मिणीबाई जाग्या झाल्या. त्यांना काय झालें तें कळेना. त्या म्हणाल्या,

“ बरं का वाटत नाहीं ? कशाला उठविलंत तें ? ”

“ मला सुचत नाहीं ग. ”

“ काय होतंय् ? ”

“ संसारांत मन लागत नाहीं माझं. ”

“ आई-वडिलांचें मरण तुम्ही मनाला किती दिवस लावून घेणार आहांत ? ”

“ मला सारेंच नकोसें वाटूं लागलें आहे. मला संन्यास घेण्यास तूं परवानगी दे. ”

" शिव ! शिव ! आपल्या पोटीं पुत्रसंतान नाहीं म्हणून बाबांनीं तुमच्याशीं माझें लग्न लावलें. निदान मुलीकडून तरी आपलें दार उघडें राहील ही त्यांची आशा—! "

" मी तरी काय करूं ? माझें लक्षच उडून गेलें आहे. "

" संसाराची पुरतीशी मांडामांड होते न होते, तोंच—"

" अग, संसारांत सुख असतें तर राजेलोकांनीं राज्यांचा त्याग करून वनवास कशाला पत्करला असता ? "

" अशा प्रकारें माझा त्याग तुम्हांस करावयाचा होता तर माझ्याशीं लग्न तरी कशाला केलेंत ? "

" सद्‌गुरुप्राप्तीकरितां अन्य देशीं जाण्यास तूं मला अनुमोदन देशील असा मला विश्वास होता—"

" माझ्या पोटीं एखादें संतान झालें असतें आणि मग आपण हा विचार मनांत आणला असतात तर योग्य झालें असतें. पण आतां मी कोणत्या तोंडानें अनुमोदन देऊं ? "

" तुझी इच्छा. "

दिवा विझला. काळरात्र खदखदली. नियती हंसली. शब्द संपले. सारें शांत झालें.

पण ही शांतता क्षणाची होती. " मी गंगेस स्नानास जाऊन येतों " असें विठ्ठलपंतांनीं एक दिवस विचारलें असतां रुक्मिणी-बाई सहजगत्या ' जा ' म्हणाल्या. पिंजऱ्याचें दार उघडें पडलें कीं पोपटानें निसटून जावें तशी पडत्या फळाची आज्ञा घेऊन विठ्ठलपंत खरोखरच गंगास्नानास काशीक्षेत्रीं आले. ती सायंकाळची वेळ मोठी प्रसन्न होती. रामानंदस्वामींच्या मठाला एक प्रकारची रमणीयता आली होती. विठ्ठलपंतांनीं त्यांच्याकडूनच संन्यासदीक्षा घेतली.

विठ्ठलपंतांनीं काशीस जाऊन संन्यास घेतला ही बातमी कर्णोप-कर्णीं रुक्मिणीबाईंच्या कानांवर आली. आपला संसार संपला हें त्या साध्वी स्त्रीनें ओळखून व्रतस्थ आचरण आरंभिलें. उषःकालीं उठून इंद्रायणींत स्नान करावें, मध्याह्न कालापर्यंत अश्वत्थाला प्रदक्षणा

घालाव्यात, मुखानें सतत नामजप करावा, एकवेणी घालावी, एकभुक्त राहावें, लौकिकवार्ता ऐकूं नयेत व बोलूं नयेत, देवाकारणीं देह झिजवावा, ह्याप्रमाणें बारा वर्षे रुक्मिणीबाईनीं उग्र अनुष्ठान केलें. त्या महासतीचें हें अनुष्ठान निष्कामबुद्धीनें चाललें होतें तरी पोटीं संतान नाहीं म्हणून ती दुःखीच होती. संसारसुखाला मुकले यापेक्षां पुत्रप्राप्तीला मुकले याचें तिला पराकाष्ठेचें दुःख झालें. मुक्या मातेची आर्तता तिच्या हृदयांत कोंडून राहिली होती.

नित्याप्रमाणें अश्वत्थाला प्रदक्षणा घालीत असतांना सिद्धेश्वराच्या मंदिरांत विसावलेला एक संन्यासी रुक्मिणीबाईच्या दृष्टीस पडला. प्रदक्षणा घालून झाल्यावर त्यांनीं त्या मुनींना नमस्कार केला. स्वामींनीं प्रसन्न होऊन तिला ' पुत्रवती भव ' असा आशीर्वाद दिला. तो आशीर्वाद ऐकून त्यांच्या हृदयांतील सारी आर्तताच बाहेर आली. त्यांना हुंदका आवरेनासा झाला. स्वामींना काय झालें तें कळेना. बाईच्या कपाळावर कुंकू तर होतें मग आपली काय चूक झाली तें त्यांच्या ध्यानांत येईना. सद्गदित होऊन ते म्हणाले,

" मातोश्री, तुमची मुद्रा अशी एकदम उदास कां झाली ? "

" महाराज, मला क्षमा करा. पण अग्निकुंडांत बीज पेरून त्याचा वृक्ष बनणें कधीं तरी शक्य होईल काय ? "

" आपले पति सुखरूप आहेत ना ? "

" होय स्वामीजी. "

" मग माझ्या आशीर्वादानें आपलें मन उदास कां झालें ? "

" पतीनें संन्यास घेतल्यावर मला पुत्रप्राप्ति होणें कसें बरें संभवनीय आहे ? "

" अरेरे, माझ्या हातून...... "

" नाहीं महाराज, आपल्यासारख्या सत्पुरुषांचा आशीर्वाद मिथ्या होणें कधींहि शक्य नाहीं. ह्या जन्मीं नाहीं तरी निदान पुढील जन्मीं तरी तो निश्चित सफल होईल. "

" मातोश्री, ज्यांनीं तुमच्या पतीस संन्यास दिला असेल त्याला शास्त्रनियमाप्रमाणें प्रायश्चित्त घ्यावेंच लागेल. तरुण वयांत नि त्यांतून

संतान नसलेल्या स्त्रीचा त्याग करून संन्यास घेणारासहि शास्त्रांत मोठाच दंड आहे."

"महाराज, होणार तें तर होऊन गेलें."

"नाहीं, श्रीहरी तुझं कल्याण करील."

ह्या रामानंदस्वामींकडूनच विठ्ठलपंतांना नियतीनें संन्यास देवविला होता व नियतीच्या अघटित लीलेनेंच विठ्ठलपंत गुर्वाज्ञेनें पुन्हां संसारी झाले होते. विठ्ठलपंतांनीं मनापासून पण घाईनें घेतलेला संन्यास नियतीनें शेवटीं त्रिदंडी ठरविला. गांवांतल्या कुटाळ लोकांनीं विठ्ठलपंतांवर प्रच्छन्न टीका चालविली तेव्हां नियती पोट धरून हंसली. ज्ञानसंपन्न आणि वैराग्यशील अशा विठ्ठलपंतांवर लोकांनीं बहिष्कार घातला. बहिष्काराला त्यांना दुसरें ठिकाण सांपडलेंच नाहीं.

विठ्ठलपंत आणि रुक्मिणीबाईंना आळंदी सोडून गांवाबाहेर झोपडींत रहावें लागलें. भिक्षेकरतां ते गांवांत जात त्या वेळेस 'भोगी संन्याशी' म्हणून लोक त्यांचा उपहास करीत. त्यांना कांहीं घरीं भिक्षा मिळे. कांहीं घरीं मिळत नसे. भिक्षा मागून आल्यावर ते अखंड हरिभजन व गीता–भागवतादि ग्रंथांचें अवलोकन करीत. एकदां विठ्ठलपंत म्हणाले,

"रखमे, आपल्याच हातांनीं असं दुःख तूं स्वतःवर कां बरं ओढवून घेतलंस ?"

"कसलं दुःख ?"

"दुःख नाहीं तर काय ? ह्या झोपडींत गांवाबाहेर तुला काय सुख आहे ?"

"माझं सुख तुमच्यापाशीं आहे."

"पतीशिवाय राहणाऱ्या स्त्रिया ह्या जगांत कमी का आहेत ?"

"पुन्हां असें अभद्र बोलूं नका. पति हेंच स्त्रीचं सारसर्वस्व आहे."

"सुखाकरतां पति असेल तर मी असतांना तुझे जे धिंडवडे निघत आहेत ते मी नसतांना कांहीं निघाले नसते. तूं सुखी

झाली असतीस."

"माझ्या हृदयींची आर्तता मी कशी उघड करूं? आपला बाळच तुम्हांला सांगेल तें."

त्या युग्माचे असे संवाद चालत तेव्हां वृक्षवेलींनाहि प्रेमाचें भरतें येई. साध्वी रुक्मिणीबाई तर दुसरी ज्ञानकलाच होती. स्वतः विठ्ठलपंतहि शांतिसागर होते. संकटसमयींसुद्धां मनाची शांतवृत्ति मुळींच ढळूं न देतां तीं उभयतां त्या निर्जन अरण्यांत सुखा-समाधानानें नांदत होतीं.

* * *

# सूर्यबिंब प्रकटलें ! : २

शके ११९५ उजाडलं. विठ्ठलपंत पुजेस बसले होते. रुक्मिणी गंध उगाळीत होती. अगोदरच कांतिमान असलेली ती साध्वी जास्तच तेजस्वी दिसूं लागली होती. तिच्या मनांत विठ्ठलपंतांना कांहींतरी सांगावें असें होतें. पण उर धडधडत होते. शब्द तोंडांतच अडखळत होते. कपाळाला घाम येत होता. हातपाय जड वाटत होते. सांगावें न सांगावें, अशा गोंधळांत गंध उगाळायचें थांबवून ती त्यांच्याकडे पाहूं लागली तेव्हां विठ्ठलपंत हंसत हंसत तिला म्हणाले,

"रुक्मिणी, माझा अजून परकेपणा वाटतो काय तुला ?"

"कांहींतरीच काय बोलणं तें."

"मग मन उघडं करायला इतकी भितेस कां ?"

२४३५७ ११२८० 31-1-71

" कुणी सांगितलं ? "

" तुझ्या डोळ्यांनीं. "

" काय ? "

" तुझ्या मनांत मला कांहींतरी सांगायचं आहे. खरं ना ? "

" होय. "

" सांग ना मग—"

" रामानंदस्वामींचा आशीर्वाद खरा ठरला. "

" श्रीहरी; श्रीहरी ! "

माघ वद्य १ स प्रात:काळीं रुक्मिणीबाईनीं एका तेजस्वी अर्भकास जन्म दिला. वडील निवृत्तिपर म्हणून मुलाचें नांव निवृत्ति ठेवलें. निवृत्तीला डोळे भरून पाहिलें तेव्हां रुक्मिणीबाईना धन्य वाटलें. त्याच्या पाठीवर तीळ होता. येतांना मग तो एकटा कसा येणार ? शके ११९७ च्या मध्यरात्रीं श्रावणाचा पाऊस वेड्यासारखा कोसळत होता. घरोघरीं कृष्णजन्म साजरा होत होता. आकाशांत विजा कडाडत होत्या. इंद्रायणीचें पाणी फेसाळत वेगानें वहात होतें. मधेंच ढगांचा गडगडाट होई. वाऱ्यानें तर थैमान घातलें होतें. इंद्रायणीच्या तीरावर सिद्धबेटाच्या त्या झोपडींत विठ्ठलपंत दोन वर्षांच्या निवृत्तीस मांडीवर घेऊन बसले होते. त्या झोपडीपाशीं वीज सारखी लखलखत होती. निवृत्तीचा भाऊ त्या विजेंतूनच जणूं आईच्या पोटीं शिरून जन्म घेत होता. प्रसूतिवेदनेनें रुक्मिणीबाई व्याकूळ झाली होती. विठ्ठलपंतांचें नामस्मरण अखंड चालू होतें. ज्या वेळेला अर्जुनाला गीता सांगणारा श्रीकृष्ण जन्मला त्याच वेळेला पुढें जगाला चकित करून सोडणारा, गीताभाष्य सांगणारा लहानसा जीव त्या झोपडींत अवतीर्ण झाला. तो बालक जन्मला आणि सारा निसर्ग शांत झाला. गडगडणें थांबलें. विजांचें नृत्य थांबलें. पाऊस बंद पडला. इंद्रायणी शांतपणें वाहूं लागली. सारा निसर्ग शांत झाला. तो जणूं त्याच्या भीतीनें ! बालपणांतच पंचमहाभूतावर वर्चस्व गाजविणारा हा युगपुरुष म्हणजेच आपला ज्ञानदेव. ज्ञानाचा

देव. ज्ञानाचा ईश्वर. त्याच्या रूपानें ह्या पृथ्वीतलावर मूर्तिमंत ज्ञानच जन्माला आलें जणूं! श्रावणाच्या कृष्णपक्षांत हें ज्ञानाचं पूर्णबिंब उदयाला आलें. पुढें दोन वर्षांनीं सोपान झाले. आणि तीन भावांना दिवाळींत ओवाळायला बहीण हवी म्हणून मुक्ताईनें दोन वर्षांनीं धांव घेतली. हे चार जन्म म्हणजे पृथ्वीवरच्या सूर्याला स्पर्धा करणारे प्रतिसूर्यच जन्मले असें म्हणावयास पाहिजे.

एका तपापूर्वीं यतिश्रेष्ठांनीं दिलेला आशीर्वाद खरा झाला. साध्वी रुक्मिणीबाई तर हर्षानें वेडी झाली. भाव तेथें देव असतो. आपल्या मुलांतच तिनें ईश्वर पाहिला व त्यांचें संगोपन ती मनोभावें करूं लागली. सकाळपासून संध्याकाळचा तिचा वेळ नकळत जाऊं लागला. दिवसाचे तास तिला अपुरे वाटूं लागले. मुलें झोपल्यावरच त्या मातेला थोडी विश्रांति मिळे. आपल्या प्रेमानें ती मुलें वाढवीत होती, पोशीत होती. विश्वाची आर्तता, गाईचें वात्सल्य, पक्षांचें ऋजुत्व, कासवीची स्नेहदृष्टि, मातेची ममता हें सारें एकवटून ती मुलांना जपत होती, मोठी करीत होती. उत्तरोत्तर वाढत्या कलेच्या शुक्लेंदुप्रमाणें हीं चार भावंडें अरण्यवासांतील सौख्यांत राजेशाही थाटानें वाढूं लागलीं.

गांवानें बहिष्कृत केल्यामुळें हीं भावंडें गांवांत जात नसत. तीं आपापसांत झोपडीभोंवतीं खेळत. थट्टा-विनोद करीत. धार्मिक ग्रंथ वाचीत. वडिलांच्या हाताखालीं त्यांचें शिक्षण उत्तम प्रकारें चाललें होतें. रात्रीच्या वेळीं आईवडील एका बाजूला होत व त्यांच्याशीं हीं चिमुरडीं पोरें परमार्थाच्या गोष्टीवर वादविवाद करीत. त्यांची वृत्ति लहानपणापासूनच वैराग्याला पोषक होती. तीं कधीं नदीवर गेलीं तर त्यांचा उपहास होई. लोकांनीं केलेला नित्य छळ, निंदा, कुत्सित बोलणें, हें तर त्यांच्या अंगवळणीं पडलें होतें. पण लोकांना त्यांनीं कधीं दुरुत्तरें केलीं नाहींत. जनताजनार्दन त्यांनीं आपला मानला होता. एखाद्या कर्मठ ब्राह्मणाचा दगड अंगावर आलाच तर त्याची फेड नमस्कारांनीं होई. शांतिसागरांत एखाद्या खड्यानें ती अशी काय मोठी लाट उसळणार होती? विशेष

म्हणजे मुलांनीं खाल्लेले दगड आईबापांच्या कानावर कधींच गेले नाहींत.

निवृत्ति सात वर्षांचा झाला. ज्ञानाला पांचवं वर्ष लागलं. मुलांच्या आतां मुंजी व्हायला हव्यात. म्हणून रुक्मिणीबाईंनीं विठ्ठलपंतांना सुचविलें. त्यांनाहि तें दिसतच होतें. परंतु समाजानें त्यांना जातिबहिष्कृत केलें होतें. जातिबहिष्कृत करण्याइतकी दुसरी जबर शिक्षा त्यावेळेस समाज देऊं शकत नव्हता. सर्व दंडांत तो असह्य दंड होता. जिवंतपणीं त्या यमयातना होत्या. त्या भोगणें हें सोपें काम नव्हतें. येरा गबाळाचें तें काम नव्हतें. विठ्ठलपंतांसारखा सात्विक, धार्मिक, तपस्वी, तेजस्वी, आणि सोशिक माणूसच तें भोगूं जाणें. त्यांनीं तें सारें निमूटपणें भोगलें. पण मुलांकरतां मात्र त्यांचा जीव तुटत होता. मुलांचे व्रतबंध कसे करावेत म्हणून त्यांना काळजी उत्पन्न झाली. संन्यास घेतल्यावर पुनः गृहस्थाश्रमांत आल्याचें तें पहिलेंच उदाहरण होतें. संन्याशाच्या मुलांच्या मुंजी होतील असा निर्णय त्यांच्या बाजूनें होणें कठीण होतें. विठ्ठलपंतांना याची पूर्ण कल्पना होती. पण एका शब्दानें याची जाणीव त्यांनीं कधीं रुक्मिणीबाईंना दिली नाहीं. भिक्षा मागण्याच्या झोळींतच त्यांनीं अपमान झांकले आणि एका सकाळीं भिक्षेच्या ऐवजीं " माझ्या मुलांच्या मुंजी करण्यास परवानगी द्या, " अशी भीक मागण्यासाठीं ते श्रेष्ठ ब्राह्मणांच्या दारीं दाखल झाले. विठ्ठलपंता, किती सोसशील तूं हें !

विठ्ठलपंतांनीं खूप खटपट केली पण त्या काळीं ब्राह्मणांनाहि धर्माज्ञेविरुद्ध निकाल देणें शक्य नव्हतें. अनेक ग्रंथ पाहूनहि त्यांना संन्याशाच्या मुलांना मुंजीची परवानगी द्यावयास शास्त्राधार सांपडला नाहीं. " तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते " याप्रमाणें लोक वागले. लोकांनाहि दोष देतां येत नव्हता आणि केवळ गुर्वाज्ञेनें विठ्ठलपंत संसारांत पडले होते म्हणून त्यांनाहि दोष देतां येत नव्हता.

पुत्रप्रेमानें डोळ्यांत पाणी आणून त्या विरागी पुरुषानें असहायतेनें त्या ब्राह्मणसमाजास अखेरचा प्रश्न विचारला,

" सुजनहो, माझ्या मुलांच्या मुंजी मग होणारच नाहींत का ? "

" नाहीं. विठ्ठलपंत, आमचा नाइलाज आहे. परंतु संन्याशाच्या मुलांच्या मुंजी होणें शक्य नाहीं. "

" माझ्या अपराधाबद्दल माझ्या मुलांना शिक्षा कां ? "

" तीं तुमचीं मुलं म्हणून. तुमच्या पोटीं जन्मलीं म्हणून. "

" माझ्या अपराधाबद्दल मला शिक्षा करा. पण माझ्या पोटीं तीं जन्माला आलीं म्हणून त्यांना अपराधी मानूं नका. निष्पाप मुलं आहेत तीं. देव्हाऱ्यांत जावें कीं प्रेतावर पडावें हें फुलांच्याप्रमाणें त्यांच्याहि हातांत नाहीं. "

" त्यांचा अपराध नसला तरी पूर्वप्राक्तन म्हणून त्यांनीं भोगलें पाहिजे तें. "

" माझ्या अपराधाची शिक्षा मला सांगा नि माझ्या मुलांना पावन करून द्या— "

" तुमच्या अपराधाची शिक्षा म्हणजे देहान्त प्रायश्चित्त. "

" आपल्या आज्ञेप्रमाणें मी प्रायश्चित्त घेईन पण धर्मशास्त्र शोधून माझ्या मुलांना मात्र आपण न्याय द्या. "

डोळ्यांत पाणी आणून त्या विरागी माणसानं ब्राह्मणसमाजापुढें लोटांगण घातलं.

ब्राह्मणांचा हा निर्णय विठ्ठलपंतांनीं मान्य केला. प्रयागक्षेत्रीं भार्येसह शांतमनानें गंगायमुनांच्या ओघांत त्यांनीं आपल्या देहाचें विसर्जन केलें. पतीच्या मागून ती महासाध्वीहि गेली. मुलांची माया तिनें आड येऊं दिली नाहीं. ती विश्वाची माता झाली. ती विश्वरूप झाली. पहिला आणि शेवटचा संसारी संन्याशी आपल्या भार्येसह प्रयागक्षेत्रांत कायमचा विसांवला आणि आधींच पवित्र असलेल्या त्या प्रयाग तीर्थाचें पावित्र्य त्यांनीं आणखीनच पुनीत केलें. कर्तव्याकरतां कठोरपणें त्यांनीं जलसमाधि घेतली. आपेगांवचा हा तरुण यात्रा करीत हिंडत असतां आळंदी क्षेत्रीं इंद्रायणीच्या तीरीं त्याला पाऊल टाकायला लावून नियतीनें आपली कामगिरी चोख बजावली होती.

निवृत्ति ज्ञानदेव पोरके झाले. वडिलांची भिक्षेची झोळी त्यांनीं आपली मानली. ज्या दारांत उभे राहून विठ्ठलपंत भीक मागत होते त्याच दारांत उभा राहून हा बाल ज्ञानदेव आपल्या भावांकरितां भिक्षा मागून आणीत होता. एक महान् तेजस्वी दीप विझला होता. पण जातांना त्यानें आपल्याहूनहि तेजस्वी अशा चार पणत्या लावल्या होत्या. धर्माच्या पालनाकरितां पोटच्या मुलांचीहि माया आड येऊं न देणाऱ्या ह्या करुणाजनक प्रसंगाला विश्वाच्या इतिहासांत तोड सांपडणार नाहीं. आणि इतका करुणजनक प्रसंग घडल्यावरहि मुलांच्या मुंजी झाल्या नाहीं त्या नाहींच.

बापानें मागितलेल्या न्यायाला चालना देण्यासाठीं आतां हीं चिमुरडीं पोरंहि पुढें सरसावलीं. त्यावेळीं निवृत्ति दहा वर्षांचा आणि ज्ञाना आठ वर्षांचा होता. हीं दोन मुलें जेव्हां ब्राह्मणसमाजासमोर आलीं तेव्हां कित्येक विद्वानांचे डोळे दिपून गेले व कांहींनीं भक्तिभावानें त्यांना हात जोडले. उडदामाजी कांहीं काळें असणारच. त्यांच्या जिभांना शस्त्राची धार आली होती. ज्ञानदेव म्हणाले,

" विप्रश्रेष्ठहो, आपल्या आज्ञेप्रमाणें आमच्या वडिलांनीं प्रायश्चित्त घेतलें आहे. आतां आपण आमच्या मौंजिबंधनास परवानगी द्यावी. "

" आम्हांला आपली दया येते, पण शास्त्राप्रमाणें आम्हांला तशी परवानगी देतां येत नाहीं. फार वाईट वाटतें आम्हांला. "

ब्राह्मणसमाजांतून आणखी एका पंडिताचा आवाज उठला,

" मुलांनो, आपले वडील स्खलनशील होते... "

" स्त्रीनें परपुरुषाच्या गृहांत अल्प काळहि असणें हा गुन्हा आहे. पण हा न्याय सीतेसारख्या महासतीलाहि लागू व्हावा काय ? "

ज्ञानदेवाच्या भाषणापुढेंच निवृत्ति म्हणाला,

" शिवाय आमच्या वडिलांनाहि संसाराची इच्छा पुन्हां झाली म्हणून नव्हे तर केवळ गुर्वाज्ञेनें त्यांनीं संसारांत पाऊल टाकलें हें आपणांस

माहीत आहेच. त्यांचा नाइलाज झाला..."

" त्यांचा नाइलाज तर मग आमचाहि नाइलाज होत आहे."

" पण आमच्या वडिलांनीं आपण सांगितलेलें प्रायश्चित्त घेतलें आहे."

कांहीं झालें तरी तुम्हांस पवित्र करून घेण्यास शास्त्रांत कोठेंच आधार मिळत नाहीं."

" ब्रह्मवृंद, शास्त्रांत जर आम्हांला प्रायश्चित्त नाहीं तर मग आमची वाट काय? आम्हीं कोणता मार्ग स्वीकारावा हें आम्हांस आपण कृपा करून सांगा."

त्या लहान अर्भकांची ती करुण वाणी ऐकून श्रोतृवृंद सद्गदित झाला. त्यांच्या डोळ्यांतून पाणी वाहूं लागलें. श्रेष्ठ आचार्य म्हणाले,

" मुलांनो, आमच्यापेक्षांहि श्रेष्ठ असे ब्राह्मण पैठणक्षेत्रांत आहेत. त्यांचा अधिकार मोठा! ते विद्वान् आहेत, मान्यवर आहेत. तेथें जाऊन तुम्ही त्यांचें प्रशस्तिपत्र घेऊन या, म्हणजे मग आम्ही तुम्हांला पावन करून घेऊं."

निवृत्ति ज्ञानदेवांनीं त्यांच्या पायांवर डोकें ठेविलें व ते आपल्या झोपडीकडे निघाले.

सूर्य डोक्यावर आला होता. तीं पोरें अनवाणी होतीं. अगोदरच उशीर झाला होता. लहानग्या सोपानाजवळच मुक्ता सोपवून हीं भावंडें गेलीं होतीं. निवृत्तीला ज्ञानानें पुढें होण्यास सांगितलें व भिक्षेसाठीं तळपत्या उन्हांत तो दारोदारीं हिंडूं लागला. थोडीशी भिक्षा पदरांत पडल्यावर तो घरच्या दिशेनें निघाला. उन्हानें त्याच्या घशाला कोरड पडली होती. पाय भाजत होते. ज्ञाना इंद्रायणींत उतरला तेव्हां त्याचे पाय थंड झाले. तोंडावरून पाणी फिरवून तो तें थोडेंसें प्यायला तेव्हां त्याला हुशारी वाटली. घराकडे जायला आतां त्यालाहि ओढ लागली होती. पाणी प्यायल्यावर त्यानें आपलीं पावलें झपाझप उचलण्यास सुरुवात केली. निवृत्ति अगोदरच तेथें



पोहोंचला होता. मुंजीची परवानगी ब्राह्मण लोकांना देतां येत नाहीं ही वार्ता त्याच्याकडून त्यांना कळली होतीच. सोपानाला उदास वाटलें व मुक्ता खिन्न झाली. ज्ञानाची वाट पाहात ते दारांत उभे होते. त्यांचा घांस आणण्यासाठीं गेलेला ज्ञाना थोड्याच वेळांत झोपडींत प्रविष्ट झाला.

भूक तर साऱ्यांनाच लागली होती. मुक्ता तांदूळ निवडूं लागली. सोपानानें लांकडें चुलींत घातलीं. निवृत्तीनें पाणी आणलें. ज्ञाना चूल फुंकूं लागला. चौघांच्या मदतीनें चुलीवर भात शिजत पडला. मग तीं सारीं भावंडें एकत्र बसलीं. ज्ञानाचा मुक्तावर फार जीव. तो तिला तिच्या आईच्या ठिकाणीं होता. त्यानें तिला मांडीवर घेतलें. मग निवृत्तीनें सुरुवात केली,

" ज्ञाना, हे ब्राह्मण जर इतके आडमुठे आहेत तर आपण मुंजी झाल्याच पाहिजेत हा हट्ट कां धरावा हें मला तरी कळत नाहीं. मला स्वतःला तर त्याची आवश्यकताहि वाटत नाहीं. "

" निवृत्तिदादा, तूं मोठा आहेस. मी तुला काय सांगावें? पण तूं म्हणतोस तसें असतें तर आपल्या वडिलांनीं तरी तो हट्ट कशाला धरला असता? तूं खरोखरच इतका निवृत्त आहेस कीं, तुझ्या देहाचीहि तुला शुद्ध नाहीं रे. "

" ज्ञाना, आज माझ्या अगदीं मनांतलें बोललास. खरोखरच मी अमक्या देश-कोशाचा नव्हे. माझें कोणीच नाहींत व मी कुणाचाहि नाहीं. मला जन्ममृत्यु नाहीं. मला नामरूप नाहीं. मी एक जुनाट पुरुष आहें. "

" निवृत्ति, तुझी ओळख मला पटली रे. पण लोकांकरतां आपण कुळाचार अवश्य पाळले पाहिजेत. "

" लांब बसलेला सोपाना निवृत्तीजवळ आला व पाठीमागून त्याच्या गळ्यांत आपले दोन्ही हात अडकवीत म्हणाला,

" दादा, आमचें कूळ चांगलें नाहीं असें हे लोक म्हणतात, तर पांडवांचें कूळ तरी कोठें चांगलें होतें? "

" लोकांशीं आपणांस काय करायचें आहे? आपण आपला कुळधर्म अवश्य पाळला पाहिजे. "

सोपाना चिडून म्हणाला,

" ज्ञाना हें तुझें म्हणणें मला पटत नाहीं. आपल्या वडिलांनीं प्रायश्चित्त घेतलें असतांहि ब्राह्मणांनीं आपला छळ मांडावा हें मला अजिबात मान्य नाहीं. "

" सोपाना, लहान वयांत हा तुझा राग तुला शोभूनच दिसतो. पण दुसरे चुकले म्हणून आपण चुकावें व अधर्म आचरावा असें मला मात्र वाटत नाहीं. अविधी आचरण हें परम दूषण आहे हें तर तो प्रत्यक्ष वेदनारायण बोलून गेला आहे. शिवाय आपल्या आईवडिलांचीहि तशी इच्छा नव्हती, व म्हणूनच त्यांनीं प्रायश्चित्त घेतलें. लोकस्थिति मोडूं नये. लोकसंस्था सर्वथा रक्षणीय आहे.

**" कुळीचा कुळधर्म अवश्य पाळावा। सर्वथा न करावा अनाचार ॥ जे धर्मजात आघवे। युगायुगीं म्यां रक्षावें। ऐसा ओघ हा स्वभावे। आद्य असे ॥ "**

" ज्ञानदा मला क्षमा कर. मला खरंच ज्ञान नाहीं. रागानें चिडून मीं लहान तोंडीं मोठाच घास घेतला. "

असें म्हणून भात पाहण्याकरितां सोपान तेथून निघून गेला. तो गेल्यावर ज्ञाना निवृत्तीस म्हणाला,

" निवृत्तिनाथा, तुम्ही पावन झालांहि असाल. पण कुलाचार धर्मशास्त्राप्रमाणें सर्वांनीं पाळलेच पाहिजेत. तुम्हांला असें उदास राहून चालणार नाहीं. देखणाहि अंधाबरोबर चालतो तसा जाणत्यांनीं धर्म आचरून दाखवावा. "

ज्ञानदेवाच्या भाषणाचा निवृत्तीवर फार परिणाम झाला. जेवण झाल्यावर तीं चारी भावंडें पैठणच्या ब्राह्मणांकडून शुद्धि-पत्र आणण्यासाठीं पैठणच्या वाटेला लागलीं.



उंचसखल डोंगरांचे कडे, त्यांच्यावरच्या अनेक वनस्पती, झाडें नि वेली, डोंगरांतून वाहणारे स्वच्छ गार पाण्याचे झरे, हें सारे पाहात, रात्रीची विश्रांति घेत, दिवसभर चालत, ईश्वराचें अखंड नामस्मरण करीत, ही बालगोपाळांची चौकडी पैठणच्या वेशींत आली. गोदावरी तीरावर स्नान आटोपून ते गांवांत शिरले. त्यांच्या वडिलांचे

मामा कृष्णाजीपंत देवकुळे पैठणासच राहात होते. त्यांच्याकडे हीं मुलें आलीं.

चार दिवसांनीं पैठणकर ब्रह्मवृंदांची सभा भरली. तिच्यापुढें निवृत्तिनाथांनीं आळंदीकर ब्राह्मणांचें पत्र ठेवलें व दीन स्वरांत ते म्हणाले,

" आम्ही अनाथ, पतित, शरणागत आहोंत. आम्हांला कृपा करून शुद्ध करून घ्यावें व आमच्या मौंजीबंधनास परवानगी द्यावी. "

त्या सभेंत मोठमोठे वैदिक, शास्त्रज्ञ, श्रुतिस्मृतिशास्त्रांत पारंगत असलेले असे विद्वान् ब्राह्मण होते. संन्याशाचीं मुलें शुद्धिपत्र मिळवण्याकरतां मुद्दाम इथें आलीं आहेत ही बातमी गांवांत पसरतांच शेंकडों ब्राह्मण व ग्रामस्थ त्या ठिकाणीं दाखल झाले. पण पैठणचे ब्राह्मण विद्वान् असले तरी आळंदीच्या ब्राह्मणांपेक्षां ते तरी आणखी काय करणार होते ? अनेक ग्रंथ पालथे घालूनहि त्यांना शास्त्राचा आधार कोठें सांपडेना. शेवटीं सभेच्या मुख्य आचार्यांनीं त्यांना सांगितलें,

" बाबांनो, धर्मग्रंथांत तुम्हांला पावन करून घेण्यास आमच्याकडे कांहींच आधार सांपडत नाहीं. "

आचार्यांच्या तोंडून ते शब्द ऐकतांच निवृत्तीला डोक्यावर वीज कोसळल्यासारखें झालें. बालबुद्धीच्या सोपानाला भान राहिलें नाहीं व तो चटकन् बोलून गेला, " धर्मग्रंथ इतके का असहिष्णु आहेत ? "

विजेच्या कडकडाटासारखा तो प्रश्न साऱ्याच श्रोत्यांना वाटला. प्रश्न बिनतोड होता. कांहींना राग आला तर कांहींना विस्मय वाटला. ज्ञानदेव पुढें म्हणाला,

" माझा भाऊ बालबुद्धीचा आहे. आपण त्याच्याकडे लक्ष देऊं नका. आम्ही काय करावें तें कृपा करून समजावून द्या. "

" बाबांनो, आम्हांलाहि वाईट वाटतें. पण आमचा नाइलाज आहे. तुम्ही सर्व प्राणिमात्रांचे ठायीं आत्मा एकच आहे असें

जाणून भूतदया बाळगा आणि श्रेष्ठ अशा त्या परमेश्वराला शरण जा; तुम्ही मुंज करूं नका; लग्न करूं नका; देह आहे तोंपर्यंत त्या परमेश्वराचेंच सतत चिंतन करा. " ब्राह्मण म्हणाले.

" सर्वांभूतीं परमेश्वर आहे तर तो आम्हांला न्याय कां देणार नाहीं ? " निवृत्ति म्हणाले.

" आम्हांला आपण लग्न करूं नका म्हणून सांगतां पण आम्ही तर त्याची आंस कधीं धरलीच नाहीं. मनोरूप पटावर संसार-चित्र उमटतें पण तो पटच फाटला गेल्यावर संसारचित्र राहील कसें नि कोठें ? सरोवर आटल्यावर प्रतिबिंब कोठलें ? मुळांत मनच गेलें मग काम, क्रोध, अहंभाव यांना आधारच कोठें आहे ! आपण सांगितलेला धर्म कठीण असला तरी तो आम्ही अवश्य पाळूं. निंबाचा कडूपणा मनांत न आणतां आपण औषध म्हणून तो घेतोच कीं नाहीं ? आई कुब्जा असली तरी तिच्याच प्रेमावर आपण वाढतों. पाण्याहून तूप श्रेष्ठ असलें तरी मासा काय तुपांत वाढेल ? म्हणून आम्ही विहित कर्माचेंच अवश्य आचरण करूं. ज्यानें त्यानें आपलें आचरण पाळलें तरच समाज सुखी होईल. परधर्मानेंहि कष्ट चुकत नाहींतच. सरळ रस्त्यानें चालण्यानेंहि पायाला शीण आहे, आडमार्गानें चालण्यांतहि आहे. मग आडमार्ग कां धरावा ? आपली वेदतुल्य वाणी आम्हांला मान्य आहे. " ज्ञानदेव बोलले.

ज्ञानदेवांची प्रज्ञा पाहून व त्यांची अमृतवाणी ऐकून सारेजण गहिंवरून गेले. ज्ञाना, ह्या लहान वयांत तुला इतकें शहाणपण कुठून रे आलें ? पण हें विचारणेंच वेडेपणाचें ! कारण तूं ज्ञानेश्वर म्हणजे ज्ञानाचा ईश्वर आहेस. ज्ञानांचा सागर आहेस तूं !

दुर्जनांची वृत्ति सर्वकाळ सर्वच ठिकाणीं प्रगट होत असते. तीं मुलें जेव्हां परत जाऊं लागलीं तेव्हां कांहीं कुटाळांनीं त्या ज्ञानदाला प्रश्न विचारले.

" तुझें नांव काय रे मुला ? "

" ज्ञानदेव म्हणतात मला. "


" वा रे ज्ञानदेव, आमच्या येथें एका रेड्याचेंहि नांव ज्ञानदेवच आहे बरं का. तो पाहा, तो समोरून येत आहे ना ? त्याचेंच नांव ज्ञानदेव. "

" द्विजश्रेष्ठहो, त्या रेड्यांत व माझ्यांत खरोखरीच कांहीं फरक नाहीं. सर्वांभूति आत्मा एक आहे असें मघाशीं आपल्याच प्राचार्यांनीं सांगितलें नाहीं का ? जसा सूर्य सर्व ठिकाणीं एकच आहे तसाच हा परमात्मा सर्वव्यापी आहे. "

" अहो, ज्ञानाचे राजे, आपणांला मिशी फुटली नसली तरी अक्कल मात्र खूप आलेली दिसत आहे बरं का ! पण बोलेल तो करील काय व गर्जेल तो पडेल काय ! वाणीरहित अशा ह्या रेड्याच्या मुखांतून वेद वदवा बरें ! "

" कांहीं हरकत नाहीं. आपल्या इच्छेनें तो वेदसुद्धां म्हणूं शकेल. "

तो रेडा जवळ आला तेव्हां ज्ञानदेव त्याच्याजवळ गेले व म्हणाले,



" भो महिषराज, आपण एखादा वेदमंत्र म्हणून दाखवून ह्या द्विजश्रेष्ठांची इच्छा पूर्ण करा बरें ! "

ज्ञानदेवांची आज्ञा होतांच त्या रेड्यानें वेदऋचा म्हणण्यास सुरुवात केली. तो अघटित प्रकार पाहाण्यासाठीं माणसांच्या झुंडीच्या झुंडी त्या रेड्याभोंवतीं जमूं लागल्या. स्त्रिया पाण्याला जात होत्या त्या कमरेवरल्या रिकाम्या घागरी तशाच घेऊन त्या दिशेनें धांवल्या. लोकांनीं बाजारहाट, नित्यकर्में टाकलीं व सर्व गांव तो चमत्कार पाहाण्याकरतां धांवला. संन्याशी जसा कधीं संसारी झाला नव्हता तसा लहान मुलानें कधीं रेडाहि बोलविला नव्हता ! सारेंच अघटित होतें. सारेंच विस्मयजनक होतें. साऱ्यांच्या डोळ्यांतून अश्रू येऊं लागले. " धन्य ! धन्य ! ! " ह्या शब्दांची ज्ञानेश्वरांवर वृष्टि झाली. सारे ब्रह्मवृंद त्यांच्या चरणीं लोळण घालूं लागले. ज्ञानेश्वरांना मात्र या प्रकारानें लाजल्यासारखें झालें. " हा पशु बोलता झाला हीसुद्धां तुमचीच कृपा होय " असें ते म्हणाले. ब्राह्मणांकडून शुद्धिपत्र व तो रेडा बरोबर घेऊन ज्ञानदेव निवृत्तिनाथादि चार भावंडें वाटेनें चाललीं असतां त्यांचें नामस्मरण अखंड चालू होतें.

संध्याकाळची वेळ होती. दिवस काळवंडत होता. रातकिड्यांची किरकीर वाढत होती, वटवाघळें चित्कारत होतीं. घुबडें घुत्कार करीत होतीं. अशा कातरवेळीं निवृत्तिनाथांचा डावा डोळा लवलवत होता. प्रवासांत इतकी उदास संध्याकाळ त्यांच्या वांट्याला कधींच आली नव्हती. समोरून ' हे राम, हे राम ' करीत एक प्रेतयात्रा त्यांच्या दिशेनें येत होती. सोपानाला तें पाहून भीति वाटली. मुक्ता ज्ञानदेवाला बिलगली. ज्ञानदेवाला मात्र हंसूं आलें. तो म्हणाला,

" ही तर मनुष्याची सहजस्थिति आहे. जेथून आला त्याच दिशेनें तो जात आहे. घाबरायचें आणि वाईट वाटण्याचें कारणच काय ? "

ज्ञानदेवानें मुक्ताला व निवृत्तीनें सोपानाला कडेवर घेतलें.

तेवढ्यांत एक बाई त्यांच्या पायाशीं वांकली म्हणून ज्ञानदेवांनीं सहजच " सौभाग्यवति भव " असा आशीर्वाद दिला. ज्ञानदेवांनीं काळोखांत निरखून पाहिलें तर त्या स्त्रीनें कपाळाला मळवट भरला होता. तिच्या गळ्यांत–हातांत माळा घातल्या होत्या. ज्याचें प्रेत समोरून येत होतें त्याची ती पत्नी त्याच्यामागें सती जात होती व जातांना तिनें ज्ञानदेवाला नमस्कार केला होता. ज्ञानदेवांना आपली चूक कळली. ते म्हणाले,

" मातोश्री, घाबरूं नका. आपल्या पतीचें नांव सांगा बघूं मला."

" सच्चिदानंद. "

" सत् + चित् + आनंद ? ह्याला मृत्यु आला असें म्हणणें अघटितच आहे ! "

ज्ञानदेव त्या प्रेताजवळ गेले. ईश्वराची त्यानीं मनोमन प्रार्थना केली. " हे देवाधिदेवा, ' सौभाग्यवती भव ' असा आशीर्वाद देण्याची बुद्धि तूं मला कां दिलीस ? तुझ्या प्रेरणेनेंच मी तसा आशीर्वाद दिला. आतां तुझी प्रेरणा खरी ठरूं दे व माझी वाचा सफळ होऊं दे. सच्चिदानंद बाबा, तुम्ही काळझोपेचा त्याग करून माझें म्हणणें जगास खरें करून दाखवा. चला उठा पाहूं ! "

त्या गतभर्तृकेस एका संन्याशाच्या मुलानेंच चुडेदान केलें ! नेवासे गांवाच्या स्मशानांत जाळण्याकरतां नेलेलें प्रेत जिवंत होऊन गांवांत आलें. दुःखानें भजन करीत गेलेले लोक आनंदानें भजन करीत परतले. सारा गांव ह्या बालयोग्याचें दर्शन घेण्यास लुटला. गांवाला उत्सवाचें स्वरूप प्राप्त झालें. लोकांच्या आग्रहास्तव ज्ञानदेव नेवाशाला राहिले व लोकांना गीतेचें तत्त्वज्ञान त्यांनीं मराठींत सांगितलें. पैठणला रेडा बोलण्याचा चमत्कार झाला पण नेवाशाला सांगितलेल्या ज्ञानेश्वरीचा चमत्कार विसाव्या शतकांतल्या विद्वानांनाहि भुलवून टाकण्यास समर्थ ठरला.

* * *

भारत, रामायण, भागवत हे सगळे ग्रंथ संस्कृतांत. मराठी भाषेंत एक ग्रंथ नाहीं. तेव्हां निवृत्ति ज्ञानयाला म्हणाले,

" ज्ञाना, आपण नेवाशांत राहावें अशी लोकांची फार इच्छा आहे. "

" मलाहि असेंच वाटत आहे रे, दादा. हें गांव मोठें रम्य आहे. येथें प्रवरा नदी आहे. छानदार घाट आहे. आदिमायेचें देऊळ आहे. लोकांचेंहि आपल्यावर प्रेम जडलें आहे. पावसाळ्यांत पुढचा प्रवासहि शक्य नाहीं तेव्हां राहूं या आपण इथें. तुला कसें वाटतें ? "

" ठीक, तुझी इच्छा आहे तर राहूं आपण. पण तूं मराठींत गीतेवर टीका कर. लोकांना ज्ञानमार्ग, कर्मयोग समजावून सांग. "

ज्ञानदेवांनीं " होय " म्हटलें. लोक गोळा झाले. नेवाशाच्या देवळांत रोज रात्रीं ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरी सांगूं लागले. पहिल्याच दिवशीं झालें.

**ॐ नमोजी आद्या । वेद्प्रतिपाद्या ॥**
**जैसे शारदीयेचि चंद्रकळे–। माजि अमृतकण कोवळे ।**
**ते वेचिती मन मवाळे । चकोर तलगे ॥**
**तयापरी श्रोतां । अनुभवावी हे कथा**
**अति हळुवारपण चित्ता । आणूनियां**
**जैसे भ्रमर पराग नेती । परी कमळदळे नेणती—**
**तरी न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें**
**करुनि घ्यावें हें तुमतें । विनवित असे.**

जो जो दिवस उगवत होता तो तो ज्ञानेश्वराच्या बुद्धीचा पारिजात फुलवीत होता. ज्ञानेश्वरी पुढें पुढें जात होती. फुलाच्या वासानें भुंगे जमावेत तसेच रोज नवीन नवीन रसिक आणि भाविक श्रोते गर्दी करीत होते. नेवाशाच्या आजूबाजूच्या परिसरांतील लोकहि आतां गर्दी करूं लागले. ज्ञानाचें भांडार खुलें झालें होतें. शब्दांना सुगंध सुटला होता. तत्वज्ञानाला गुळाची चव आली होती. भक्तीला रूप प्राप्त झालें होतें. कृष्णानें मराठींत गीता सांगायला जणुं कुणी निरोप्याच पाठविला होता. पंधरा वर्षांचा एक कोवळा पोर लोकांना गीतामृत पाजीत होता.

संशयापेक्षां दुसरें मोठें पातक नाहीं. तेंच विनाशाचें जाळें ठरतें. संशयाचा नाश फक्त ज्ञानानेंच होतो. असा ज्ञानाचा महिमा ज्ञानदेवानें अगदीं सोप्या भाषेंत चौथ्या अध्यायांत सांगितला. पांचवा अध्याय देहभान हरपूनच श्रोत्यांनीं ऐकला. सहावा अध्याय तर गीतेच्या अर्थाचें सार आहे. त्यांत अष्टांग योगाच्या ऐश्वर्याचें सार आहे. ह्या अध्यायाच्या सुरुवातीलाच ज्ञानदेवांनीं गर्जना केली,

**माझा मराठाचि बोल कौतुकें। परी अमृतातेंहि पैजा जिंके। ऐसी अक्षरें रसिकें। मेळवीन—**

"खरं आहे" अशा अर्थानें श्रोतृवर्ग माना हालवीत होते. ज्ञानदेव सांगत होते,

"जनहो, मी आपणांपुढें आतां असा शब्दसंभार उभा करीन कीं तुमच्या इंद्रियांत भांडणें लागतील. वास्तविक शब्द ग्रहण करणें हा कानांचा विषय ! पण जिव्हेला वाटेल या शब्दांना इतकें माधुर्य आहे कीं त्यांचा स्वाद घेण्याचा हक्क केवळ आपलाच आहे. नाक म्हणेल ही जिभली वेडी तर नाहीं ? ह्या शब्दांचा तर मोठा सुगंध सुटला आहे. मग हा विषय माझाच नाहीं का ? डोळे म्हणतील असलें रूप आम्ही तर कधीं पाहिलेंच नाहीं. आणि शब्दांना कवटाळण्याकरतां तुमचे दोन्ही बाहू याच वेळीं स्फुरण पावतील."

ज्ञानेश्वर बोलत होते आणि श्रोत्यांची स्थिति अक्षरशः तशीच

झाली होती. देवळांतल्या खांबाभिंतींनासुद्धां आपण सजीव होऊन ती अमृतवाणी श्रवण करावी असा मोह झाला असल्यास कांहीं नवल नाहीं.

तत्त्वसार, ज्ञान-अज्ञान ह्यांचीं लक्षणें, गुरुभक्ति, निष्काम कर्मयोग सांगत, भाषेचा विलास दाखवीत, समर्पक दृष्टान्त देत, उपमा, रूपक यांची पेरणी करीत, कल्पनाचातुर्याचें कारंजें उडवीत, उदात्त व उत्तुंग प्रतिभेचा विलास दाखवीत, आणि रसवृत्तीचा उत्कर्ष साधीत ज्ञानदेवांनीं श्रोत्यांना अगदीं देहभान हरपायला लावलें होतें. प्रत्येक अध्याय म्हणजे वरची वरची पायरी होती. सगळेच चांगले दिसल्यावर वाईट निवडून बाजूस कसे काढावे हा श्रोत्यांपुढें प्रश्न पडला होता. त्यांतल्या तत्त्वज्ञानाच्या हिऱ्यांनीं त्यांचे डोळे दिपून गेले होते. त्यांना रोज निरनिराळे भास होत होते. त्यांना कधीं शारदेचा वीणा-झंकार ऐकूं येई, कधीं विजेची दीप्ति दिसे, कधीं फुलांचा सुगंध येई, कधीं कस्तुरीचा परिमळ दरवळे. हे भास होते कीं शब्दांचें सामर्थ्य होतें ? आणि अंगीं इतकें सामर्थ्य असूनहि ज्ञानेश्वर तर श्रोत्यांपुढें अगदीं लीन होते. ते त्यांचे दासाचे दास होते. ते नम्रतेनें सांगत होते कीं "हे माझे बोबडे बोल गोड मानून घ्या." श्रोत्यांना त्यांची नम्र विनवणी होती.

**जैसा स्वभाव मायबापांचा । अपत्य बोले जरी बोबडी वाचा । तरी अधिक तयाचा । संतोष आधी ॥**

**येऱ्हवी तरी मी मूर्ख । जरी जाहला अविवेक । तऱ्ही संतकृपा दीपक । सोज्ज्वळ असे ॥**

**लोहाचे कनक होये । हें सामर्थ्य परिसींच आहे—**

ज्ञानदेवानें परिसाची भूमिका श्रोत्यांकडे ठेवली होती.

ज्ञान आणि विनय यांचा मधुर संगम लोकांनीं त्या बालरूपांत पाहिला होता. पंधरा वर्षांचा एक पोर ज्ञानाचा अमृत-कलश त्यांच्या हातांत देत होता आणि त्यांना अमृत पाजून स्वतः अमर होत होता. ह्या कल्पवृक्षाखालून लोकांना हलावेंसें वाटेनाच. त्यांना वाटत होतें रात्र संपूं नये आणि ही ज्ञानेश्वरीहि संपूं नये. परिणामकारक

वक्तृत्व आणि विलक्षण भाषाप्रभुत्व यांच्या योगानें नेवाशांतली मंडळी वेडावली होती.

बाराव्या अध्यायांत ज्ञानोबांनीं " **ये मऱ्हाठियेचिया नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकाळ करी ।** " असें जाहीर केलें. लोकांना प्रेमाचें भरतें आलें. त्यांनीं ज्ञानदेव डोळ्यांनीं हृदयांत सांठविला व कानांनीं पोटांत कोंडून ठेवला. लोकांना ज्ञानेश्वरीची तहान-भूक लागली होती. ज्ञानदेव म्हणाले,

**तहानें तहानचि निववी । भुकेलिया भूकचि खावी । अहोरात्र वावीं । मवावा वारा ॥**

१३ व्या अध्यायांत, **जयांचेनि आठवे । शब्दसृष्टि आंगवे । सारस्वत आघवें । जिव्हेसि ये ॥** असें सांगून निवृत्तिनाथांच्या चरणांवर त्यांनीं डोकें ठेविलें.

ज्ञानदेवांनीं अठरा अध्यायांत शब्दांचीं मौक्तिकें मुक्तहस्तानें उधळून दिलीं आणि शेवटीं डोळ्यांत पाणी आणून त्यांनीं सर्वांचा निरोप घेतला. त्या रात्रीं सबंध नेवासें जागत होतें. सच्चिदानंद-बाबा ज्ञानेश्वरांची शेवटची अमृतवाणी लिहून घेत होते.



जे खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रति
वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचे ॥
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जें वांच्छील तो तें लाहो । प्राणिजात ॥
वर्षत सकळ मंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूतळीं । भटो तयां भूतां ॥
चला कल्पतरूंचे अरव । चेतना चिंतामणीचे गांव ।
बोल ते जे अर्णव । पीयूषाचे ।
चंद्रमे जे अलांच्छन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदासज्जन । सोयरे होतु ॥
किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजि जो आदिपुरुषीं । अखंडीत ॥

मोठ्या सोहाळ्यांत ज्ञानेश्वरी संपली. दुसऱ्या दिवशीं पहांटेला नेवाशाला वंदन करून हीं चारी भावंडें पंढरपूरच्या वाटेला लागलीं. प्रहराप्रहरामागून सूर्य जसा पुढें पुढें वाटचाल करीत असतो त्याप्रमाणें ज्ञानदा पुढें पुढें चालला होता. त्याचा प्रत्येक दिवस सफल होत होता. चंद्रभागेवर स्नान करून ही मंडळी पांडुरंगाच्या देवळांत गेली. ज्ञानेश्वरांनीं हात जोडून विठ्ठलाचें स्तवन केलें.

रूप पाहतां लोचनीं । सुख झालें वो साजणी ।
तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा......

* * *

# दोन देवांची भेट : ४

त्यांच्या वडिलांचें नांव विठ्ठल. नामसादृश्यानें वडिलांची आठवण ताजी झाली. साऱ्यांच्या डोळ्यांत पाणी उभें राहिलें. जनाबाई सभामंडपांत झाडलोट करीत होती. ज्ञानेश्वराला तिनें पाहिलें नव्हतें पण त्याची कीर्ति तिच्या कानांवर आली होती. तिनें ज्ञानेश्वराला ओळखलें आणि टाहो फोडला, " ज्ञाना, तुलाच कधीं पाहीन असें झालें होतें रे... विवेकसागर । सखा माझा ज्ञानेश्वर ॥ " ज्ञानदेवाची धाकटी मुक्ता बहीण होतीच. आतां ही जनी मोठी बहीण मिळाली. गडबड ऐकून नामदेव पूजा टाकून बाहेर आले. ज्ञानदेव दृष्टीस पडतांच ते दोघे उराउरीं भेटले.



नामदेव म्हणाले,

" ज्ञाना, तुझ्या अकल्पित दर्शनानें मी आज धन्य झालों आहें."

" नामा, तूं भक्तांचा शिरोमणी ! म्हणून आज तुझ्याच भेटीला आलों मी.

" **प्रेमसुख गोडी तुजची फावली । वासना निमाली समूळ तुझी ॥**

तुला आणखी काय पाहिजे आहे ? खरं कीं नाहीं नामा ? "

" आपल्या आशीर्वादानें कृतार्थ झालें मी. "

चारी भावंडांना घेऊन नामदेव घरीं आला. मोठ्या प्रेमानें साऱ्यांनीं सहभोजन केलें. पंढरपुरांतीलहि भाविक लोक ह्या चार पुण्यपुरुषांच्या दर्शनास आले. 'रात्र झाल्यावर नामानें विचारलें,

" ज्ञानया, गरीबाच्या झोंपडींत कशी रे पायधूळ झाडलीस ? "

" तुझ्याच भेटीकरितां आलों मी. "

" कशाला ? "

" तुला घेऊन यात्रेला जाईन म्हणतों. "

" माझी यात्रा पंढरीच आहे, ज्ञाना. "

" हे बघ, भक्त आणि ज्ञानी हे जरी जीवन्मुक्त असले तरी देव-देवतार्चन व तीर्थयात्रा यांचा कांहीं ते त्याग करीत नाहींत. "

" मग काय करावें म्हणतोस ? "

" या भरतखंडांतील तीर्थें एकदां डोळ्यांनीं पाहावींत अशी इच्छा होऊन तुझ्या सोबतीची भीक मागण्याकरितां आलों आहें मी. "

" माझी तुला काय सोबत होणार रे ? "

" वाऽरे, तुझ्यासारखा भक्त बरोबर असल्यावर प्रवासाला तर मोठी मजा येईल. "

" पण ज्ञाना, माझ्या सर्व सुखाचा ठेवा हा पांडुरंग आहे. त्याचे समचरण सोडून दुसऱ्या कुठल्या सुखासाठीं ह्या तीर्थयात्रा मी करूं ? पंढरीचा भिकारी बनून मी त्याच्या दारांतच पडून राहीन—तेंच माझं मोठं सुख आहे. "

" वेड्या, पण तुझा पांडुरंग हा सर्वव्यापी आहे. जेथें तूं जाशील तेथें तो आहे. "

" ज्ञानदेवा, तूं इतका पवित्र आहेस कीं ह्या तीर्थयात्रांचा विचार तुझ्या मनांत कां यावा हेंच कळत नाहीं. सर्व तीर्थांचें उगम-स्थानच मुळीं तूं आहेस. "

" नामदेवा, तुझ्या सहवासांत कांहीं काळ घालवावा ह्या एका इच्छेनेंच मला ही कल्पना सुचली."

शेवटीं नामदेव ज्ञानाचा आग्रह म्हणून कबूल झाला. दुसऱ्या दिवशीं ते यात्रेस निघाले. निवृत्ति लहान भावंडांना घेऊन आळंदी-ची वाट चालूं लागला. ज्ञानदेव आणि नामदेवहि बरोबर निघाले. आधीं चंद्रभागा दिसेनाशी झाली. मग फक्त देवळाचा कळसच दिसूं लागला. आईपासून दूर जातांना लहान मुलानें जसें मागें वळून वळून पाहावें त्याप्रमाणें नामदेवाचीं पावलें पंढरीपासून दूर जात होतीं तरी त्याचें चित्त मात्र विठ्ठलाच्या पायाशींच लोळण घेत होतें. नामाच्या देवानें केवळ ज्ञानाच्या देवाचाच हट्ट ऐकला होता. दुसऱ्या कुणाकरितांहि त्यानें पंढरी सोडली असती कीं नाहीं शंकाच आहे.

वाटेंत नामदेव शोकाकुल झाला म्हणून ज्ञानदेवानें विचारलें,

" नामा, प्रेमाचा जिव्हाळा पांडुरंग तुझ्या हृदयांत असून तूं वरचेवर असा शोकाकुल कां होत आहेस ? "

" काय करूं, मला त्या पांडुरंगाशिवाय कांहीं दिसतच नाहीं रे!"

" थोडा विवेक धर म्हणजे तुझ्या प्रत्येक पावलांत तुला तुझा पांडुरंग दिसेल. "

" महाराज, मी आपल्यासारखा ज्ञानी नाहीं कीं योगीहि नाहीं. त्या पांडुरंगाशिवाय मला दुसरें विश्रांतिस्थानच नाहीं. तें सुंदर रूपच मला सर्वस्वीं प्रिय आहे. "

" तो तुझा सांवळा सखा सर्वदेशी आणि सर्वव्यापी आहे हेंच मी तुला सांगत आहें. आकाशानें जसें सारें व्यापलें आहे तसाच तोहि

२८३५१
११५५ निवा ५.
३१-१-७१


सर्वव्यापी आहे. जेथें तुझा सखा पांडुरंग नाहीं असा ठाव तरी कोठें आहे ? ”

“ हें पाहा मला हें कांहीं कळत नाहीं. तूं जितकें मला समजावून सांगत आहेस तितक्याच काकुळतीनें मीहि तुला सांगत आहें.

**ऐकावा श्रवणीं । पहावा तोचि नयनीं ॥** ”

“ वेड्या, ज्ञानी सोहंभावानें ज्याची उपासना करतात तें परब्रह्म अव्यक्त, निराकार, निर्गुण आणि सर्वव्यापी आहे. ”

“ ज्ञाना, रागावूं नकोस. पण मी तुला अगोदरच सांगितलें कीं त्या सगुण पांडुरंगाच्या ठायीं माझें सुखसर्वस्व आहे. मग दुसऱ्या उठाठेवी करण्याचें मला प्रयोजनच काय ? माझें सर्व चित्त त्याच्या ठायीं ठेवून मला जें सुख होतें तें कांहीं ब्रह्मानंदापेक्षां कमी आहे अशी तुला शंकासुद्धां येऊं देऊं नकोस. ”

नामदेव भक्तीचा महिमा सांगत होता. ज्ञानदेव ज्ञानाची महती गात होता. मुखानें वाद चालत असे तेव्हां पाय रस्ता कापीत असत. रात्रीं झाडाच्या खालीं मुक्काम करावा. पहांटे स्नानसंध्यादि कर्में आटोपून पुढचा मार्ग आक्रमावा, मुखानें अखंड नामस्मरण करावें, अशा क्रमानें त्यांचा प्रवास चालू होता.

ज्ञानेश्वर शंकरभक्त म्हणून त्यांनीं काशी केली. पवित्र गंगास्नान झालें. कृष्णभक्त म्हणून मथुरा पाहिली, हरिद्वार झालें. गंगेची आरती केली. गया-प्रयाग झालें. नंतर पाठ फिरवून पुन्हां प्रवासास सुरुवात झाली. द्वारकाधीशाचें दर्शन घेतलें आणि नंतर विठ्ठलगान गात गात उभयतां मारवाडांतून आक्रमण करीत चालले. तेथें त्यांचे पाण्याचे फार हाल झाले. आकाशांतून आगीचा वर्षाव होत होता. डोळ्यासमोरं मृगजळ दिसत होतें. वाऱ्याची झुळुकसुद्धां कढत येत होती. घशाला कोरड पडत होती. बिकानेरपासून १०।१२ मैल असलेल्या कोलादजी नांवाच्या गांवीं दुपारच्या प्रहरीं त्यांना तहान लागली म्हणून ते दोघेजण एका विहिरीजवळ आले. पण त्यांत

पाणी फार खोल होतें. ज्ञानदेवांना एक युक्ति सुचली. त्यांनीं योग-सामर्थ्यानें सूक्ष्मरूप धारण करून विहिरींत प्रवेश केला व आपली तृष्णा भागविली. येतांना त्यांनीं नामदेवाकरितां ओंजळ भरून पाणी आणलें. ज्ञानदेव नामदेवाला म्हणाले,

" नामा, योगानें सूक्ष्मरूप धारण करण्याची कला तुला अवगत नसावी म्हणून तुझ्याकरितां मीं मुद्दाम ओंजळ भरून पाणी आणलें आहे. तरी तें प्राशन करून आपली तहान भागव. अगदीं मुळींसुद्धां संकोच करूं नकोस. "

" नाहीं, ज्ञाना तुझ्या हट्टाकरतां पंढरी सोडली तरी तुझा हा हट्ट मात्र मी पुरा करणार नाहीं. तहानेनें मग मेलों तरी बेहेत्तर. पण तें पाणी मी पिणार नाहीं. "

" नामा, अरे, तूं तर क्षमाशील आहेस. आणि जिचा गर्व नाहीं तीच क्षमा. "

" हा हट्ट मी धरला नसता. पण तूंच म्हणाला होतास ना कीं विठ्ठल सर्वव्यापी आहे ? मग मला तहान लागली आहे हें त्या विठ्ठलाला इथेंसुद्धां समजलें पाहिजे. मला तहान लागली तर त्याच्या घशालाहि कोरड पडली पाहिजे. आणि त्याला तहान लागल्यावर तो पाणी प्यायल्याशिवाय कसा राहील ?

**विठ्ठल मावली कृपेची सांवली । आठवितां घाली प्रेम-पान्हा ।**
**न सांगतां सर्व जाणे तहानभूक । जवळी व्यापक, न विसंबे ॥ "**

नामदेव डोळे मिटून विठ्ठलाचा धांवा करीत होता. ज्ञानदेव तटस्थतेनें पाहात होता. एका क्षणांत त्या खोल विहिरींतलें पाणी नामदेवाच्या पायाकडे वाहूं लागलें. ज्ञानदेव भक्तीचें वैभव पाहून गहिंवरून गेले. ज्ञानानें नामाला मिठी मारली व सद्गदित होऊन तो म्हणाला,

" नामा, देवाचा तूं इतका लाडका भक्त आहेस कीं तुझा मोठेपणा अजून तुलाच कळला नाहीं रे. तुझ्याकारितां प्रत्यक्ष निर्गुणच साकार होऊन तुझ्या भेटीकरतां धांवले. "

" ज्ञाना, तुला कल्पना नाहीं. पण देवाला दुसरी कसली भूक नसली तरी तो भक्तीचा मोठाच भुकेला आहे रे !

**देव भावाचा लंपट । सांडून आलासे वैकुंठ ॥**

आम्ही भक्त नसलों तर ह्या देवाला कोण विचारणार आहे ? अरे, ह्या देवांचा इतका गवगवा आम्ही भक्तांनींच केला. "

नामदेवाच्या भोळ्या भावाचें आणि भाबड्या भक्तीचें त्याला एकीकडे हंसू येत होतें आणि दुसरीकडे कौतुकहि वाटत होतें. ज्ञानदेव नामाला म्हणाले,

" देव ओळखून देवाला भजलें पाहिजे. अमृतांत बुडून मरण्यासारखें आहे तें. देहभाव विसरून देवाच्या ओढीनें देवाला अनन्यभावानें भजणारा तो ज्ञानीभक्त. तो आणि देव एकच. फार काय पण तो " चैतन्यचि केवळ माझें—" असें प्रत्यक्ष भगवानच सांगतात.

" माझ्याच ठिकाणीं मी देव कसा पाहूं ? तूं ज्ञानयोगी आहेस. तर मी भक्तयोगी आहें, ध्यानयोगी आहें. जो विटेवर उभा नाहीं व ज्याचे कटेवर हात नाहींत त्याला मी देवच म्हणणार नाहीं. नामभक्तीनें भगवत्प्राप्ति हा माझा अहोरात्रीचा खेळ होऊन राहिला आहे व मी नको म्हटलें तरी तो खेळ आतां माझ्यानें सोडवणार नाहीं.

**पंढरीचा वास, चंद्रभागे स्नान, आणिक दर्शन विठोबाचें ।**

**हेंचि घडो मज जन्मजन्मांतरीं, मागणें श्रीहरी नाहीं दुजें ॥**

अशी माझी स्थिति झाली आहे. त्याला मी तरी काय करूं ? "

" संपूर्ण अक्षरओळख झाल्यावर पुन्हां श्री गिरवण्यांत काय फायदा आहे ? खरा देव आपल्या हृदयांत आहे. पण आपण त्याला ओळखलें पाहिजे. पतिस्वरूपीं सर्वस्व वाहून व स्वतःला विसरून सती पुन्हां पतिसेवेकरितां सतित्वानें वेगळीच राहाते. शिव होऊन भक्त शिवाला असेंच भजत असतात. ज्ञानभक्तीचें हें रहस्य आतां तूं ओळखायला हवेंस."

" ज्ञाना तूं म्हणतोस तें आतां खरोखरच पटलं मला.

**केशव तोचि नामा, नामा तोचि केशव ॥** "

" आणि हें पटलं असून तूं नामभक्तीला चिटकून आहेसच ! नामा, अरे नामभक्ति मी कमी लेखत नाहीं, पण ज्ञानभक्तीची चव निराळीच आहे. तूं चाखून तर पाहा. "

" ज्ञानदा, तुझ्यासारख्यांचें ठीक आहे. तुझी झेप गरुडाची आहे तर माझी झेप साळुंकीची आहे. तुझ्यासारख्या योग्यांचे,

**योगियांचें ब्रह्म शून्य व्योमाकार । आमुचे साकार विटेवरी ॥**

जिकडे पहावें तिकडे मला विठोबाच दिसत आहे. **डोळयांतील बाहुली, माझी विठाई झाली** अशी माझी स्थिति झाली आहे रे."

" सर्वांचा आदि तो आहे. तेथें वेद मुके व मन पांगळें होतें. सारे देव त्याच्या मागूनचे. ते त्याला काय जाणणार ? पोटच्या गर्भाला आईचें वय कळेल ? अंकुरांत काय वटवृक्ष सांपडेल ? तरंगांत समुद्र सांठेल ? परमाणूंत काय भूगोल सांपडेल ? तुझ्या पांडुरंगांत आदिदेव पाहा. आपणांत विश्व पाहावें, विश्व आपणचि व्हावें. किरण व सूर्य असा तुझा नि पांडुरंगाचा संबंध आहे. तरंग लहान असला तरी तो कांहीं समुद्राहून निराळा नाहीं. हें जाणून तूं पांडुरंगापासून निराळा राहूं नकोस. ह्यालाच ज्ञानयोग म्हणतात. ज्ञानयोगाचें सार हेंच होय.

**सिंधू आणि जलधरा, माजी लागली अखंड धारा ।**

ब्रम्हीं लीन होणें हीच भक्ति, हेंच ज्ञान व हाच योग होय ! "

" ज्ञाना, नेवाशाला तूं विश्वदर्शनावर भाष्य केलंस. मलाहि थोडें सांग. "

" ऐक. देवाचा सर्वांभूतीं विस्तार आहे. त्याच्या वदनांत अनंत ब्रम्हांडें सांठविलीं आहेत. तो ना उभा ना बैठा, ना उंच न खुजटा. त्याच्या रूपाला आदि, मध्य, अन्त नाहींत. तो विश्वाची साठवण आहे. दशदिशा, सप्तलोक, चवदा भुवनें सर्व तोच आहे. देव त्याचीच स्तुति करीत आहेत. अनंत वदनें, अनंत नेत्र, अनंत हस्त, अनंत भुज, अनंत शस्त्रें, अनंत चरण हें सर्व तोच आहे—"

" ज्ञाना, पण रोजची चालती बोलती नि सगुण मूर्ति पाहाण्याची मला संवय झाली असतांना देवाच्या इतक्या तोंडाशीं मीं कसें बोलावें ? इतक्या शरिरांना मी कसें आलिंगन द्यावें ? वाऱ्याबरोबर मला धांवतां येणार नाहीं. गगनाला मला कवटाळतां येणार नाहीं. किंवा समुद्रांत मला जलक्रीडाहि करतां येणार नाहींत. चंद्रभागेंत स्नान करून विटेवरची समचरणाची शोभा पाहाणेंच माझ्यासारख्याला परवडेल. "

" तुझ्या धसाळपणाला काय म्हणावें नामा ? अरे विश्वदर्शनाचा लाभ झाल्यावरहि तुला सगुणाची भूक राहील ? अंग सोडून छाया आलिंगण्यांत काय फायदा आहे ? कल्पवृक्षाखालीं उभें राहून कुणी भीक मागेल ? "

" गुरूला निर्गुण ब्रम्ह श्रेष्ठ वाटावें व शिष्याला श्रीगुरुपरतें ब्रम्हच न दिसावें असें पांडुरंगाच्या बाबतींत माझें झालें आहे. "

" नामा, तूं प्रेमाचा पुतळा, भक्तीचा जिव्हाळा, आणि मैत्रियेची चित्कळा आहेस. तेव्हां तूं म्हणतोस तें निदान तुझ्या बाबतींत तरी खरें आहे. तुझी विठ्ठलभक्ति इतकी अगाध आहे कीं,

**जयाचिया प्रीति । अमूर्त हा आला व्यक्ति ॥**

अशी तुझ्या बाबतींत त्या विठ्ठलाची परिस्थिति झाली आहे. भक्ति

खालची, ज्ञानाची पायरी वरची, ही भाषा तुझ्यासारख्या भक्तांच्या बाबतींत तरी फोल आहे. ज्ञान व भक्ति तुला एकच आहे. ”

“ ज्ञाना, तुझी अमृतसुधा पिऊन मी आज तृप्त झालों आहें. भक्तलक्षणरूपी भक्तिमार्गाचा इतका उज्ज्वल धडा साधकांना अन्यत्र कोठें ऐकावयास मिळेल ? ”

“ नामा, ज्याला देवकीनें उदरीं वाहिला, यशोदेनें सायासें पाळिला पण शेवटीं जो पांडवांच्या उपेगा गेला—तसाच सर्व संतांनीं पूजिलेला नि गौरविलेला हा पंढरीनाथ फक्त तुझ्याच वांट्याला आल्यासारखा वाटतो. तुझीच वाट पाहात तो राउळांत उभा आहे बघ. ”

दोन देवांची यात्रा संपली होती. नामानें पाहिलें तर पंढरीचा कळस सूर्याच्या प्रकाशांत तळपत होता. चंद्रभागा पाहून त्याला गहिंवरून आलें. त्याच्या डोळ्यांत पाणी उभें राहिलें. हे दोन देव आज परतणार हें साऱ्या संतांना माहीत होतें. हातांत टाळ, मृदुंग आणि पताका घेऊन जनाबाई, चोखामेळा, गोराकुंभार, सांवता माळी, बंका महार त्याचीच वाट पहात चंद्रभागेच्या तीरावर दाटी करून उभे राहिले होते. ही जोडी दिसतांच त्यांच्या नांवाचा त्यांनीं अखंड जयघोष सुरू केला.

नामदेवाच्या घरीं यात्रेचें पारणें झालें. सातआठ दिवस सारे संत एकत्र राहिले. एकत्र जेवले. भक्तिरस ओसंडून वहात होता. नामदेवासारखा यजमान, ज्ञानोबासारखा पाहुणा आणि जोडीला बाकीचे संत ! मग काय पाहिजे? ज्ञानोबा आतां नामदेवाला घेऊन आळंदीला जाणार होता. आपल्या मनींचे शेवटचें हितगुज त्यानें नामदेवाजवळ केलें होतें.

★ ★ ★

# समाधी



ज्ञानदेव जाणार त्याच्या आदली सारी रात्र संतांनीं जागून काढली. ज्ञानदेवानें नि नामदेवानें प्रवासांतल्या गोष्टी आपल्या स्नेह्यांना सांगितल्या. नंतर नामदेवाचें कीर्तन झालें. ज्ञानदेवाचें प्रवचन झालें. चंद्रभागेंत त्यांनीं नौकाविहार केला, पाण्यांत दिवे सोडले. खिरापत झाली. काला झाला. प्रत्येक संतानें स्वरचित अभंग ज्ञानदेवांना म्हणून दाखविले. शेवटीं " हेंचि दान देगा देवा " झालें—कापूर विझला तेव्हां पहांटेचा कोंबडा आरवत होता. सायं-आरतीला सुरुवात होऊन सोहळा रंगला नि काकड आरती होऊन सोहळा समाप्त झाला. सारे संत ज्ञानदेवाला उराउरीं भेटले. आपल्या प्रेमाची शिदोरी त्यांनीं त्याला बरोबर बांधून दिली व चंद्रभागेच्या सीमेपर्यंत येऊन सर्वांनीं ज्ञानदेवांचा निरोप घेतला.

ज्ञानदेवांनीं नेवाशाला ज्ञानेश्वरी सांगितली. नामदेवाबरोबर तीर्थयात्रा केल्या आणि आतां सर्व अंगीकृत कार्य साधून नि समाधान पावून ते नामदेवाबरोबर आळंदीला आपल्या जन्मभूमीकडे निघाले. ते नाथपंथी होते. त्यामुळें त्यांच्या कानांत कर्णमुद्रा होत्या. पायांत खडावा होत्या. अंगावर भगवीं वस्त्रें होतीं. खाकेंत ज्ञानेश्वरीची प्रत होती. हातांत कमंडलू होता व खांद्यावर झोळी होती. शांत-चित्तानें पावलें टाकीत ते आळंदीच्या दिशेनें चालले होते व त्यांच्या मागून क्षौर केलेलें, शेंडी वाऱ्यावर उडत असलेलें व पोकळ कासोट्याचें धोतर नेसलेलें नामदेवाचें भोळेंबापडें ध्यान रस्ता कापीत होतें.

आळंदीच्या वेशींत पाऊल टाकतांच ज्ञानदेवाला ब्रह्मांड आठवलें. प्रवासांत असतांना त्याला आईवडिलांची आठवण तितकीशी झाली

नाहीं. पण आतां मात्र त्याला त्या सिद्धबेटावरील झोपडी सुनी सुनी वाटूं लागली. ते आले तर मुक्ता पाण्याला गेली होती. निवृत्ति भिक्षांदेहीला बाहेर गेला होता व सोपान घर सांभाळीत होता. ज्ञानोबा दृष्टीस पडतांच सोपान उराउरीं भेटला. ती भेट जणूं आदल्या जन्मींच्या रामभरताचीच होती. इतक्यांत मुक्ता नि निवृत्तीहि बाहेरून आले.

ज्ञानानें नामदेवाला काय सांगितलें आहे याची कल्पना निवृत्तीस योगसामर्थ्यानें आली होती. त्यामानानें सोपान नि मुक्ता मात्र अज्ञानी होती. "**इवलेसे लोप लावियेले द्वारीं, त्याचा वेलु गेला गगनावरी**" याप्रमाणें आईबापांनीं जातांना स्वाधीन केलेला मुक्ता ज्ञानोबानें आईच्या वात्सल्यानें वाढविली होती. तिचा त्याग करून आपण जाणार म्हणून ज्ञानोबाहि गहिंवरले.

थोड्याच दिवसांत ज्ञानदेवानें कठोर मनानें पण प्रेमळ वाणीनें आपण जिवंत समाधी घेणार असल्याचा आपला निर्धार साऱ्यांना सांगितला. बातमी हां हां म्हणतां सर्व गांवभर झाली. सर्वांना चमत्कार वाटला. सर्वांना वाईट वाटलें. पुराच्या पाण्याप्रमाणें ती बातमी आळंदीची वेस फोडून बाहेर फुटली. पंचक्रोशीतून आळंदी-च्या वाटेकडे माणसांची रीघ लागून राहिली. आजूबाजूच्या गांवांतून बैलगाड्या भरून माणसं येऊन आळंदींत गर्दी करूं लागलीं. पंढरपूर गलबलून गेलें. पुणें ते आळंदी हा सारा टापू नामघोषानें दुमदुमून गेला.

नामाला छळणारा विसोबा खेचर आला. कोरें पत्र धाडणारा चांगदेव आला. आरणभेंडीहून नाचत बागडत सावता माळी आला. भक्तीचें सोनें घेऊन नरहरि सोनार आला, मंगळवेढ्याहून जोहार मायबाप करीत चोखामेळा आला. टाळ वाजवीत तेरेगांवहून गोरा कुंभार आला. मृदुंग वाजवीत बंका महार आला. आणखी किती तरी लहानथोर संत आले.

चोखोबाची स्त्री सोयराबाई आली. प्रेमळ हृदयाची नि नवनीत अंतःकरणाची नाम्याची दासी जनी आली. नामाचीं मुलें विठा,

महादा, गोंदा आले. ज्ञानदेवाला पाहण्याकरतां साऱ्यांनीं धांव घेतली. ज्ञाना जाणार म्हणून साऱ्यांचीं अंत:करणें व्यथित झालीं होतीं. पण ते सारे संत होते आणि तें निर्याण एका महातत्त्वज्ञानी पुरुषाचें होतें.

" अलं ददाति " म्हणजे पुरे म्हणेपर्यंत जी देते ती आळंदी. ही ज्ञानोबाची जन्मभूमि नि कर्मभूमि. मातामहवसतीचें स्थान म्हणून ज्ञानेश्वरांनीं जिवंत समाधि इथें घ्यायचें ठरविलें. इंद्रायणी-च्या तीरावर सोन्याच्या सळसळत्या पिंपळाला साक्षी ठेवून सिद्धे-श्वराच्या समोर ज्ञानदेव आपल्या पायांनीं चालत जाऊन जिवंत समाधि घेणार होते.

दशमीचे दिवशीं प्रदक्षणा झाली. सारे संत कीर्तनाला उभे राहिले. रात्रभर हरिजागर झाला. जिवींच्या कळवळ्यांनीं लहान-थोरांच्या डोळ्यांत प्रेमाश्रु उभे राहिले. जुन्या आठवणी गोळा झाल्या. साऱ्यांचे प्राण कासावीस झाले. जाणारा एकटाच होता पण साऱ्यांचे जीव गलबलून गेले. साऱ्यांचीच धांदल उडाली होती. देवाला जें आवडतें तें साऱ्या विश्वाला आवडतें. ज्ञानदेवांना देवानें जवळ केलें आणि ते साऱ्यांच्या गळ्यांतले ताईत झाले. लक्षावधी नेत्रांना त्यांना आपल्या हृदयांत कोठें नि किती साठवूं असें होऊन गेलें होतें. ज्ञानदेवानें आपलें कार्य साधलें होतें, संपविलें होतें व भरल्या पोटानें ते समाधी घेणार होते. पण संतांना ते अजून हवे-हवेसेच वाटत होतें.

द्वादशीला पारणें सोडलें. ज्ञानोबा तर आनंदमय झालेले होते. ते जितके आनंदी होते तितकेच सारे संत रडवे झाले होते. आपल्या पायांनीं शेवटीं शके १२१८ ची कार्तिक वद्य त्रयोदशी चालत आली. ज्ञानोबा आज समाधी घेणार होते. ज्ञानराज आज साऱ्यांचा निरोप घेणार होते. वेळ जवळ जवळ येत चालली तसे दु:खाचे कढ वाढूं लागले. शोकाचा उमाळा आवरेनासा झाला. निवृत्तींची निवृत्ति मावळली. सोपान देहभान विसरला. मुक्ता धाय मोकलून रडूं लागली. त्यांचे आईबाप गेल्यावर त्यांना जेवढें दु:ख

झालें नव्हतें तेवढें दुःख त्यांना आतां होत होतें. त्यांना दाही दिशा उजाड आणि उदास वाटूं लागल्या. सार्‍यांनीं डोळ्याला पदर



लावले. निवृत्तींचें तर कांहीं केल्या समाधानच होईना. ते म्हणाले, " ज्ञाना, अरे मी तुझा गुरु. पण तूं मलाहि हटवलेंस. मी मोठा. अगोदर मी जायचें तर तूंच माझ्या अगोदर जाणें काढलें आहेस. वळचणीचें पाणी आढ्याला गेल्यासारखें होतें आहे रे हें !

**बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट,**
**ओघ बारावाट मुरडताती ।**
**बांधल्या पेंडीचा सुटलासे आळा,**
**तृण रानोमाळा पांगलासे ।**
**हरिणीवीण खोपी पडियेली ओस,**
**दशदिशा पाडस भ्रमताती ।**
**मायबाप आम्हां त्यागियले जेव्हां,**
**ऐसे संकट तेव्हां झालें नाहीं । "**

निवृत्तीच्या मनीं हुताशन पेटला होता आणि संत आपल्या प्रेमानें तो विझवूं पहात होते.

शेवटीं ज्ञानदेव म्हणाले,

" निवृत्तिनाथ, तुम्हीं मला पाळिलेंत, पोसिलेंत, लळा लावलात, ब्रम्हज्ञान दिलेंत हें सारें खरें. पण आपण सांगितलेल्या मार्गांनींच मी जात आहें नि मला गेलें पाहिजे. तुमच्यासारख्या ज्ञानी मनुष्याचें मी काय नि कसें समाधान करावें ? देवाच्या देवास मी अनंत रूपानें व अनंत वेषानें पाहिलें आहे. आतां मला त्याची ओढ लागून राहिली आहे. मग माझ्याच पावलांनीं मी जात असतांना तुम्ही सारे असे दुःखी कां ? मी जातांना तुम्हा साऱ्यांना अशा विकल अवस्थेंत पाहून माझें जाणें मला सुखाचें वाटेल का ? आतां वेळ लावूं नका. मुहूर्त टळून जाईल........."

निवृत्तीनें विवेक धरला. त्यानें सोपानाची आणि मुक्ताची समजूत घातली कीं, " ज्ञानेश्वर आपलाच आहे. तो आपणांपासून दूर जाईल कसा ? उलट इतके दिवसच तो दूर होता. तो गेल्यानें मात्र आपल्या हृदयांत कायमचा राहणार आहे. " साऱ्यांचें समाधान झालें. पण खुद्द निवृत्तीच्या अंतःकरणीं मात्र दुःखाचा प्रचंड कल्लोळ उठला. दुःखी मनुष्यानें दुसऱ्याची समजूत काढायची ह्याच्यासारखें खरोखरच कठीण काम नाहीं.

ज्ञानदेवांनीं इंद्रायणींत अखेरचें स्नान केलें. लोकांनीं त्यांच्या गळ्यांत पुष्पमाला घातल्या. अंगाला चंदनाची उटी लावली. लोकांनीं आपल्या हौशीप्रमाणें ह्या बालयोग्याला नटविलें. ज्ञानदेवांनीं त्यांना आडकाठी केली नाहीं. लोकांकडून ते अखेरचें कौतुक करून घेत होते. त्यांच्या मनांत मात्र वैराग्याची धुनी पेटली होती. जगांत असून ते जगावेगळे होते. पैलतीराला त्यांचे नेत्र लागले होते. दशदिशांच्या पलीकडची त्यांना ओढ लागली होती. विश्वाची आर्तता त्यांच्या हृदयीं सांठली होती. जो तो " ज्ञानदेव कुठें आहेत ? " म्हणून चौकशी करीत होता. इंद्रायणीच्या दोन्ही बाजूंना पताकांचे

भार दाटले होते. टाळ, वीणा, मृदुंग अखंड वाजत होते. आका-शाला भगवा रंग आला होता. पुढें मागें संतांनीं दाटी केली होती. ज्ञानदेव साऱ्यांचा निरोप घेत होते. ज्ञानोबांना उराउरीं भेटतांना नामदेव म्हणाले,

**नाथा नको रे अंतरू । तुझ्या कासेचें मी वासरूं ।**

जनी पायावर लोळण घेत म्हणाली,

**मज पाडसाची माय । भक्तिवत्सलाची तूं गाय ।**

सेना गहिंवरून म्हणाला,

**लेकुराची चिंता । वागवावी कृपावंता—।**

भागु महारीण अंग चोरीत म्हणाली,

**कृपेच्या सागरा । माय बापा ज्ञानेश्वरा ।**

अलकापुरींतील मग साऱ्या ग्रामस्थांचा, वन, वृक्ष, वल्ली, पशु-पक्षी, कमोद, कोकिळा यांचा ज्ञानदेवांनीं निरोप घेतला. त्यांच्या दर्शनानें आज प्रत्यक्ष ब्रह्म डुलत होतें. वैष्णवांचा तो अमृतमहोत्सव पाहात असतां निसर्गहि गहिंवरला. वृक्षवल्लींना वाचा नव्हती म्हणून त्यांनीं आपलीं पानें ढाळून ज्ञानदेवांना अखेरचा निरोप दिला. संतांच्या अश्रूंचा पूर कमी पडला म्हणूनच कीं काय ती इंद्रायणी-सुद्धां भरती येऊन त्यांचे पाय धुऊन गेली.

ज्ञानदेव चालत चालत समाधीच्या जागेवर आले. समाधीची जागा स्वच्छ झाडली होती. पांढरें शुभ्र धुवट वस्त्र अंथरलें होतें. त्यावर तुळशी, बेल पसरले होते. दुर्वा, दर्भाचें आसन तयार केलें होतें. विविध रंगांचीं सुवासिक फुलें तेथें होतीं. दोन समया जळत ठेवल्या होत्या. पुढें ज्ञानेश्वरी ठेवली होती. ती जागा आणि शोभा पाहून ज्ञानेश्वर प्रसन्न झाले. त्यांनीं सोपानाला आणि मुक्ताई-ला शेवटचें आलिंगन दिलें नि मग निवृत्तीचा हात धरून ते समाधी-कडे निघाले. ईश्वराच्या शोधार्थ ते प्रवासाला निघाले तर ईश्वरच त्यांना सामोरा आला. अनुपम ब्रम्हांड धवळून गेल्याचें त्यांना

दिसून आलें. दशदिशांना सुगंध सुटल्याचा त्यांना भास झाला. त्यांच्या तोंडून अमृतवाणी आली:

**सोनियाचा दिवस आजी अमृते पाहिला, अमृते पाहिला ।**

" जनहो, जीवदशेच्या अरण्यांतील मरणगांवीं मी सांपडलों होतों पण त्या दुर्दशेंतून तुम्हीं मला सोडविलेंत, आणि हा सोन्याचा दिवस दाखविलात. "

शिवाचा ढवळा नंदी उठवून निवृत्तींनीं विवराची शिळा उघडली. ज्ञानेश्वर आसनावर जाऊन बसले. त्यांनीं परमेश्वराचें प्रदीर्घ स्तवन केलें. ध्यानाला आरंभ झाला. तीन वेळां त्यांनीं करकमळें जोडलीं. नेत्र झांकले. त्यांची समाधि लागली. त्यावेळेला त्यांचें " रम्य रमते समाधान—" असें झालें. श्रीकृष्णध्यान हृदयीं आलें. देहीं देहभाव गेला. अवघ्यारूपी अवघा गोविंदू दिसूं लागला. जेथें शब्द नमतो, जेथें विचार थकतो, जें आनंदाचें चैतन्य, आकाराचें पैलतीर, बंधमोक्षाचें निर्वाण, क्षितिजाहून दूर आणि दशदिशांचा जेथें अंत होतो तेथें ज्ञानदेव गेले. ज्ञानदेवांची संपूर्ण समाधि लागली. निवृत्तींनें समाधीला जड अंतःकरणानें शिळा घातली व संतांनीं एकच टाहो फोडला.

प्रचंड कल्लोळांत व भावनेच्या पुरांत, ज्ञानदेवांनीं समाधि घेतली. जो सर्व संतांचा प्राणसखा, परब्रम्हाचा ठसा, योग्याची माऊली, कृपेची साऊली, चैतन्याचा दीप, मंगल मुनि, भक्त करुणासागर, प्रेमाचा पुतळा, चैतन्याचा जिव्हाळा, मोक्षमार्गींचा सांगाती, गुरु-महाराव, लावण्याचा प्रकाश तो गेला. जणूं शांतिबिंबच मावळलें. ज्ञानोबा सर्व संतांना सोडून गेला तेव्हां त्यांना वाटलें कीं, शब्दांना अर्थच सोडून गेला आहे. चंद्रापासून चांदणेंच नाहींसें झालें आहे.

सर्व संतांनीं समाधीवर फुलें वाहिलीं त्यावेळीं आकाशांत प्रचंड कडकडाट होऊन आकाशवाणी झाली,

**अगा, अगारे ज्ञानेश्वरा**
**चंद्र तारा जंव दिनकरा**

**तंव तुझी समाधी स्थिरा**
**राहो रे निरंतर ॥**

**जंववरी हें क्षितिमंडळ**
**जंववरी हें समुद्रजळ**
**मग कालक्षयीं यथाकाळ**
**माझ्या हृदयीं ठसावें ॥**

जड अंतःकरणांनीं संत परतले. निवृत्ति, सोपान आणि मुक्ता मात्र समाधीजवळ बराच वेळ बसून होते. मुक्तानें टाहो फोडला,

" ज्ञाना, मलाहि सोडून गेलास—तूं माझी आई होतास. आईच्या प्रेमानें तूं मला वाढवलेंस. मी तुला ज्ञानेश्वर माऊली म्हणत होते. तूं गेल्यावर मी आतां कशी जिवंत राहूं ? आपल्या अश्रूंनीं ती समाधीवरील फुलें भिजवीत होती आणि करुण स्वरांत ज्ञानेश्वरांना आळवीत होती,

**ताटी उघडा ज्ञानेश्वरा**
**तुम्हीं तरूनि विश्व तारा**
**ताटी उघडा ज्ञानेश्वरा—॥**


मुक्ताचा हट्ट ज्ञानानें एकदां ऐकला होता व ताटीचें दार उघडलें होतें. तिच्या बाल मनाला वाटलें त्यावेळेला ज्ञानोबानें हट्ट पुरविला तसा तो आतांहि पुरवील. तिचें आर्त मन विचारीत होतें, " ज्ञाना, त्या वेळेस तूं माझा हट्ट पुरविलास तसाच आतां नाहीं का रे पुरविणार ? ताटीचें दार उघडून तूं माझा हट्ट पुरविलास तसाच आतां समाधीचें दार उघडून तूं मला तुझें दर्शन नाहीं का रे देणार ? "

मुक्ताचा तो टाहो ऐकून मुक्या पांखरांनीं किलबिलाट केला.

**॥ श्री ज्ञानेश्वर प्रसन्न ॥**

●●●

# भक्तांचा
# मुकुटमणी
# नामदेव



पंढरपूरच्या देवळांत शिरतांना नामदेवाच्या पायरीला पाय लागूं नये अशी खबरदारी घेऊन मी जेव्हां देवळांत शिरलों तेव्हां माझें मलाच हंसूं आलें. पंढरीच्या दर्शनास येणाऱ्या–जाणाऱ्यांची पायधूळ आपल्याला लागावी म्हणून ज्या मोठ्या उत्कट इच्छेनें नामदेवानें ह्या देवाच्या द्वारांत समाधी घेतली ती इच्छा जाणारे–येणारे पुरविण्यास तयार नव्हते. संताच्या पायवणी जाण्यास सर्वच संतांचा मोठा हट्टहास दिसतो. नामदेवालाहि संतांची चरण-धूलि हवी होती आणि संत मात्र त्याचीच चरणधूलि आपल्या माथीं धारण करीत होते. हा नामदेवाचा पराजय जयापेक्षांहि मोठा दिसतो.

नामदेवाची गाथा हातांत धरली कीं, हा भक्तवत्सलमणी कसा असेल म्हणून माझें मन नेहमीं कल्पना करीत राहतें. वाटतें कीं, पांडुरंगानें जशी नामदेवाच्या भेटीची आळ पुरविली तशी नामदेवानेंहि त्याच्या दर्शनाची माझी ही इच्छा पुरवावी. नामदेवाचा जन्म शिंपल्यांत झाला कीं त्याच्या आईच्या पोटीं झाला ह्याविषयीं मला कधींच कुतूहल वाटलें नाहीं. पण नामदेवाचा नैवेद्य खाण्याचा हट्ट देवानें पुरविला असेल का? आणि पुरविला असल्यास कसा पुरविला असेल? ह्याविषयीं मात्र माझ्या मनांत सदैव कुतूहल आहे. नामदेव शिंपल्यांत जन्मला ह्या लोककथेप्रमाणेंच देवानें त्याचा नैवेद्य खाल्ला ही लोककथा तर नसेल ना?

माझ्या लहानपणीं आजीच्या तोंडून ही कथा मीं मोठ्या भक्तिभावानें ऐकली व आज मोठेपणींहि ती कथा मोठ्या भक्तिभावानें मी माझ्या मुलांस सांगतों. नामदेवाचे भक्तिभावानें ओथंबलेले अभंग वाचून नि ऐकून मला असें वाटूं लागलें आहे कीं हें शक्य आहे! नामदेवाचा नैवेद्य देवानें खाणें हें अगदीं शक्य आहे! नामदेवाच्या भक्तीचा उमाळा इतका उत्कट आहे, त्याच्या अंतरींची ओढ इतकी तीव्र आहे कीं, दगडाच्या देवालाहि पाझर फुटून नामदेवाचा नैवेद्य आपण खावा असा मोह त्याला झाला असल्यास मला तरी नवल वाटत नाहीं.

ज्या काळांत लोकांचा देवावर विश्वास नाहीं, भक्तीची उत्कटता जाणण्याची ज्यांची पात्रता नाहीं, त्यांचा ह्यावर विश्वास बसला नाहीं तर नवल नाहीं. आईनें त्याला नैवेद्य देऊन देवळांत पाठविला आणि पांडुरंगानें त्याच्या भक्तीला भुलून तो खाल्ला ह्या गोष्टीवर त्याच्या आईचाहि विश्वास बसला नाहीं. त्यावेळीं नि त्या काळांत! मग आज तर काय? पण माझा मात्र ह्या गोष्टीवर पूर्ण विश्वास आहे. सश्रद्ध विश्वास आहे. हल्लीं जर रेडिओ बोलूं शकतो तर नामदेवाचा नैवेद्यहि देवानें खाल्ला असला पाहिजे. हल्लीं जर स्पुटनिक उडूं शकतें तर माझ्या ज्ञानदाची भिंत पण चालूं शकत असली पाहिजे. हल्लीं जर वॉटरप्रूफ, फायरप्रूफ अशा गोष्टी असूं शकतात तर त्या इंद्रायणीच्या तीरावरहि तुका वाण्याची गाथा तरली असली पाहिजे. तेहि चमत्कार आणि हेहि चमत्कारच! एक शास्त्रीय तर दुसरे दैवी. ॲटम् बॉंब तरी आम्ही कुठें डोळ्यांनीं पाहिला आहे? अनेक गोष्टी आम्ही पाहिल्या नाहींत किंवा त्या आमच्या शक्तीच्या पलीकडच्या आहेत. पण कांहींहि कळत नसतां किंवा विषय आकलन झाला नसतांनाहि आम्ही त्यांच्यावर जर विश्वास ठेवतों तर सत्य सांगण्यांतच ज्यांचें सारें आयुष्य गेलें त्या संतवचनावर आम्ही कां विश्वास ठेवूं नये? आपण ह्या गोष्टीवरहि जरूर विश्वास ठेवला पाहिजे.

ह्या नामदेवाचें सारें चरित्रच मोठें अद्‌भुत आणि चित्त थरारून टाकणारें आहे. ज्यानें आपल्या भक्तीनें देवाला भुलवून नैवेद्य खायला लावलें, कलियुगांत ज्याचें मौनव्रत होतें त्याला ज्यानें बोलकें केलें तो हा नामदेव वाईट संगतींत इतका बिघडला, इतका बिघडला कीं त्याला ईश्वराचा पार विसर पडला व तो खुशाल दरोडे घालूं लागला. लुटालूट करूं लागला. त्याच्या आयुष्यांतला हा फरक अतिमानवी वाटतो. कुठल्याच संताच्या चरित्रांत अशी गोष्ट आढळत नाहीं. तुकाराम हे पहिल्यापासून शेवटपर्यंत तुका-

रामच होते. ज्ञानदेवांची तर गोष्टच बोलायला नको. त्यांच्या जीवन-पटाकडे पाहिलें कीं डोळे दिपून जातात व त्यांच्या ठायीं मस्तक नमतें. ते प्रत्यक्ष विष्णूचा अवतार ! पण नामदेवाचें चरित्र त्या दृष्टीनें मानवी वाटतें. वाटतें कीं, अरे हा नामदेव तर आपल्यांतलाच आहे. तुमच्या आमच्या मनांतील चांगुलपणा नि वाईटपणा ह्याच्या ठिकाणींहि आहे. वाल्या कोळ्याप्रमाणेंच ह्यानें पण लूटमार केली आणि वाल्या कोळ्याप्रमाणें हाहि एक महान् पुरुष होऊन गेला. अधःपात झालेला मनुष्यहि श्रेष्ठपदीं पोंहोंचूं शकतो, देवाला आवडूं शकतो, ह्याचें नामदेव म्हणजे एक मूर्तिमंत प्रतीक आहे. एकदां वाईट असलेला माणूस कायमचाच वाईट होऊं शकत नाहीं. एकदां अधोगतींत पडलेला माणूस जन्मभर अधोगतींतच पिचत पडतो असें नाहीं. त्याला जर त्याची जाणीव असेल, त्याला जर स्वतःची सुधारणा घडवून आणण्याची इच्छा असेल तर ती गोष्ट सहजसाध्य—फार तर प्रयत्नसाध्य आहे. पण साध्य आहे. मात्र अंतःकरणांत प्रामाणिकपणा व मनाची उत्कटता मात्र पाहिजे. नामदेवाच्या ठिकाणीं ही उत्कटता शिगेला पोंहोंचली होती म्हणून नाम्याचा नामदेव झाला. नामदेवाची मूळची प्रवृत्ति वाईट नव्हती. नामदेवाची दरोडे घालणें ही खरी प्रवृत्ति नव्हती. तो एक वाईट संगतीचा परिणाम होता. तो एक वाईट संगतीचा प्रभाव होता. देवाला जेवायला लावणारा नामदेव खरा नामदेव होता. दगडांचे टाळ करून विठ्ठलगान गाणारा भोळाबापडा नामदेव हा खरा नामदेव होता. कारण दरोडेखोरीचा धंदा चालू असतांहि आंवढ्या नागनाथाचें त्याचें दर्शन कधींच चुकलें नाहीं. वाईट कृत्य करीत असतांहि चांगल्या माणसाची मूळ प्रवृत्ति नाहींशी होत नाहीं ती अशी !

एक दिवस नामदेव असाच देवळांत गेला असतां एक बाई दारिद्र्याला कंटाळून आपल्या मुलाला मारीत होती. मार खात होता तो मुलगा आणि अंतःकरण कळवळून जात होतें नामदेवाचें ! जणूं मार त्याच्याच पाठीवर बसत होता. त्यानें चौकशी केली तेव्हां त्या बाईच्या नवऱ्याच्या मृत्यूला आपणच कारणीभूत झालों आहोंत

८५५८



असें त्याला कळलें. आधींच अंतःकरण कळवळून गेलेलें आणि त्यांत हें कारण समजतांच तर त्याच्या अंतःकरणांत पश्चात्तापाचा डोंब उठला. नामदेव प्रामाणिक होता. त्याची भक्ति खरी होती. त्याचा उमाळा खराखुरा होता. त्याची उत्कटता स्वाभाविक होती. आणि म्हणूनच त्यानें आपल्या हातांतली सुरी डोक्यावर चालविली. आणि आपल्या दुष्कृत्यांची भरपाई रक्ताच्या अभिषेकानें महादेवाच्या पिंडीवर वाहिली. खरी उत्कटता उफाळून आल्याशिवाय अशी गोष्ट हातून होणार नाहीं. ह्याच नव्हे तर सगळ्याच ठिकाणीं त्याची अशी उत्कटता दिसून येते. त्याच्या मनाचा थोरपणा, भाबडेपणा, प्रेमळपणा सर्वच ठिकाणीं दिसून येतो.

डोक्याला पट्टी बांधलेली आहे, रक्त वहातच आहे. डोक्याभोंवतीं माशा घोंगावत आहेत अशा अवस्थेंत आपला दरोडेखोरीचा धंदा सोडून नामदेव पंढरीच्या वाटेला लागला. संतांच्या उपदेशाप्रमाणें तोहि पंढरीला जाण्यास आतुर झाला होता. पण पंढरीनाथ अजून त्याच्या नशिबीं नव्हता. भिवरेला पूर आला होता व नदी भरून दुथडी वहात होती. नामदेवाला ती ओलांडून पार होणें शक्य नव्हतें. ह्या नदीच्या करवीं देवानें आपली भेट नाकारली आहे असा त्याचा ग्रह झाला आणि मनांतून तो आणखीनच खट्टू झाला. नामानें हृदय हेलावणारा आक्रोश केला,

**पतितपावन नाम ऐकुनी आलों मी द्वारा ।**
**पतितपावन न होसी म्हणुनी जातों माघारा ॥**

पश्चात्तापानें होरपळून गेलेल्या नाम्याचा हा आवेग आणि त्यांतला आक्रोश, ह्या अभंगांत त्यानें देवाशीं केलेला लडिवाळपणा नि भांडण, इतकें हृद्य आहे कीं तो अभंग वाचतांना हृदय पिळवटून जातें.

एकदां पश्चात्ताप पावून विठ्ठलभक्तींत दंग झाल्यावर टांकसाळींतून नाणीं बाहेर पडावींत तशी नामदेवाच्या तोंडून अभंगवाणी बाहेर पडूं लागली. त्यांतले शब्दन् शब्द असे गोड आहेत, असे

कारुण्यपूर्ण आहेत, असे मधुमधुर आहेत, असे मृदु आणि भक्ति-रसानें ओथंबलेले आहेत कीं, त्याचा कोणताहि अभंग वाचतांना गहिंवरून यावें. देवाला आळवितांना नामदेव म्हणतो,

**क्षीरसागरांत असती बैसला । धावोनी मजला भेटी देईं ॥**
**शेषावरी जरी असती निजला । धावोनी मजला भेटी देईं ॥**

कसाहि आणि कोठेंहि असलास तरी धांवत ये असें सांगून नाम्या पुढें म्हणतो,

**येरे येरे देवा नामा तुज बहात ।**
**येईं बा धावत देवराया ॥**
**बाहुबळें तुवां काढिलें अमृत ।**
**ठेवीं बा तो हात शिरावरी ॥**
**कौटाळिलें जेव्हां ध्रुवासी वनांत ।**
**ठेवीं बा तो हात शिरावरी ॥**
**विदुराच्या घरीं कण्या जो भक्षीत ।**
**ठेवीं बा तो हात शिरावरी ॥**
**नामा म्हणे युद्धीं रक्षियेला पार्थ ।**
**ठेवीं बा तो हात शिरावरी ॥**

नामदेवाचे हे अभंग किती प्रासादिक आहेत ! ह्या अभंगांवरून नामदेवाचा महाभारत, रामायण, पुराण इत्यादि ग्रंथांचा अभ्यास असावा असें वाटतें. सोपे परंतु रसाळ शब्द हा तर नामदेवाचा विशेष आहे. एका अभंगांत नामदेव म्हणतो कीं, मला अशी पावलं दाखव कीं जीं...

**रुणझुण पायीं वाजताती वाळे । दावीं तीं पाऊलें दयानिधि**
**वस्त्रहरणीं जीं द्रौपदीनें चिंतलीं । दावीं तीं पाऊलें दयानिधि**

देवा, तूं धांवत येऊन तुझीं पावलें मला दाखव व माझ्या शिरा-वर तुझा हात ठेव असें म्हटल्यावर देव येईपर्यंतसुद्धां त्याला धीर धरवला नाहीं. तो त्याला धांवत ये म्हणतो, दुडदुडा ये म्हणतो,

पायांत अडखळून पडशील म्हणून जोडा घालून येऊं नकोस म्हणून सुचवितो व जेवायला बसला असशील तर विडा खायला इथेंच ये म्हणून विनवितो. "येरे येरे पावसा, तुला देतो पैसा" ह्या लहान मुलांच्या गाण्याप्रमाणें "येरे येरे देवा, तुला देईन मी पेढा" म्हणून त्याला तो लालूचहि दाखवितो.

**ज्याचे पायीं असे बिरुदाचा तोडा ।**
**त्याला बाहे वेडा नामदेव ॥**
**यावयासी येथें आळस तुम्ही सोडा ।**
**घेईन इडापिडा नामा म्हणे ॥**

नामदेव म्हणतो, "देवा, तूं कसाहि ये. पण लवकर ये. आळस सोडून तूं आलास तर तुझी इडापिडा मी घेईन." नामदेवाची अभंगरचना त्याच्या स्वभावाप्रमाणेंच साधी, सोपी नि रसाळ आहे. अनेक प्रकारें आळवून, विनवणी करूनहि देव येत नाहीं म्हणून नामदेव विचारतो,

**नामा म्हणे देवा उशीर कां केला ।**
**किंवा माझा आला तुज राग ? ॥**

राग आला का ? म्हणून विचारणाऱ्या नामदेवावर शेवटीं देवानें अनुरागच केला. त्याच्या भक्तीला तो भाळून गेला. त्याच्या भक्तीनें तो वेडापिसा झाला. "अमृताहूनि गोड, नाम तुझें देवा" ह्या स्तुतीला देव झाला म्हणून काय भाळणार नाहीं ? कारण जनीनें म्हटलें आहेच कीं,

**"देव भावाचा लंपट । सोडूनी आलासे वैकुंठ"**

नामदेवाचे हे सारे अभंग सुरुवाती सुरुवातीचे असावेत असें वाटतें. कारण पुढें पुढें तर त्याच्या भक्तीला अगदीं पाड आल्यासारखा वाटतो. पुढें पुढें त्याची भक्ति अगदीं बहरास आल्यासारखी, मोहोरून गेल्यासारखी वाटते. अनुपम लावण्याची विटेवरची समचरणाची शोभा पाहात तो तहानभूक विसरून गेला आहे

असें वाटतें. "**माता वाट पाहे नाम्या अजून का न ये—**" पण नाम्याला कुठें त्याची शुद्ध होती ? तो तर पांडुरंगीं रंगला होता.

नामदेवाच्या घरीं अठराविश्वें दारिद्र्य वास करीत असावें. विठ्ठलाची भक्ति सोडून त्यानें प्रपंचांत लक्ष घालावें म्हणून त्याची आई गोणाई नि बायको राजाई त्यास नित्य उपदेश करीत असत. पण त्यांच्या उपदेशापेक्षां पांडुरंगाच्या भक्तीनेंच त्याला भारावलें होतें. तें साजिरें गोजिरें रूप बघून तो भुलून गेला होता. उलट आईला नि बायकोला तो सांगे, "**कथे बैसोनि उठोनि जाती। खर होऊनी फिरती**" किंवा तो म्हणे, "**करंटे कपाळ नाम नये वाचे। सदैव दैवाचे प्रेम नामीं**" त्यांना वाटलें नामाला वेड लागलें आहे. आणि नामदेवाला खरोखरच वेड लागलें होतें. आपण ज्या ज्या वस्तू पाहतों त्या त्या वस्तूची प्रतिमा आपल्या डोळ्यांत उमटते. नामदेवाला मात्र सर्वत्र विठ्ठल दिसूं लागला होता. जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं त्याला विठ्ठल दिसूं लागला होता. त्यामुळें नामदेवानें कोणतीहि वस्तु पाहिली तरी त्याच्या डोळ्यांत विठ्ठलाचीच प्रतिमा दिसूं लागली. " डोळ्यांतील बाहुली माझी विठाई झाली " अशी त्याची स्थिति झाली होती. असें वेड लागणें सोपें नव्हतें. आणि असें वेड लागल्याखेरीज पांडुरंगहि भेटत नाहीं.

नामाच्या घरीं त्याचे मेहुणे पाहुणचाराला आले तेव्हां त्यांना खायला काय घालावें म्हणून राजाईला काळजी पडली. पण त्या वेळेस नामदेव म्हणतो,

> "**नामा म्हणे कांते दशमी एकभुक्ति।**
> **भोजन निश्चित करूं नये**"

नामदेवाचे हे बोल ऐकून आणि हा पाहुणचार पाहून बिचारे पाहुणे गार होणें साहजिकच आहे ! पण नामदेवाच्या ह्या म्हणण्यांत व्यावहारिक वेडेपणा असला तरी त्याची ईश्वरचिंतनीं असलेली तल्लीनताहि दिसून येते. ही तल्लीनता आणि समाधि इतकी अगाध आहे कीं सामान्य मनुष्यास ती जमणें तर कठिणच पण अशी तल्लीनता होऊं शकते

२८३४९



११२८
31-1-45

यावर विश्वास बसणेंसुद्धां अवघड ! नामदेवास देव भेटावा आणि तुम्हां आम्हांस भेटूं नये ह्याचें सारें इंगितच मुळीं इथें आहे. उगाच नाहीं देवानें "केशवशेटच्या" रूपांत त्याच्या घरीं सामान आणून टाकलें. "देव दगडाचा, भक्त मायेचा" देवाच्या ठायीं अशी समाधी लागल्यावर "नामा म्हणे होसी भक्तिचा वल्लभ । मागें पुढें उभा संभाळीत" जिथें व्यवहारांत हे संत अपुरे पडतात तिथें देव त्यांची लाज राखण्यास धांवत येतो.

परीसा भागवताचा परीस खऱ्या वैराग्यवृत्तीनें नामदेवानें जेव्हां चंद्रभागेंत फेंकला तेव्हां त्याच्यावर लबाडीचा आळ आला. पण खरा लबाड तो नव्हता. नामदेव तर भक्तीनें वेडा झाला होता. मग तो लबाड कसा असेल ? त्याला व्यवहार कळत नव्हता. त्याला स्वतःचा फायदा समजत नव्हता. त्याला सोन्याचा कस भुलवत नव्हता. त्याला परिसाची पर्वा नव्हती. काळासांवळा विठ्ठल हाच त्याचा परीस होता. खऱ्या मनानें त्यानें परीसा भागवताचा परीस चंद्रभागेंत भिरकावला. हा परीस आपल्या भक्तींत आडवा येईल म्हणून त्यानें तो परीस नाहींसा केला. खरा प्रामाणिक तो होता. प्रामाणिक नव्हते ते त्याच्यावर लबाडीचा आळ आणणारे ! परीसाची हांव होती ती त्यांना. नामदेवाचा प्रामाणिकपणा विठ्ठलाच्या पायीं रुजूं झाला आणि चंद्रभागेंतला जो दगड त्यानें उचलावा त्याचा परीस व्हावा इतकें अद्‌भुत सामर्थ्य त्याच्या हाताला आलें.

नामाचा चिंतामणी हातीं सांपडल्यावर लोखंडाचें सोनें करणाऱ्या परीसाची त्याला काय पर्वा होती ? त्या बाबतींत नामदेवाचा एक अभंग मोठा गोड आहे. नामदेव म्हणतो,

**द्राक्षफळां घड सेवितां चोखड । तयाहूनि गोड नाम तुझें**
**जाणोनिया नामा करी विनवणी । अमृताची खाण नाम तुझें**

अमृत शिंपून द्राक्षांची लागवड केल्यावर तें जसें गोड लागेल तसें देवाचें नांव त्याला मधुमधुर लागत होतें.

नामदेवाच्या अंतःकरणांत ऋजुतेचें कारंजें अखंड थयथयत असलें पाहिजे. प्रत्येक ठिकाणीं तो देव पाहात असल्यामुळें प्रत्येक ठिकाणीं त्याला उचंबळून येत असावें. नामदेवाची घडण घडवितांना विधात्यानें कारुण्य आणि वात्सल्य मुक्तहस्तानें वापरलें. त्यामुळें त्याला जवळचें नि दूरचें दुःखसुद्धां दिसत होतें. कमळाकर नांवाच्या एका सज्जन ब्राह्मणानें सर्व संतांस मोठ्या प्रेमानें नि आदरानें आपल्या घरीं जेवावयास बोलाविलें. सर्व मंडळी जेवावयास बसली पण नामदेव बसेना. " तुमच्या मुलास माझ्या शेजारीं बसवा " म्हणून त्यानें हट्ट धरला. यजमान पति–पत्नींनीं " तो निजला आहे " असें सांगितलें. तेव्हां नामदेवानें " त्यास उठवून आणा " असा वेडा हट्ट धरला. वेडा हट्ट ? हो, वेडाच नाहींतर काय ? नामदेव आईच्या नि बायकोच्या दृष्टीनें वेडा ठरला तसाच संतांच्या दृष्टीनेंहि तो वेडा ठरला. पण बोटाला सुई टोंचली कीं डोळ्यांत पाणी उभे राहावें तशी नामदेवाची स्थिति होती. विधात्यानें त्याची ही अशी घडण घडविली होती त्याला तो तरी काय करणार ? कमळाकरचा मुलगा मेला होता हें नामदेवाला कळलें होतें व तो व्यथित झाला होता. समोरच्या दुःखानें नामदेव कळवळला तर नवल नव्हतें पण दृष्टीआड जें घडलें होतें त्यानेंहि नामदेव कळवळला होता. जेव्हां कमळाकरच्या तोंडून मुलगा मेलेला आहे पण संतांनीं परत जाऊं नये म्हणून आपण बोललों नाहीं असें कळलें तेव्हां नामदेवाच्या हट्टाचा अर्थ संतांना समजला व त्याचा मोटेपणा त्यांना उमगला. सारे संत त्यावेळीं वेडे ठरले नि नामदेव शहाणा ठरला. विठ्ठलाच्या नामस्मरणानें त्यानें त्या ब्राह्मणपुत्रास जीवदान दिलें तेव्हां त्याच्या अंतःकरणांत चंदनाचें झाड फुलल्याचा संतांना भास झाला.

**नाम घेतां तत्क्षणीं । चित्रगुप्तें सांडिली लेखणी ॥**
**नामा म्हणे जरी हें लटके । तरी छेदावें मस्तक— ॥**

नामाचा महिमा अगाध खरा, पण नामदेवाच्या भक्तीनें तें नाम घेतां आलें पाहिजे.

तुकारामासारखा नामदेवहि देवाशीं भांडतांना दिसतो. एका अभंगांत तो " लबाड तूं देवा, लबाड तूं देवा । लबाड तूं देवा ठाव आम्हां " असें म्हणतांना दिसतो तर दुसऱ्या अभंगांत " तुझा माझा देवा का रे वैराकार । दुःखाचे डोंगर दाखविसी " म्हणून खडसावतो व धमकी देतो " नामा म्हणे देवा करा माझी कींव । नाहीं तरी जीव घ्यावा माझा " देवाशीं केलेल्या ह्या कलहांतहि नामदेवाचें मोठें प्रेम आहे. त्याला दिलेल्या शिव्यांतहि एक प्रकारचें वात्सल्य आहे आणि त्याच्यापासून दूर जाण्यांतहि त्याची जवळीक साधण्याचीच धडपड आहे. " डोळुले शिणले पाहतां वाटुली " म्हणून आतां तरी भेट दे म्हणून नामा जेव्हां देवाचा धावा करतो तेव्हां तर त्याच्या मनांतील सारी आर्तताच जणूं बाहेर पडते. तो देवाकडे नुसती प्रेमाची शिदोरी मागतो आणि म्हणतो,

**पंढरीचा वास चंद्रभागे स्नान । आणिक दर्शन विठोबाचें ॥**
**हेंचि घडो मज जन्मजन्मांतरीं । मागणें श्रीहरी नाहीं दूजें ॥**

नामदेवाची दुसरी कसलीहि इच्छा नाहीं आणि मागणेंहि नाहीं !

तुझ्या दारांतून मला हलवूं नकोस, तुझ्यापासून दूर करूं नकोस, मला दूर लोटूं नकोस, सदासर्वकाळ ह्या ना त्या मिषानें मला तुझ्या जवळच राहूं दे अशी मागणी करतांना त्याच्या प्रतिभेचा वसंत अगदीं फुलून गेल्यासारखा वाटतो. ह्या संबंधींचा अभंग इतका उत्कृष्ट आहे कीं तो संपूर्ण उद्धृत केल्याशिवाय राहवतच नाहीं.

**मनुष्य करिसी तरी भलीचेनि मिषें । तुझें द्वारीं वसें ऐसें करी**
**श्वान करिसी तरी उच्छिष्टाचेनि मिषें । तुझें द्वारीं वसें ऐसें करी**
**पक्षी करिसी तरी चारियाचेनि मिषें । तुझें द्वारीं वसें ऐसें करी**
**झाड करिसी तरी तुळसीचेनि मिषें । तुझें द्वारीं वसें ऐसें करी**
**वृक्ष करिसी तरी मंडपमेखाचेनि मिषें । तुझें द्वारीं वसें ऐसें करी**

काव्यकल्पना ह्या दृष्टीनेंसुद्धां हा अभंग म्हणजे एक उत्कृष्ट भावगीतच आहे. त्यांत जितकी काव्यशक्ति आहे तितकीच ईश्वरसन्निध

राहण्याची तळमळ आहे. देवाकडे असेंच मागणें मागतां मागतां अधिकार वाढत गेला. " मीच माझा देव, मीच माझा भक्त " " नामा तोची केशव आणि केशव तोची नामा " अशी परिस्थिति झाली. जवळीक वाढली तसा नामा म्हणतो,

तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज ।
तूं माझी कुरंगी मी तुझें पाडस
तूं अवकाश मी भूमिका । तूं लिंग मी शाळुंका
तूं समुद्र मी द्वारका । स्वये दोन्ही
तूं वृंदावन मी चिरी । तूं तुळशी मी मंजिरी
तूं पावा मी मोहरी । स्वये दोन्ही
तूं चांद मी चांदणी । तूं नाग मी पद्मिणी
तूं कृष्ण मी रुक्मिणी । स्वये दोन्ही
तूं नदी मी थडी । तूं तारी मी सांगडी
तूं धनुष्य मी भातोडी । स्वये दोन्ही
तूं शास्त्र मी गीता । तूं गंध मी अक्षता
नामा म्हणे पुरुषोत्तमा । स्वये जडलो तुझ्या प्रेमा
मी कुडी तूं आत्मा । स्वये दोन्ही

स्वतःला कुडी मानून ईश्वराला त्यांतला आत्मा करण्यांत नामदेवानें अगदीं कळस केला आहे. " देवा माझें मन आणि तुझे चरण । एकत्र करोन दिधली गांठी " इतका नामदेव देवापासून अभेद्य झाला आहे. " लपलासी तरी नाम कैसे नेसी " म्हणून तो देवाला सांकडें घालीत आहे. तुझ्या नुसत्या नांवानें मी माझ्या डोळ्यांपुढें तुझी मूर्ति उभी करूं शकेन असा त्याचा विश्वास आहे. " ज्याचे कटेवर हात नाहींत आणि जो विटेवर उभा नाहीं " त्याला तो देव मानायला तयार नाहीं इतकी त्याची विठ्ठलाविषयीं अपरंपार भक्ति आणि अढळ निष्ठा आहे. एक तुकाराम सोडला तर भक्तीच्या बाबतींत नामदेवाच्या रांगेंत कुणी बसूं शकेल असें मला तरी वाटत नाहीं. आणि मलाच कशाला ? त्या संतांनाहि असें वाटतें आणि

त्याची स्पष्ट कबुली त्यांनीं आपल्या अभंगांत प्रांजळपणें दिली आहे. एकनाथानें " पदकीं शोभे नामा शिंपा " म्हणून त्याचा गौरव केला आहे. नामदेव म्हणजे नामाचा देव. भक्तीचा देव. त्या दृष्टीनें त्यानें आपलें नांव सार्थ केलें आहे. पांडुरंगाच्या परीक्षेंत तो भक्तीच्या विषयांत पहिल्या वर्गांत पहिल्या नंबरानें उत्तीर्ण झाला आहे.

नामदेवाची आणि ज्ञानदेवाची भेट ही नामदेवाच्या चरित्रांतली मी एक मोठी गोष्ट समजतों. नामदेवासारखा भक्त आणि ज्ञानदेवासारखा ज्ञानी ह्यांच्या भेटींत काय काय घडलें असेल, त्यांचे काय काय संवाद झाले असतील हें कल्पनेनें जाणतांनाहि एक अननुभूत आनंद होतो. त्या प्रसंगाला जे संत प्रत्यक्ष हजर असतील त्यांच्या भाग्याचा हेवा वाटतो. कांहीं कांहीं वेळेला वाटतें कीं, मनुष्यदेहांत जरी नाहीं तरी वाळूच्या रूपानें मला चंद्रभागेंत पडतां आलें असतें आणि ज्ञानदेवांनीं आणि नामदेवांनीं एकांतांत केलेले संवाद ऐकतां आले असते तरी मी स्वतःला केवढें कृतार्थ मानलें असतें. नामदेवाच्या भक्तीचे सर्व संतांनीं गोडवे गाईले आहेत, प्रत्यक्ष ईश्वरानेंहि त्याच्यावर स्तुतिसुमनें उधळलीं आहेत. आपल्याबरोबर ज्ञानदेवानें त्याला तीर्थयात्रेस नेलें यांतच त्याच्या भक्तीचें मोठेंपण नाहीं काय ?

ज्ञानेश्वरांची व त्याच्या समाधीची आपणांस जी कांहीं माहिती आज उपलब्ध आहे त्याला कारण नामदेव व अभंग आहेत. त्यानें " ज्ञानदेवांची आदि " " तीर्थावळी " " ज्ञानेश्वरांची समाधि " इत्यादि प्रकरणें लिहून आपल्यावर मोठे उपकार करून ठेवले आहेत. ते उपकार आपण कधींच विसरतां कामा नयेत. ज्ञानेश्वरांनीं समाधी घेतली त्यावेळेस " नाथा नकोरे अंतरूं । तुझ्या कासेचें मी वासरूं " हा त्यांनीं केलेला आक्रोश कोणालाहि विव्हलच करील. ज्ञानेश्वरांनीं भागवतधर्माचें बीज पेरलें व नामदेवानें त्यापासून उगवलेल्या रोपट्याची नीट जोपासना केली. त्यानें पांडुरंगाचें नांव महाराष्ट्राच्या सीमेबाहेर पंजाबांतसुद्धां लोकप्रिय केलें. नामाच्या मालाची जेव्हां त्यानें बाजारपेठ उघडली तेव्हां त्याच्याएवढा मोठा दुसरा व्यापारी

नव्हता. तुका वाणी पुढें जेव्हां ह्या व्यापारांत शिरला तेव्हां भागवत-धर्माचा वृक्ष चांगलाच फोफावला होता.

पण नामदेवाची इतकी तयारी होती तरी त्याला गुरूपदेश झाला नव्हता. गोराकुंभारानें थापटी मारून त्याचें मडकें कच्चेंच असल्याचें जाहीर केलें. मुक्ताईनें तर त्याची चांगलीच रेवडी उडविली. नामदेवाला तो मोठा अपमान वाटला. एखाद्या लहान मुलानें रडत रडत आपल्या आईकडे गाऱ्हाणें न्यावें त्याप्रमाणें नामदेव त्यावेळीं पांडुरंगाकडे गेला. पांडुरंगानें त्याची समजूत काढली व त्यास विसोबा खेचराचा उपदेश घेण्यास सांगितलें. विसोबा खेचराचा उपदेश मिळाल्यावर मात्र नामदेवाच्या भक्तीला एक आगळेंच स्वरूप प्राप्त झालें. खेचरानें त्यास सांगितलें,

**जरी म्हणसी देव देखिला । तरी हा बोल भला नव्हे नाम्या**
**जोंवरी मी माझें न तुटे । तंव आत्माराम कैसेनि भेटे**
**तुझें निजसुख तुजपाशीं आहे । विचारुनि पाहे मनामाजी**
**विवेक वैराग्य शोधूनियां पाहे । तणें तुज होये ब्रह्मप्राप्ती**

विसोबा खेचरानें त्यास असा उपदेश केल्यावर नामदेव सर्वत्र ईश्वर पाहूं लागला. तो जेवत असतांना कुत्रा भाकरी घेऊन पळाला असतां त्याचें पोट दुखूं नये म्हणून नामा त्याचेमागें तुपाची वाटी घेऊन धांवला. नामा म्हणतो,

**तूप घे गा जगजेठी । कोरडी रोटी कां खाशी**

तेव्हां कुत्र्याच्या रूपांतला विठ्ठल त्याला विचारतो,

" नाम्या, अरे हें ज्ञान तुला कसें झालें ? "

नाम्या म्हणतो,

**खेचरें उपदेशिलें । सर्वांभूतीं विठ्ठल**

आपल्या भक्तांत आतां कसलाच उणेपणा नाहीं म्हणून विठ्ठलालाहि धन्यता वाटली. शेवटीं विठ्ठलहि त्यास म्हणाला,

**घेरे घेरे नाम्या दिलें माझें प्रेम ।**
**घोकी माझें नाम सर्वकाळ ॥**

नामदेवानें आयुष्यांत भक्तीची खूप कमाई केली होती व प्रत्यक्ष विठ्ठलाचा हा वरदहस्त म्हणजे त्यांतला कळस होता.

नामदेवानें निरनिराळ्या संतांवर अभंग लिहिले, आरत्या लिहिल्या, गौळणी लिहिल्या, भूपाळ्या केल्या, श्रीकृष्णलीला वर्णिल्या व राममहात्म्य सांगितलें. ज्ञानदेव, चांगदेव, मुक्ताबाई इत्यादि संतांच्या समाधीच्या वेळचें त्यांनीं केलेलें वर्णन मन हेलावणारें आहे. नामदेवाच्या मनाला दुःखानें पडलेला पीळ ह्या अभंगांत पहावयास सांपडतो.

"**युगे अठ्ठावीस विटेवरी उभा**" ही विठोबाची प्रसिद्ध आरती नामदेवाच्या लेखणींतूनच उतरलेली आहे. महाराष्ट्राच्या देवळादेवळांतून ती मोठ्या भक्तिभावानें म्हटली जात आहे. जोंपर्यंत महाराष्ट्र त्याच्या विठोबाला विसरणार नाहीं तोंपर्यंत मराठी भाषा बोलणारा कोणताहि आसामी त्याच्या भक्ताची ही अर्थपूर्ण आरतीहि कधीं विसरणार नाहीं. ही आरती म्हणजे नामदेवाचें एक चालतें बोलतें स्मारक आहे.

"**उठा पांडुरंगा आतां दर्शन द्या सकळां**" ही भूपाळी नामदेवाचीच. आजोबा उठले कीं प्रथम ते ही भूपाळी म्हणत व आपल्याबरोबर देवालाहि उठवीत. थंडीच्या दिवसांतसुद्धां आजोबांच्या ह्या कार्यक्रमांत कधीं फरक पडला नाहीं. ह्या भूपाळीची त्या काळांत माझ्यावर अशी मोहिनी पडली होती कीं आजोबांनीं म्हट-लेली ती भूपाळी कानांवर आली कीं मी पांघरूण फेंकून देऊन त्यांच्या खोलीकडे जात असे. माझ्या ह्या गोष्टीचें आईला मोठें कौतुक वाटे. "कृष्णा थमाल ले थमाल आपुल्या गाई" ही नामदेवानें रचलेली एक बोबडी गौळण त्यावेळेस मला आईनें शिकविली होती.

काव्याचा नि कल्पनेचा किती सुंदर मनोरा नामदेव उभारू शकतो ह्याचा एक पुरावा म्हणून त्याची एक अत्यंत सुंदर गौळण मी खालीं देत आहें.

रात्र काळी घागर काळी ।
यमुना जळही काळी वो माय
बुंथ काळी बिलवर काळी ।
गळां मोती एकावळी काळी वो माय
मी काळी काचोळी काळी ।
कांस कांसली ते काळी वो माय
एकली पाणीया नव जाय साजणी ।
सवें पाठवा मूर्ति सांवळी वो माय
विष्णुदासा नाम्याची स्वामिणी काळी ।
कृष्णमूर्ति बहु काळी वो माय

काळा रंगहि आवडावा, त्याच्याविषयीं प्रीति वाटावी असा हा अभंग आहे.

गोकुळ सोडून कृष्ण मथुरेस चालला असतां नामदेवानें त्या प्रसंगाचें वर्णन असेंच चटका लावणारें केलें आहे. नामदेव म्हणतो,

**उदास दिसती वनें दाही दिशा । वत्सें न करिती स्तनपान**
**अन्नपाणी तेव्हां वर्जिती गौळणी । यमुनेचे तीरीं वृक्ष ते सुकले**
**पाषाण उलले तया दुःखे...**

आणि नामदेवानें सर्वांत कहर केला आहे तो असा कीं,

**चिमण्या बोलती कृष्ण कृष्ण । शुक बोलती कृष्ण कृष्ण**

सर्व प्राणीमात्रांना झालेलें दुःख आणखी दुसऱ्या कुठल्या शब्दांत साकार होऊं शकेल ? अशा रीतीनें सर्वांचे प्राण झालेल्या कृष्णानें वेणुवादन सुरू केलें तेव्हां नामदेव वर्णन करतो,

**त्रिभंगी देहुडे उभे वृंदावनीं । वेणु चक्रपाणी वाजवित**
**तयावरी गोपी टाकताती माना । बाळे स्तनपाना विसरताती**
**सर्प आणि नाग मुगुंसे बैसती । जळेंहि विसरणें वाहणें तें**

म्हणजे श्रीकृष्णाची बांसरी ऐकून पाणीपण वहाणें थांबलें ! शाबास नामदेव ! ह्या नि असल्या कल्पना पाहिल्या कीं वाटतें नामदेव

जसा भक्तींत कमी नव्हता तसा काव्यकल्पनेंतहि कमी नव्हता. आणि ह्या कल्पनासुद्धां भरजरी !

भक्ति आणि विठ्ठलप्रेम हा नामदेवचरित्राचा तर भलाभक्कम पाया आहे. त्याच्या अनुरोधानें त्यानें अनेक वळणें, वेलांट्या आणि वळसे घेतले आहेत. देवापेक्षांहि भक्त श्रेष्ठ आहे असें सांगतांना एके ठिकाणीं तो म्हणतो,

" पतीत अनेक आहेत तर पावन तूं एकटाच आहेस. लोखंड नसतें तर परिसाची काय दशा होती ? जर याचक नसते तर कल्पवृक्ष उन्मळून पडले असते. हे देवाधिदेवा, अरे आम्ही आहोंत म्हणून तूं आहेस. आम्हींच तुझें नांव इतकें प्रसिद्ध केलें आहे. नाहीं तर तुला कोण विचारतो ? "

देव प्रसन्न झाल्यावरहि त्याच्याकडे काय मागावें म्हणून नामदेवाला कोडेंच पडतें. तो म्हणतो,

" काय मागावें बरें ? माथ्याचा मुकुट मागावा तर तो तूं इंद्राचा आणला आहेस. कर्णांतील कुंडलें मागितलीं तर तीं तूं कर्णाचीं आणलीं आहेस. पीतांबर मागितला असता पण तो तूं नेसून बसला आहेस. शंख मागावा तर तो तुझ्या हातांत आहे. त्याच्याशिवाय तुझा हात सुना दिसेल. वैजयंती माळ मागावी तर तुझा गळा उघडा पडेल. तेव्हां तुझ्याकडून काय मागावें बरें ? " शेवटीं नामा म्हणतो,

**नामा म्हणे कांहीं न मागो । तुझे चरणीं लक्ष लागो**

ह्या अभंगांतली मनाची कोवळीक, विठ्ठलभक्ति, उत्कटता, गोंधळ, प्रामाणिकपणा सारेंच किती भुरळ पाडणारें आहे ! नामदेवाचे असे किती म्हणून अभंग मी रसिकांपुढें ठेवूं ? सुलभता, सहृदयता, समर्पक शब्दयोजना, मनोहर वर्णनशैली आणि उच्च दर्जाची भक्तीनें चिंब झालेली प्रतिभा हे नामदेवाचे विशेष आहेत.

सर्व संतांत पुष्कळ आयुष्य लाभलें नामदेवालाच ! जनीसारखी नवनीत अंतःकरणाची दासी लाभली त्यालाच ! पांडुरंगाचें खरेंखुरें

प्रेम आलें तेंहि त्याच्या वांट्यालाच ! महाराष्ट्राचा हा थोर संत वयाच्या ८१ व्या वर्षी पंढरपुरांत देवासमोर पायरीखालीं समाधिस्त झाला. भक्तीनें देवाच्या पायाशीं कायमची वस्ती केली. पंढरपुरांतली नामदेवाची पायरी म्हणजे भक्तीची एक भली मोठी पायरी आहे !

**महाद्वारीं सुख असे या सुखाचे**
**लागोती संतांचे चरणरज ।**
**नामा म्हणे आम्ही पायरीचे चिरे**
**संतपाय हिरे देती वरु—**

हिऱ्याप्रमाणें ज्या संतांचे पाय आहेत त्यांची आपल्याला चरणधूलि लागावी व आपली पायरी चढून त्यांनीं पांडुरंगाचें दर्शन घ्यावें ही नामदेवाची अंतर्यामींची खरीखुरी इच्छा ! पण भक्त असे वस्ताद कीं पायरी चढून जाण्यापेक्षां ते ती ओलांडून जातात नि नामदेवाची इच्छा अपुरीच ठेवतात. ते नामदेवाचा पराभव करतात आणि भक्तीचें महत्त्व वाढवितात. आणि नामदेव तरी काय ह्या असल्या भक्तीपासून निराळा आहे ? त्याचा संतांनीं केलेला पराभवहि गोड वाटतो. कारण तो तर साऱ्या भक्तांचा मुकुटमणी आहे !

• • •

# बारामतीचीं बोरें

स्थळप्रत.



सौंदळ गांव शांतपणें झोंपलें होतें. पहांटेचीं नक्षत्रें आकाशांत अवतीर्ण झालीं होतीं. कोंबड्यांचें आरवणें पहांट सुचवीत होतें. भालेकर वाडींत शंकराच्या देवळानजिक छपराची बैलगाडी उभी होती. रामाजीपंत पराडकर कंदील घेऊन बाहेर आले आणि त्यांनीं गाडींत सामान भरलें. सामान चढवल्यावर आपल्या मंडळींना त्यांनीं हांक मारली. गोरीपान लक्ष्मी बाहेर आली. गर्भारपणामुळें तिचीं पावलं जड पडत होतीं. रामाजीपंतांनीं आणि लक्ष्मीनें घरच्या मंडळींचा निरोप घेतला. दरवाजावरच्या गणपतीच्या पायाला हात लावून त्याची पायधूळ कपाळाला लावली. रामाजीपतांनीं लक्ष्मीला आधार देऊन वर चढविलें. गाडी सुरू झाली. बैलांच्या गळ्यांतील घुंगरं वाजूं लागलीं. खालीं लावलेला कंदील पुढें मागें हेलकावूं लागला. चाकें गतीनें फिरूं लागलीं तसं सौंदळ गांव दूरदूर जाऊं लागलें. रामाजीपंत कोंकण सोडून पन्हाळगडच्या वाटेला लागले. घाटमाथा उतरून गाडी उताराला लागली नि कोल्हापूरची हद्द सुरू झाली.

सह्याद्रीशीं काटकोन करून कोल्हापूरच्या वायव्य दिशेस बारा मैलांवर पन्हाळगड खडा उभा आहे. ताराबाईंची खास स्वारी तेथें असल्यामुळें त्यावेळीं पन्हाळगड गजबजलेला असे. मुख्य राजधानी आणि दरबाराची जागा हीच. मोहराच्या वासानें भुंगे जमावेत तसे निरनिराळे कलावंत आणि जाडेजाडे विद्वान् श्रीमंतांच्या आश्रयास त्यावेळेस पन्हाळगडावर येत. रामाजीपंत नशीब काढण्याकरतांच आपल्या गर्भवती स्त्रीस घेऊन पन्हाळा चढले होते.

आठ दिवसांनंतर मुक्काम करीत करीत रामाजीपंतांची गाडी महालकचेरीजवळ सोनाळे तळ्याच्या कांठीं वळली व डाव्या बाजूनें थोडी पुढें जाऊन थांबली. बैल थांबले नि घुंगरं वाजायचीं बंद झालीं. लक्ष्मीनें बाहेर पाहिलें. समोर एक छोटेंसें कौलारू घर होतें, रामाजी-पंतांनीं तिला हात दिला व त्या आधारानें ती खालीं उतरली.

सूर्योदय नुकताच झाला होता. पन्हाळ्यावर सोनेरी रंगाची उधळण झाली होती. पक्ष्यांची किलबिल वाढली होती. आठ

दिवसांच्या प्रवासांतील दगदगीनें सगर्भा लक्ष्मी त्रासली होती. प्रवास संपला तेव्हां तिला प्रसन्न वाटलें. रामाजीपंत व पाध्ये यांच्या घराच्या वळचणी एकमेकीला लागलेल्या होत्या. गाडीची चाहूल लागल्यावर पाध्यांच्या घरांतून दोन सुवासिनी भाकरी ओवाळून टाकायला लगबगीनें बाहेर आल्या. लक्ष्मी पायरीवर उभी राहून समोरच्या सोनाळे तळ्याकडे पहात होती. चोहोंबाजूंनीं तट आणि घाट बांधलेले आहेत, तीरावर सोनचाफे फुलले आहेत, हें पाहून तिला समाधान झालें. एका क्षणांत तिला पन्हाळ्याविषयीं आपुलकी वाटूं लागली. तिच्या गर्भातील जीव सुखानें थरारल्याचा तिला भास झाला. डोळ्यांतून ओघळणारे अश्रू तिनें पदरानें टिपून घेतले. पाध्यांच्या बायकांनीं लक्ष्मीच्या पायांवर पाणी घालून तिच्यावरून भाकरी ओंवाळून टाकली. त्यांच्या मागोमाग लक्ष्मी घरांत गेली; रामाजीपंतांचा संसार थाटायला.

× × ×

श्रावणाचे दिवस. गडावर पाऊस वेड्यासारखा कोसळत होता. सारा गड हिरव्यागार वनश्रीनें हिरवटला होता. बाहेर पडण्याची सोय नव्हती. नित्य व्यवहाराकरितां माणूस बाहेर पडेल तेवढाच. सोप्यांत बसून लक्ष्मी समोरच्या सोनाळे तळ्याकडे पहात होती. आज आठ पावसाळे तिनें ह्या गडावर काढले होते. पण सोनाळें एवढें दुथडी भरून वाहिलेलें तिनें कधींच पाहिलें नव्हतें. आठ वर्षांपूर्वी एका रम्य समयीं तिनें ह्या घरांत प्रवेश केला होता तेव्हां ती सगर्भा होती. आणि आतां मोरूची मुंज होऊन आपल्या हुदडण्यानें त्यानें तिला सळो का पळो करून सोडलें होतें. दिवस इतके भरभर सरले होते.

दाराची कडी वाजली म्हणून लक्ष्मी बाहेर आली. दारांत गणेश पाध्ये उभे होते.

" रामाजीपंत आहेत का घरांत ? "


" लघुरुद्राला गेलेत. "

" ठीक आहे. माझं तसं कांहीं काम नाहीं. उद्यां श्रावणी सोमवार. संध्याकाळीं मोरूला जेवायला पाठवा आमच्याकडे. "

" बरं, येईल तो. "

" मग येऊं मी ? "

" या. "



डोक्याचें क्षौर केलेलें. तबल्याच्या शाईच्या आकाराएवढा घेरा. वर भुरुभुरू शेंडी उडते आहे. अशा थाटांत सोंवळ्याची लंगोटी नेसलेला, यज्ञोपवीत धारण केलेला आणि चांदीची झारी हातीं असलेला मोरू उड्या मारीत मारीत सोमवारीं संध्याकाळीं पाध्यांच्या घरीं आला.

मोरोबाला एकटें हिंडण्याचा, पोथीचें जें पान दिसेल तें वाचण्याचा, खडूनें भिंतीवर खरडण्याचा व आपल्या मनाशींच गुणगुणत हाताचा डावा पंजा हलविण्याचा विलक्षण नाद होता. पानें वाढायला अवकाश आहे असें पाहून लंगोटी नेसलेले मोरोबा उड्या मारीत मारीत मागच्या दारीं गेले व स्वतः रचलेला एक वेडावांकडा श्लोक त्यानें तुळशीवृंदावनावर खरडला. दोन दिवसांनीं तो श्लोक गणेश पाध्यांच्या दृष्टीस पडला. त्यांनीं चौकशी केली. तेव्हां ही पद्यरचना मोरूची असल्याचें त्यांना कळलें. गणेश पाध्ये संतुष्ट झाले. रामाजीपंतांकडे गेले.

" यावं, यावं. "

" सोमवारीं मोरू आमच्याकडे जेवावयास आला होता. "

" हो, कळलं मला. मी लघुरुद्राला गेलों होतों; मंडळी म्हणाली."

" रामाजीपंत, एक भीक घालाल ? "

" गणेशपंत, काय बोलणें हें ? भीक कसली मागतां ? हुकूम करा. "

" मागणं द्याल ? "

" द्यायचा प्रश्नच नाहीं. सारं आपलंच आहे. "

" मोरूला विद्याभ्यासास पाठवाल माझ्याकडे ? "

" प्रत्यक्ष सरस्वतीचं आमंत्रण असतां मी अव्हेर करीन ? "

रामाजीपंतांना गहिंवर आला. त्या काळांत वेदशास्त्रसंपन्न गणेश पाध्यांसारख्यांनीं एखाद्याचा उंबरठा ओलांडून मुलाला विद्याभ्यासास पाठवा सांगणें ही गोष्ट कांहीं अगदींच सामान्य नव्हती. गुरूच्या घरीं मोरू जेव्हां पहिल्याप्रथम निघाला तेव्हां कानशिलावरून आईनें बोटें मोडलीं व पदरानें डोळे पुशीत त्याला निरोप दिला.

मोरोबाला बारावें संपून तेरावें वर्ष लागलें. गुरूच्या घरीं येण्यापूर्वींच त्याच्या आईनें त्याच्याकडून निरनिराळ्या आरत्या, मनाचे श्लोक, तुकारामाचे अभंग पाठ करून घेतले होते. फुरसतीच्या

वेळांत रामाजीपंतांनीं पण मोरूला रूपावली, समासचक्र शिकविलें होतें. गुरूच्या घरीं आल्यावर गणेशपंतांनीं एक दिवस त्याला विचारलें,

" रामरक्षा झाली ? "

" झाली. "

" आतां कुठला पाठ घेतला आहेस ? "

" पुरुषसूक्त घेतलें आहे. "

" शाबास. उद्यां सकाळीं मी इथें नाहीं. "

" बाहेर कामगिरी आली आहे ? "

" होय. एक काम करशील ? "

" सांगा ना ? "

" उद्यां मुलं आलीं कीं त्यांचेकडून गणपती अथर्वशीर्ष घ्यायचं. जमेल ? "

" घेईन मी. "

" समजा दुपारपर्यंत माझं येणं नाहीं झालं तर...... "

" कौमुदी व काव्यालंकाराचे पाठ घ्यायचे ना ? "

" बरोबर ! तूं असलास म्हणजे मला कांहीं काळजी नाहीं बघ. "

" बरं, येतों मीं. "

" थांबा, पाया पडतों आपल्या. "

" शतायु भव ! "

स्वतःचा व्यासंग वाढवीत आणि आपल्या गुरूला मदत करीत मोरोबाचा हा गुरुसहवासाचा काळ मोठ्या मजेंत गेला.

मोरोबाचे गुरु गणेशपंत मोठे कर्मनिष्ठ ब्राम्हण होते. त्यांचा स्वभाव मोठा तापट होता. त्यांचे ठायीं निर्लोभीपणा व निस्पृहता हे गुण वाखाणण्यासारखे होते. मोरोबावर गणेशपंतांचें विशेष प्रेम होतें. इतरांवर रागावणारे व वसकन् अंगावर येणारे गणेशपंत मोरोबाशीं मृदु आवाज़ांत बोलत व लोण्यासारखे मऊपणानें वागत. कुठल्याहि

शिष्याला अजूनपर्यंत जो मान मिळाला नव्हता तो एक दिवस मोरोबाला मिळाला. गणेशपंत जिजाबाईला पुराण सांगावयास जात असत. एक दिवस ते मोरोबाला घेऊन वाड्यावर गेले. गणेशपंतांचें पुराण रंगांत आलें होतें. जिजाबाई तल्लीन झाल्या होत्या. बैठकींतले लोक डोलत होते. तोंच कारभारी आला म्हणून जिजाबाई त्याच्याशीं बोलूं लागल्या. हें पहातांच गणेशपंत अंमळ उग्र झाले. त्यांनीं पोथी बंद केली व वस्त्रांत गुंडाळून घरीं पाठविली. कारभारी गेल्यावर ते जिजाबाईस म्हणाले,

"तुम्ही एकावेळीं अनेक कामें करतां, उद्यांपासून आम्ही वाड्यांत पाऊलसुद्धां ठेवणार नाहीं. समजलं?" विस्फारलेल्या नजरेनें मोरोबा आपल्या गुरूकडे पहातच राहिला.

× × ×

मोरोबा धोतर नेसूं लागले तेव्हां घरची आर्थिक परिस्थिति सांभाळणेंसुद्धां त्यांना क्रमप्राप्तच झालें. कंबरेवर धोतर आलें नि खांद्यावरची जबाबदारी वाढली. उदरनिर्वाहाची पंचाईत पडूं लागली. तेव्हां मोरोबांनीं विसाव्या वर्षीं फडावर कारकुनीची नोकरी धरली. तीन वर्षांच्या ह्या नोकरीनंतर त्यांच्या कामांत पाव आण्याची चूक झाली. उलटसुलट आंकडेमोड झाली. खोडाखोड झाली. पुन्हां पुन्हां लिहिलें गेलें नि खोडलें गेलें. पण चूक कांहीं सांपडेना आणि मोरोबांनाहि चैन पडेना. हिशेबाचे कागदपत्र त्यांनीं घरीं आणले. जेवण झाल्यावर समई तेवत ठेवून चूक काढण्यासाठीं ते रात्रभर जागत बसले. तेल जळत होतें आणि चूक कांहीं सांपडत नव्हती. तीन घटका रात्र उलटून गेल्यावर त्यांना चूक सांपडली व त्या आनंदाच्या भरांत त्यांनीं टाळी पिटली. मोरोबांची तंद्री पाहून व त्यांची आनंदाची टाळी ऐकून जवळच बसलेली त्यांची पत्नी म्हणाली,

"किती कष्ट करायचे तरी?"

"रमा, अग नकोत का कष्ट करायला?"


"असं नाहीं मी म्हणत. पण..."

“ मग काय म्हणणं तुझं ?...”

“ पाव आण्याची चूक काढण्यासाठीं इतके कष्ट करतां ...”

“ तर काय......?”

“ तर गणेश पाध्यांसारखीं वाड्यावर पुराणं सांगितलीं तर...”



“ चेष्टा करतेस होय, रमा ?”

“ चेष्टा कसली ? पहा बाई, चांगलं सांगायला जावं तर...”

“ तुझे बोल खरे ठरले तर मला का नको आहे रमा...”

“ श्रीहरीची इच्छा असेल तर तसंहि होईल.”

“ होय, रामनामानें दगड तरले, मग मोरोपंत कां तरणार नाहीं ?”

“ साधा दगड नव्हे. परीस, चांगला परीस बरं...”

“ श्रीहरी, श्रीहरी !”

“ उद्यां तें ओंवीरामायण पुरें करा पाहूं आधीं...”

" सरकारचा हुकूम मोडणें एकवेळ सोपें, पण स्वस्त्रीचा..."

" निजा आतां. रात्रीचे तीन प्रहर सरले. उद्यांला उठायला हवं ना लवकर."

पंतांच्या अंगावर रमाबाईनें नीट पांघरूण घातलें. समईची वात काडीनें मागें सारली. रमेच्या शब्दांचा मोरोपंतांवर फार परिणाम झाला होता. काळोखांत पंतांच्या तोंडून रामनाम उमटत होतें.

बाबूजी नाईकांनीं पन्हाळगड सोडला व त्यांचे आश्रित रामाजीपंत पण बारामतीस गेले. रामाजीपंतांनीं बोलावणें धाडलें म्हणून मोरोबांनीं पन्हाळगड सोडला व रमेसह ते पितृदर्शनार्थ बारामतीस आले. पंचवीस वर्षांच्या ह्या तरुणाच्या रूपानें आपल्या गांवांत एक अमूल्य रत्न आलें आहे ह्याची त्या वेळेस बारामतीकरांना कल्पनाहि नसावी. नंतरच्या काळांत गुरुदर्शनार्थ मोरोबा जरी दहापांच वेळां पन्हाळगड चढले तरी त्यांचा पन्हाळगड कायमचा सुटला.

मोरोबांना आतां रामायण, महाभारत, भागवत यांचें वेडच लागलें. त्यांनीं हे ग्रंथ कितीतरी वेळां वाचले. व्यासंग वाढवून त्यांनीं बारामतीकरांस ह्या तीन ग्रंथांवर पुराणेंहि सांगितलीं. ह्या शिवाय ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, रामदास, मुक्तेश्वर, वामन, श्रीधर, नामदेव, महिपती ह्यांचे ग्रंथ त्यांनीं स्वतः तर वाचलेच, पण लोकांनाहि त्याच भक्तीनें समजावून दिले. पंतांच्या रसाळ वाणींतून पुराण ऐकतांना बारामतीकरांना तृप्तीचें समाधान लाभलें.

पन्हाळगडावर मोरूचा मोरोबा झाला आणि बारामतींत त्यांचें रूपांतर मोरोपंतांत झालें. शेवटीं सारी बारामती त्यांना 'पंत' म्हणून ओळखूं लागली. पंतांची कीर्ति बाबूजी नाईकांच्या कानांवर गेल्यावर त्यांनीं रामाजीपंतांना आपल्या चिरंजीवास बरोबर घेऊन वाड्यावर बोलाविलें. पंतांनीं साऱ्या शिवकवचाचा अर्थ बाबूजी नाईकांना जेव्हां आर्येंत रचून सांगितला तेव्हां ते संतुष्ट झाले. पंतांविषयींचा त्यांचा आदरभाव वाढला. त्या रात्रीं भोजनप्रसंगीं पंतांना एकावन्नाव्या पाटावरून शेजारीं दुसऱ्या नंबरच्या पाटावर

बसावयास बोलाविलें. पण पंत उठेनात. ते कांकूं करूं लागले. ते म्हणाले,

" नको, नको. इथेंच बरा आहें मी. "

" वा, वा ! पंत, अहो इकडे यावं. जवळ बसावं असं माझ्या. "

पुष्कळ आग्रह करूनहि पंत उठले नाहींत.

नाईकांचे कारभारी दाजीबा मोठे चाणाक्ष होते. त्यांनीं पंतांच्या वडिलांना दुसऱ्या पाटावर बसविलें व मग पंत तिसऱ्या पाटावर बसले. पंगत सुरू झाली. उत्तमोत्तम पदार्थ पानांत असतांनाहि रामाजीपंतांना जेवण गोड लागेना. मुलाच्या गौरवानें आणि त्यांनीं आपला मान ठेवला म्हणून त्या पित्याची तृप्ति झाली होती. न जेवतांनाहि त्यांना तृप्तीचा ढेकर आला होता.

मोहोर नाहींसा व्हावा नि त्या ठिकाणीं आम्रफल दिसूं लागावें त्याप्रमाणें रामाजीपंतांनीं मुलाचें वैभव पाहिलें नि ते ह्या जगांतून अदृश्य झाले. मृग जावा नि कस्तुरी राहावी, गाणं संपावं नि लकेर तरंगावी, पावसाची शिंपडण व्हावी नि मृदुगंध उठावा त्याप्रमाणें रामाजीपंतानंतर मोरोपंत यजमान झाले आणि त्यांचे गुण-सुगंध दरवळूं लागले.

रामाजीपंताची जागा जशी मोरोपंतांनीं घेतली होती तशी दुसऱ्या बाजूचीं प्यादींसुद्धां पुढेंमागें सरकलीं होतीं. श्रीमंत बाबुराव वारले व त्यांचे चिरंजीव पांडुरंगराव नाईक गादीवर आले. जिलबीला केशराची जी शोभा तीच पांडुरंगरावांच्या श्रीमंतीला रसिकतेची. त्यांनीं पंतांकडून हरिवंश लिहून घेतला.

नाईक बारामतीस सदासर्वकाळ नसत. आठ महिने स्वारी-शिकारीस जात व चातुर्मास घरीं काढीत. श्रीमंतांच्या वाड्यावर त्यावेळीं पंतांचीं पुराणं चालत. सारे सभ्य, रसिक नि भाविक बारामतीकर श्रीमंतांच्या वाड्यावर पुराणं ऐकावयास येत. श्रीमंतां-प्रमाणें सारे बारामतीकर पंतांवर लुब्ध होऊन गेले होते.

त्या दिवशीं श्रावणी सोमवार. पंतांचें पुराण ऐकायला वाड्यावर

रीघ लागली होती. एरवीं बंद असलेले मोठमोठे दिंडीदरवाजे पंतांचें पुराण ऐकावयास तमाम जनतेला खुले केले होते. पंत आसनावर बसले होते. समोर हिरवं लुगडं नेसून, हिरव्या बांगड्या घालून रमाबाई बसल्या होत्या. चार डोळे एकमेकांना निरखीत होते. पंतांच्या डोळ्यांत हिरव्या बांगड्यांचा प्रकाश पडला होता. तर रमाबाईंच्या डोळ्यांत पंतांच्या कपाळावरच्या केशरी गंधाचा. श्रीमंत स्वारी आली. हुजऱ्याची ललकारणी हवेंत विरली. स्वारी आसनावर विराजमान झाल्यावर कारभाऱ्यांनीं खूण केली. रामनामाचें स्मरण करून पंतांनीं पुराणास सुरुवात केली.

**जरि शुचिमूर्ति सुवृत्ता मान्या श्रवणोचिते गुणे मुक्ता ।**
**विद्धा जडाहिते हे अगुणहि तीस करि उणे उक्ता ॥**

गडबड बंद झाली. श्रोते सर्वांगाचे कान करून संत मुक्ताबाईचें चरित्र ऐकूं लागले. अभिषेकपात्रांतून पाणी झरावें तसे पंतांच्या तोंडून शब्द पडूं लागले. त्यांना पावित्र्य होतें, मधुरता होती नि खंड नव्हता. पंत सांगत होते.

" मोती शुभ्र आहे; मुक्ताबाई पवित्रदर्शना आहे. मोती वाटोळें आहे; मुक्ताबाई सर्वांग सुंदर अशा आचरणाची आहे. मोती कानांत घालण्यायोग्य आहे; मुक्ताबाई श्राव्यगुणा आहे. "

श्रोते माना डोलवीत " वाहवा, वाहवा " म्हणत होते. पंत पुढें म्हणाले,

" पण जन हो, मोती व मुक्ताबाई यांचें साम्य येथवरच आहे. कारण मोत्यांत जे महादोष आहेत ते मुक्ताबाईत नाहींत. मोती जड पाषाण आहे. मुक्ताबाई सचेतन आत्मरूप आहे. मोती विद्ध, सच्छेद आहे म्हणून क्षुद्र. मुक्ताबाई कोणत्याहि दोषानें बद्ध नाहीं, अगर अंगानें विद्ध नाहीं. म्हणून जनहो, व्यवहारांत मोठमोठे टपोरे पाणीदार मोतीं पाहून तुम्हीं त्याला भुलतां, चौकड्यांत घालून कानांत घालतां. पुरुषांच्या भिकबाळ्या तर बायकांच्या कुड्या. काय त्यांचा थाट नि काय त्यांचा झोक. पण

कितीहि झालं तरी मोती—ते पाषाणच ! त्यांच्या नादीं लागूं नका. त्याच्या लक्षपट मोलाची, पवित्रदर्शना, गेयचरिता व ब्रह्मपदाला पोहोंचलेली जी मुक्ताबाई तिचा आश्रय करा. तिचं भजन करा. तिच्या नादीं लागा. म्हणजे तुम्ही मुक्त व्हाल. ”

पंत दुसऱ्या दिवशीं व्यासपीठावर आले तर श्रीमंतांच्या कानांत भिकबाळी नव्हती. बायकांनींहि कुड्या केसाखालीं लपविल्या होत्या. पंत साऱ्या पुराणभर मिस्किलपणें हंसत होते. लोकांना कांहीं कळलं कीं नाहीं कुणास ठाऊक ! त्या दिवशीं पुराण संपल्यावर नाईकांनीं ‘ मोरोपंत पुराणिकांस ’ बारामतीस एक घर बक्षीस दिलें.

दिवाळींतला बीजेचा दिवस. बाजीराव पेशवे आपल्या बहिणीला ओवाळण्यास पांडुरंगराव नाईकांकडे आले होते. आपल्या सर्व आश्रितांची बाजीरावांशीं ओळख करून द्यावी म्हणून नाईकांच्या वाड्यांतून पंतांच्या घरीं बोलावणें गेलें. हुजऱ्या आला तर पंत झोपाळ्यावर बसले होते. समोर रमाबाई दुधाचें भांडें धरून उभ्या होत्या. पंतांच्या हातांत नुकतींच व्यायलेलीं मांजरीचीं पिलें होतीं. चमच्या चमच्यानें पंत त्यांना दूध पाजीत होते. हुजऱ्याला तो देखावा पाहून हंसूंच आलें. उतास आलेली भूतदया पाहून तो गहिंवरला आणि म्हणाला,

“ पंत, आई नाहीं वाटतं पोरांना ? ”

“ नाहीं रे बाबा, किती लहान जीव आहे बघ तरी ! ”

“ खरंच कीं ! ”

“ त्यांची आई त्यांना सोडून कुठें गेलीय् देव जाणें ! ”

“ आपल्यासारखींच देवमाणसं असल्यावर, त्या आईनें तरी कशाला काळजी करायची ? ”

“ असं बोलूं नये; स्तुती करावी परमेश्वराची... ”

“ होऊं द्या, होऊं द्या तुमचं दूध पाजणं, बसतों मी थोडा वेळ इथें. ”

बारामतीचो बोरं : ७७११५६
निबंध
३१-७-५८

" नको, नको. दूध पाजतील आमची मंडळी. काय निरोप आहे श्रीमंतांचा ? "

" बाजीराव पेशव्यांची स्वारी आली आहे, म्हणून बोलावणें आहे. "

" व्हा पुढें येतोंच मी. "

हुजऱ्या गेला. पंतांनीं मांजरीचीं पिलें रमाबाईच्या हातीं दिलीं. बाराबंदी चढविली. डोक्यावर पगडी ठेवली नि पुणेरी जोडे घातले. रमाबाईनीं चांदीच्या मुठीची काठी हातीं दिल्यावर पंतांनीं एकदां मागें वळून पाहिलें नि ते वाड्याच्या दिशेनें निघाले.

पांडुरंगरावांनीं बाजीरावांबरोबर पंतांची ओळख करून दिली. पाहुण्यासाठीं त्या दिवशीं खास पुराण झालें. बाजीराव खूष होऊन पांडुरंगराव नाईकांस म्हणाले,

" आपल्या पदरीं असलं रत्न असणें हें आपणांस मोठें भूषणास्पद आहे. "

" छे, छे. असें नव्हे. ते आमच्या पदरीं नाहींत. आम्हीच त्यांच्या आश्रयानें आहोंत. " जातांना बाजीरावांनीं पंतांस आपल्या आश्रयास बोलाविलें.

पंत म्हणाले,

**पांडुरंग प्रभु माझा अत्यंत सदय अन्नद हा ।**

" मग आपण येणार नाहीं तर ? "

" कसा येणार ? आमच्या यजमानांस आमचा कंटाळा आला असल्यास तेच आम्हांस दुसरीकडे जावयास सांगतील. "

" यजमानांचें अन्न खाऊन जीभ फारच जड झालेली दिसतेय्. "

" दुसरं घरटं सुबक असलं तरी पक्षी कांहीं आपलं घरटं सोडत नाहीं. नाईकांचा आश्रय आमच्यानें सोडवणार नाहीं. "

" नाईकांनीं हांकलून दिल्यावर......? "

" प्रभुइच्छा. त्यांनीं जा म्हटल्यावर ईश्वर वाट दाखवील तिकडे जाऊं...... "

" आश्रितांना इतका तोरा असेल याची कल्पना नव्हती. "

" हा तोरा आश्रितांचा नाहीं; त्यांच्या सरस्वतीचा आहे. "

" ठीक आहे. "

× × ×

बाजीरावांस मोरोपंतांचा अत्यंत राग आला होता. पुण्यास परतल्यावर त्यांनीं फर्मान काढलें कीं ह्यापुढें वाड्यांत होणाऱ्या कथा–कीर्तनांत, भजन–पुराणांत पंतांची आर्या म्हटली जाऊं नये. त्याप्रमाणें पेशव्यांच्या वाड्यांत पंतांच्या आर्येवर बहिष्कार पडला.

पण इकडे पंतसंगानें सारी बारामती मात्र आर्यामय होऊन गेली होती. मुलाबाळांच्या, लेकीसुनांच्या, म्हाताऱ्याकोताऱ्यांच्या तोंडीं देवळांत, रस्त्यांत, कथा–कीर्तनांत, पाणवठ्यावर, लग्नकार्यांत, जिकडे तिकडे पंतांच्या आर्याच आर्या झाल्या होत्या. पंतांना बारामतीकरांचे व बारामतीकरांना पंतांचें वेड लागून राहिलें होतें. पंतांची प्रेमळ, शांत व भव्य मूर्ति बारामतीकरांपुढें सतत खेळत होती. बारामतींत कोणी पाहुणा आला तर आर्या लिहिणारे पंत इथें राहतात म्हणून पंतांचें घर पाहुण्याला आदरानें दाखविलें जाई.

पंताचें घर गजबजलेलें असे. त्यांचीं तीन मुलं, तीन कन्यका, चुलते, पुतणे, धाकटे भाऊ–भावजया मुलीबाळी, सुना आणि आणखी कितीतरी—पण त्या गजबजलेल्या घरांत पंतांच्या शांततेला कधीं धोका आला नाहीं कीं त्यांच्या लिखाणांत व्यत्यय आला नाहीं. सोवळें नेसून देवघरांत पंतांची तासन् तास रामपूजा चाले. एखादें कपडे घातलेलें रांगतें पोर जरी पंतांना येऊन शिवलें तरी पंतांना राग येत नसे. त्या पोराला उचलण्याकरतां रमाबाई धांवत आली कीं पंतांनीं म्हणावं,

" अग, तुझी कां धांवपळ ? "

" सोवळ्यांत पूजा चाललीय् ना इकडची ? "

" सोवळं ओवळं तुम्हां आम्हांला. ईश्वर त्याच्या पलीकडचा आहे. "

" मला नाहीं आपलं बोलणं समजत. "

**" बहु लाडका भजक शिशु**
**पाठी लागोनि ओंवळा शिवतो "**

" जिला गद्य समजत नाहीं, तिला पद्य काय समजणार आहे! "

" पण मला कथा–कीर्तन करायला लावण्याचा गुरूपदेश तुझाच ना ? पाव आण्याची चूक शोधण्यांत वेळ न घालवितां......तूंच म्हणाली होतीस, आठवतं ? "

" चला. "

पंत जेवावयास बसले कीं धाकट्या रामानें येऊन त्यांना घांस भरवावा. रमाबाईंना हें अगदीं आवडत नसे. त्या मुलांच्या अंगावर कातवायच्या पण पंतांना तो घांस मोठा गोड लागायचा. रमाबाईंना त्यांनीं म्हणावं,

" तुझ्या हातीं अमृत आहे ग. पण तोच घांस मुलानें भरविल्यावर त्याची गोडी काय सांगूं ? "

**" होतो तृप्त पिता जरि बाळानें एक भरविला घांस । ... "**

पहांटेच्या वेळेस पंतांच्या दारावरून गेलें कीं, भूपाळ्या ऐकूं येत. पूजा झाल्यावर आरत्या होत. दुपारच्या वेळीं पदं, अभंग चालत. संध्याकाळीं पाळणे, धावे आणि रात्रीच्या गौळणी. पंतांच्या खोलींत रात्रभर दिवा जळत असे. लिखाण, वाचन, व्यासंग ह्यांनीं पंतांचें घर दरवळून गेलें होतें.

दुपारच्या वेळेस पंतांची वामकुक्षी होई. त्यावेळीं पंतांच्या मुली, सुना, पुतण्या झोपाळ्यावर बसून गाणीं म्हणत. त्यांत बहुतेक पंतांनींच रचलेलीं सतींचीं गाणीं, सीतागीत, सावित्रीगीत, रुक्मिणी-गीत हीं असत. झोका उंच जाई, खालीं येई. रणरणत्या उन्हांत सीतागीत विलीन होई.

**यज्ञासाठीं भूमी । नांगरितां धन्या ।**
**सांपडली कन्या । सीतादेवी, सीतादेवी ॥**

झोंक्यांना वेग आला, गाण्याचा आवाज चढला, कोलाहल

वाढला कीं रमाबाईंनीं स्वयंपाकघरांतून धांवत ओसरीवर यावं नि म्हणावं,

" काल रात्रभर लिहीत होते ते. पडलेत जरा तर झोपूं द्याल कीं नाहीं... ? "

झोपाळ्याचा झोला बंद पडावा. चिमण्या पोरीबाळी उडून कडू-लिंबाच्या सांवलींत जाव्यात. तेथें मग बैठे खेळ चालत. उखाणे पाखाणे, सागरगोटे नाहीं तर भातुकलीचं किंवा घरकुलीचं खेळणं. पंतांची झोप झाली असली म्हणजे कधीं कधीं ते पण कडुलिंबाच्या शीतळ छायेंत जात नि मुलांच्या गाण्यांत ताल धरीत.

**दोन पिंपळ शेजारीं, एक पिंपळ दरबारीं ।**
**दरबारींचा राहूं द्या, माझा खेळ मांडूं द्या ।।**

आपल्या आर्यांनीं बारामतीला वेड लावणारा हा महान् पंडित मुलांत अगदीं पोर झालेला ज्यांनीं पाहिला असेल ते धन्य होत.

विठोबादादा चातुर्मासे, सदाशिव पाध्ये, बाळंभट काजळे, भैराळ-बाबा हे सारे मित्र संध्याकाळीं बाहेर वेशीवर गप्पा मारीत बसत. भक्तिपर किंवा ज्ञानपर विषयांवर मग तासन् तास संवाद चालत. वक्त्याची भूमिका बहुतेक पंतांकडे असे व श्रोत्यांची त्यांच्या मित्रां-कडे. संध्याकाळ झाली, आकाशांत चांदण्या चमकूं लागल्या, घरा-घरांतून दिवे लुकलुकूं लागले, गार वारा वाहूं लागला कीं मग मंडळी खांद्यावर उपरणीं टाकून घराकडे निघत. निरोप घेतांना पंतांनीं एखादी नवी आर्या पोतडींतून बाहेर काढावी.

**स्नेहकरी, हृष्ट करी, तर्पी, रक्षी सदैव संमानी ।**
**पावे सुखे सुखही ते मित्र, असे म्हणति सर्वही ज्ञानी ।।**

पंत आर्या म्हणूं लागले कीं, सारी मित्रमंडळी रस्त्यांतच उभें राहून वाहवा म्हणत व माना डोलवत.

× × ×

दादांचा डोंगऱ्या नांवाचा एक विश्वासू कुत्रा होता. त्याच्यावर दादांचा भारी जीव. पंतांच्या स्नेहीमंडळींत तोहि पारमार्थिक बनला.

आषाढी एकादशीस तो भाकरी खात नसे. एकादशीस नियमानें पंत त्याला मूठभर दाणे चारीत तेव्हां दादांच्या डोळ्यांत पाणी येई.

एक दिवस सर्व मित्रांत रसाळ वाणी कुणाची म्हणून चर्चा झाली. मोरोपंतांशिवाय रसाळपणा कुणाच्याच जिभेस नाहीं असं त्यांच्या साऱ्या मित्रमंडळींनीं जाहीर केलें. मोरोपंत गुदमरून गेले. स्वतःची स्तुति त्यांना अप्रिय झाली. ते एकदम म्हणाले,

" छे हो, माझी वाणी कसली आलीय् रसाळ ? विठोबादादांचीच पाहा ना, " असं म्हणून एक आर्या रचली.

**संत विठोबादादा, लहान थोरांस सांगता वाटे ।**
**टाकुनि खेळ मुलांनीं यावें, पायां पडावया वाटे ॥**

आपला मोठेपणा पंतांनीं आपल्या मित्राला वाहिला आणि तरी पंत मोठे राहिले ते राहिलेच. कारण रामचंद्र बडव्यांनीं त्यांची आर्या उलटविली:

**सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।**
**ओवी ज्ञानेशाची, किंवा आर्या मयूरपंतांची ॥**

तूं मोठा, तुझी वाणी रसाळ, तुझे गुण सुगंधित अशी त्या मित्रांची नित्य झटापट चाले. सारेच समविद्य, समरसिक आणि समज्ञानी होते.

नेहमींप्रमाणें संध्याकाळीं फेरफटका मारून मोरोपंत घरीं आले. संध्या--आरती झाल्यावर रमाबाईनीं पंतांना जेवण वाढलें. आज रमाबाईंना मूक पाहून पंत म्हणाले,

" आज मुक्याचं व्रत आहे वाटतं ? "

तरी रमाबाई बोलल्या नाहींत. हातांत घांस घेऊन पंत म्हणाले,

" मी जेवूं नये असें वाटत असेल तर नको बोलूंस. "

" जेवा तुम्हीं. बोलतें मी. "

" कां रागावलीस ? "

" राग येण्यासारखं झालं म्हणजे रागावतं माणूस. "

" रागाचं कारण ? "

" तुमची आर्या "

" माझी आर्या ? "

" हो. "



" माझ्या आर्यांवर तूं रागावलीस रमा—? "

" आजपर्यंत नव्हतें रागावलें. "

" म्हणूनच म्हणतों. "

" आर्या भार्येची सवत झाली तर काय करायचं ? "

पंत नेत्र विस्फारून हंसूं लागले.

" हंसूं नका. " रमाबाई पुढें सांगूं लागल्या,

" पाण्याला गेलें, तर शेजारच्या पार्वतीबाई म्हणाल्या कीं, पंतांचं भार्येपेक्षां आपल्या आर्येवरच जास्त प्रेम आहे म्हणून... खरं का हें ? "

" खरं. "

" काय खरं ? "

" माझं आर्येवर फार प्रेम आहे म्हणून—"

" मग झालं तर—"

" पण थांब, त्या पार्वतीबाईंना जाऊन सांग कीं, पंतांची भार्या हीच त्यांची प्रथम आर्या आहे म्हणून. कळलं का ? भार्या ही प्रथम आर्या ! "

" स्त्रियांचा सवतीमत्सर जाज्वल्य खरा. " पंत पुटपुटत हात धुवावयास उठले तेव्हां रमा समाधानानें हंसत होती.

आपल्याला जें वैभव प्राप्त झालें आहे, जो मोठेपणा मिळाला आहे, जो मान वांट्याला आला आहे तो केवळ रमेच्या पायगुणां-मुळें असें पंतांना मनापासून वाटे. ते म्हणत,

**मीं जरि अशक्त निर्धन कोपी तरि बहु भली रमा भार्या।**
**ईतें सद्गति दे तूं, हेंचि करि प्रथम योध या कार्या॥**

अशा रीतीचा रमेवर त्यांचा विशेष जीव होता. रमाबाईनीं त्यांच्याजवळ कधीं कांहीं मागितलें नाहीं आणि जें मागितलें तें त्यांना कधीं मिळालें नाहीं असेंहि झालें नाहीं. न मागतां त्यांना सर्व कांहीं मिळत होतें. ती एक तृप्त नि समाधानी अन्नपूर्णा होती.

साळूबाईचं नि सईबाईचं लग्न झालं. नव्यानें जांवई घरीं आले. तेव्हां रमाबाईची कोण धांवपळ. जांवयांना कुठं ठेवूं नि कुठें नको असें रमाबाईंना झालें. जांवयांना आंघोळीला पाणी स्वतः काढून दिलें. नेसायला जरीकांठी धोतरं दिलीं. टेकायला लोड दिले. जेवायला केशर घालून करंज्या केल्या. मोरोपंत लांबून लांबून जांवयांचें सासूकडून चाललेलें कौतुक पाहात होते. रात्रीं रमाबाई शय्यागृहांत आल्यावर पंत म्हणाले,

" म्हटलं, आज फुरसत होते आहे कीं नाहीं ! "

" इश्श ! "

" इश्श करायला काय झालं ? "

" आतां दोन जांवई आले तरी इतकी रसिकता आहे वाटतं अंगीं ? "

" जांवयाचं करण्याचा उत्साह तुझ्या अंगीं नाहीं ? "

" एवढा हेवा नको आहे वाटायला ! "

" हेवा कशाला ? आनंद आहे. माझ्या सासूनें नव्हतें का माझें कौतुक केलें ? "

" झालं तर मग. पण आज कांहीं लिखाण केलंत कीं नाहीं ? "

" ऐक. एक छान आर्या केलीय्. "

**बहुत करुनि तो एका कन्येच्या या जगांत ज्या माता ।**
**त्यांसि गमे स्वतनुपरिस अधिक सुतासूनपरिस जामाता ॥**

खरोखरच जांवयाला पाहातांच सासूला जें प्रेमाचें भरतें येतें तें केवळ सासूपणाचा मान ज्यांच्या वांट्याला येत असेल त्यांनाच ठाऊक ! "

" काय बाई तरी ! आम्हांला काय वाटतें तें इकडे येऊन कुणी सांगितलें. " पंत खदखदून हंसले. समईची वात बारीक होत होत विझली. नि खोलींत काळोख झाला.

सकाळीं पंतांची रामपूजा चालली होती. टाळी वाजवत गोड आवाजांत पंत म्हणत होते,

**ऐक बा रामराया, तुझ्या वंदितो पाया**
**आंवरी आपुली ही विश्वमोहिनी माया ॥**

अंगणांतून एका खेडुताची हांक आली—

" दादा—"

गोऱ्या हाताचं ताक घुसळणं थांबलं नि रमाबाई बाहेर आल्या.

" आई, दादा आहेत नव्हं ! "

" बस जरा. पूजा करून येतील. "

" होऊं द्या पूजा; बसतों मी. "

पूजा आटोपल्यावर पंत बाहेर आले.

" दादा, झाली पूजा ? "

" झाली बाबा. हें घे तीर्थ. "

**भक्त श्रीरामाचा मी हा झाला जगांत बोभाट ॥**

" काय कामगिरी काढली आहेस ? पायाला फडकं कसलं बांधलं आहेस ! "

" नारू झालाय् दादा. म्हणून दव्यासाठीं आलोंय्. "

" नारू ? अरे,

**नवसागर भाजुनियां सेवी तक्रांत पावलीभार ।**
**मुनिदिन किंवा नयदिन होइल मुलिहून नारुसंहार ॥**

" समजलं ना ?...पावलीभार नवसागर भाजून ताकांत घे. दोन-तीन दिवसांत आराम पडेल. कळलं ? जा...ठीक होईल सारं... "

" आपल्या आशीर्वादानं सारं होईल दादा. येऊं मी ? "

" ये. "

तो गेल्यावर पंत बाहेर पडले. नाक्यावर वळतांना " भगवन्त भुकेला भक्तिचा पाहुणा " हे कोणीतरी गुणगुणलेले चरण त्यांच्या कानांवर आले. पन्तांचीं पावलें पुढें गेलीं तरी मन मात्र त्या चरणां-भोंवतीं रेंगाळत राहिलें. पुढें वडाच्या कट्ट्यावर " कितीक येती, कितीक जाती, घिरटीं होते काळाची " ही ओळ एक जण आळ-वून आळवून म्हणत होता आणि बाकीची मंडळी लक्ष देऊन ऐकत होती. पंतांनीं तें पाहिल्यावर आतां मात्र त्यांच्या पावलांनीं पुढें पडण्यास नकार दिला. पंत कट्ट्यावर आले. तेव्हां मंडळी धाड्-धाईनें उभी राहिली. पंतांना सर्वांनीं नमस्कार केला.

" कुणाची ओळ ही मंडळी ? "

" रामजोशांची. "

" इथें आले आहेत ते ? "

" होय. काल रात्रींच एक वग झाला. "

" त्यांना असली पद्यरचना पण येते ? "

" एक दिवस सारें कीर्तन त्यांनीं लावण्यांत केलें. "

" खरं म्हणतां ? "

" होय. उद्यां सारं कीर्तन तुमच्या आर्यांत करणार आहेत. "

" धन्य आहे. "

"आणि तिसऱ्या दिवशीं श्लोकांत व चवथे दिवशीं अभंगांत. "

" कमाल आहे. सरस्वती पाणी भरते आहे त्यांचेकडे. "

" तुम्ही आलांत तर आनंद होईल त्यांना. "

" श्रीहरि, श्रीहरि. "

पंत निघून गेले.

संध्याकाळीं पंत वेशीबाहेर गेले तर रामजोशींचा गांवाबाहेर ठोकलेला तंबू त्यांना दिसला. त्यांचा रेशमी काढण्यांचा झोपाळा, घोडा, कुत्रीं, माकडं, राघू–मैनेचा पिंजरा, नाच्या पोर, बजवय्ये सारें आंत–बाहेर करतांना त्यांनीं पाहिलें. रामजोशी आपल्या चिमा नायकिणीजवळ गप्पा मारीत होते. चिमानें त्यांच्या हातीं विडा देतांना पंतांनीं पाहिलें. तेव्हां त्यांनीं लागलीच तोंड फिरविलें आणि उलट दिशेनें झपाझप पावलें टाकीत ते घराकडे चालूं लागले.

रामजोशी यांनीं हलकट लोकांत मिसळावें, नाच–तमाशे करावेत, अचकट–विचकट व बीभत्स लावण्या रचून म्हणाव्यात, नाच्या-पोरामागें फडावर उभें राहावें, हें मोरोपंतांना पसंत नसे. पंतांच्या चालीरीती जुन्या. आचारविचार सत्त्वशील आणि सात्त्विक. दोघां-च्याहि वागणुकींत व वृत्तींत दक्षिणोतर ध्रुवांचें अंतर होतें. सरस्वतीला ह्यांच्या जिभेवरच बिऱ्हाड थाटावेंसें कां वाटलें हें पंतांना कळेना. पण जोशीबुवांची रसिकता व अस्सल प्रतीची काव्य-शक्ति यांची पंतांच्या मनावर छाप पडली. रामजोशींना भेटल्या-वांचून त्यांच्यानें राहवेना. पण चिमाच्या शेजारीं बसून तिच्या हातून विडा घेतांना त्यांनीं त्यांना पाहिलें आणि अशा स्थितींत त्यांच्या संस्कारक्षम मनाला जोशीबुवांची भेट घेणें परवडलें नाहीं. उलट दिशेनें ते चालूं लागले आपल्या घराकडे.

ओंठाला ओंठ लावल्याशिवाय म्हणजे प वर्ग गाळून पंत निरोष्ठ रामायण रचीत होते. लिखाण रंगांत आलें होतें. तेवढ्यांत दाराची कडी वाजली. रामजोशांकडून कुणी मनुष्य आला आहे म्हणून रमानं सांगितलें तसे पंत बाहेर आले.

" काल आपण वेशीवरूनच परतलांत म्हणून कळलं. "

" हो. आलों होतों सहजच. "

" रामजोशी आपणांला भेटूं इच्छितात. "

" त्यांना सांग पंत रघुनाथचरित लिहिण्याच्या गडबडींत आहेत."

" ठीक आहे. आपला निरोप सांगतों. "

हुजऱ्याचा निरोप आल्यावर रोजचा सोपा 'राम' हा शब्द सोडून पंतांनीं " रघुनाथ " हा शब्द कां वापरला हें चतुर रामजोशांच्या तेव्हांच लक्षांत आलें. पंतांनीं अनेक रामायणं रचलीं होतीं. त्यांपैकीं बहुतेक जोशीबुवांच्या पाहण्यांत आलीं होतीं. आतां प वर्ग गाळून रामायण रचण्यांत पंत गुंतले असावेत हें जोशीबुवांनीं ओळखलें व हुजऱ्यास पुन्हां पंतांकडे पाठविलें.

पंत झोपाळ्यावर बसले होते.

" पुन्हां येण्याची कां तसदी घेतलीत ? "

" जोशीबुवांनीं आपलीं सारीं रामायणं वाचलीं आहेत. "

" बरं. "

" आपलं निरोष्ठ रामायण रचून झालं कीं त्यांनीं बघायला मागितलं आहे. "

" ठीक आहे म्हणावं. झालं म्हणजे पाठवून देईन. "

पंतांना जोशीबुवांच्या कल्पनेची धन्यता वाटली.

वारकरी लोकांना एरवीं जरी कुणी भजनाच्या ठेक्यांत नाचतांना पाहिलें तरी नास्तिक मनुष्यहि आस्तिक व्हावा असा त्याचा प्रभाव आहे. जिलबींत वहाणाऱ्या रसाची नि तुकोबाच्या अभंगांतल्या भक्तिरसाची गोडी सारखीच. भूक–तहान हरपावी, स्त्री–पुरुष भेद

लोपावा, श्रीमंत-गरीब हा भेद नाहींसा व्हावा असे ते अभंग. म्हणणाऱ्याचं तर देहभान नाहींसं व्हावंच पण ऐकणाऱ्याचीहि समाधि लागावी.

ही झाली एरवींची गोष्ट. मग आषाढांतली एकादशी म्हणजे वारकऱ्यांची दिवाळी आहे. पंढरी नगरींत पंढरी कटेवर हात ठेवून राऊळांत विटेवर उभा आहे. अशा वेळेस वारकऱ्यांचें अवसान भरलेल्या नदीच्या पात्रासारखें ओसंडावें ह्यांत नवल नाहीं. त्यावेळेस पंढरींत मंडळी वाळूकणांसारखी गच्च भरली होती. राऊळांत, वाळवंटांत, पुंडलीकाच्या पायरीशीं, चन्द्रभागेवर जेथें पाहाल तेथें वारकरी होते. पावसाची तमा नाहीं; भुकेची पर्वा नाहीं; थंडीची दिक्कत नाहीं. सारे वारकरी भक्तिरसानें वेडावले होते. पंत वारी-करतां त्यावेळेस पंढरपुरांत होते. रामजोशी पण देवदर्शनास आले होते. जोशीबुवांचें कीर्तन होणार म्हणून शेंकडों वारकरी एका जुन्या वाड्यांत जमले होते. जोशीबुवांनीं पंतांस मुद्दाम बोलाविलें. पण 'तमासगिराचें तोंड पाहणें शास्त्रविहित नव्हे' म्हणून पंतांनीं जाण्यास साफ नाकारलें. शेवटीं मध्यस्थाच्या मध्यस्थीला फळ आलें.

पंतांचा आपल्याविषयींचा वाईट ग्रह काढून टाकण्याकरितां जोशीबुवांनीं मुद्दामच हा प्रसंग घडवून आणला होता. जोशी-बुवांच्या कीर्तनाला पंत बसलेले पाहून त्यावेळेस पांडुरंग पण गहिं-वरला असेल. त्यांनीं त्या दिवशीं वैराग्य भक्तिपर लावण्या म्हणून कीर्तनांत श्रोत्यांस तल्लीन करून सोडलें. "वारकरीसंप्रदायांतले अभंग सोडले तर आर्येवांचून कीर्तनाला रंगच नाहीं. काताशिवाय विडा आणि आर्येवांचून कीर्तन रंगणार कसें? घरांत भार्येची जी शोभा तीच कीर्तनांत आर्येची." जोशीबुवांनीं असें प्रतिपादन केलें तेव्हां सारेजण पंतांकडे बघूं लागले. नेहमींप्रमाणें आपल्या स्तुतीनें पंत गुदमरून गेले. जोशीबुवांचा आपल्या वाङ्मयाचा अभ्यास आणि इतर व्यासंग पाहून पंत फार संतुष्ट झाले. कीर्तन संपल्यावर जोशी-बुवांची पाठ थोपटून ते म्हणाले,

" अशी अमृतासारखी मधुर वाणी जनांना विषयकर्दमांत बुड-वून टाकण्यांत कां खर्चितां ? त्या ऐवजीं जर—"

" बोला, त्याऐवजीं काय करूं ? "

" आजच्यासारख्या कीर्तनांनीं त्यांस परमार्थाचा मार्ग दाख-विण्यांत ती वाणी वेंचाल, तर—"

" तर ? "

" तुमच्या नि लोकांच्याहि जन्मांचें सार्थक होईल. "

" पण कीर्तनाची माझी तयारी नाहीं. "

" ही तयारी कांहीं थोडी नाहीं जोशी बुवा. "

" आपल्यासारखें बावनकशी सोनें ... "

" माझ्या अंगीं सोन्याचे गुण असले, तर आपल्या अंगीं परिसाचे आहेत. "

" आपला शब्द कोण अमान्य करणार आहे ? "

" शब्द माझा नाहीं. श्रीरामाचा, विठ्ठलाचा. "

" खरं आहे. "

" भक्तिरसांत एकदां डुंबून बघा तर खरं ..... "

" म्हणजे पुन्हां बाहेर पडणंच नको. "

" खरं आहे. शिवाय ह्या आर्या मी कोणाकरितां रचल्या आहेत ? "

" फार गोड आहेत त्या. "

" आपल्यासारख्यांनीं कीर्तनांत त्या मुक्तहस्तानें वापराव्यात. "

" आजपासून डफ टाकला नि वीणा घेतला. "

" पांडुरंग, पांडुरंग. "

" आयुष्याचा खरा मार्ग मला तुम्हीं दाखविलात. "

" असं कांहींतरी बोलाल तर समोरचा पांडुरंग रागावेल हो ! "

" मी काशीस जाणार आहें. "

" आनंद आहे. अवश्य जाऊन या. मोठं रम्य स्थान आहे. "

" गांवोगांवीं कीर्तन करून परडी फिरविणार आहें. "

" बारामतीस येण्याकरतां माझं पहिलं आमंत्रण घ्या. "

जोशीबुवांनीं त्या दिवशीं गळ्यांत माळ घातली. एक तमासगीर हरदास झाला. डफाची जागा वीणेनं घेतली. त्या दिवशीं एकादशी संतुष्ट झाली. विटेवरचा पांडुरंग गालीं खदखदला. पंढरींत ज्याच्या त्याच्या तोंडीं रामजोशी बोलत होते.

**" नरजन्मामधिं नरा करुनि घे नरनारायण गडी—"**

रामजोशी बारामतीस आले तेव्हां बारामतीकरांनीं देहभान हरपून जोशीबुवांचें स्वागत केलें. पंतांनीं ज्यांचें तोंड पहावयाचें नाकारलें होतें तो आतां त्यांच्या घरचा पाहुणा होता. जोशीबुवांच्या कीर्तनाला खच्चून गर्दी झाली होती. स्वतः मोरोपंत धांवपळ करीत होते. संत मीराबाईचें आख्यान होतें. आपल्या रसाळ वाणीनें तीन तासांत जोशीबुवांनीं बारामतीचें वृंदावन केलें. प्रत्येक पुरुषाला वाटलें याच त्या वृंदावनांतला तो गिरिधर, बांसरी वाजवणारा तो कन्हयालाल तो मीच. प्रत्येक बाई मीराबाई झाली होती. त्या जादूनगरींत रामजोशी गात होते.

मीराके प्रभु गिरिधर नागर............।

शेवटीं " हेंचि दान देगा देवा " झालें.

प्रत्येकजण भानावर आला. रामजोशांनीं आपल्या रसवंतीनें उभें केलेलें गोकुळ लोप पावलें. निरनिराळीं नाणीं आरतीच्या ताटांत पडूं लागलीं. शेवटचा आहेर पंतांचा. पंतांनीं रोख पंचवीस रुपये दिले. आणि आपल्या दारची ताटभर टपोरीं बोरें दिलीं. रामजोशी गहिंवरले. उराउरीं भेट झाली. जन्मजन्मांतरींच्या ओळखी पटल्या.

पंतांच्या घरीं रामनवमीचा मोठा उत्सव झाला. दशमीस पारणें झालें. एकादशीस पंतांना ताप आला..तो द्वादशीस पुष्कळ वाढला. आपली रामरूप होण्याची घटका समीप आली आहे हें पंतांनीं

ओळखलें. सर्व गणगोत जमा झालें. पंतांनीं सर्वांचा निरोप घेतला. रामनाम सुरू झालें. गोठ्यांतील गाय, तुळशीचें वृंदावन, देवघरांतली समई, देव्हाऱ्यांतील रामाची मूर्ति, अंगणांतील सडासारवण, विहिरीजवळचा कडुलिंब नि त्याची शीतल छाया, गंगेचें पाणी, तुळशीच्या मंजिऱ्या, सारें ब्रह्मांड पुढें उभें राहिलें. ह्या सर्वांचें आपल्यावर प्रेम होतें आणि त्याचा आपणांस फार उपयोग झाला म्हणून पंतांनीं कृतज्ञतापूर्वक सर्वांचा उल्लेख केला. पंतांच्या तोंडच्या त्या वेळच्या आर्या वाचून एखाद्या पाषाणालासुद्धां पाझर फुटेल.

शेवटीं चैत्री पौर्णिमेला म्हणजेच हनुमान जन्माच्या दिवशीं पंत रामरूप झाले. मोगरा फुलला होता. जाईजुई डंवरली होती. साई फुलली होती. गुलाब हंसत होता. वाऱ्याची गार झुळूक वहात होती. अशा वेळेस पंत गेले. तेज तेजांत मिळालें. पावित्र्य मांगल्यांत मिसळलें गेलें. ज्या दिवशीं एका खऱ्या रामभक्ताचा जन्म झाला त्याच दिवशीं दुसरा एक रामभक्त रामरूप झाला. रामनाम उठवीत गेला.


रामजोशी आले. पंतांचा अंत त्यांच्या हळव्या मनाला सहन झाला नाहीं. त्यांचा समविद्य, समरसिक आणि एक चांगला स्नेही गेला. पंतांकडे पाहून ते म्हणाले,

**जरी हा मयूर नाहीं तरि लोकांना न दिसती आर्या ॥**

रामजोशांना आतां बारामतीच्या बोरांचा आहेर करणारें कोणीच उरलें नव्हतें.

● ● ●

निर्मळ मनाचा महार–
संत चोखामेळा



आषाढाचा पाऊस वेड्यासारखा कोसळत होता. अंगाला झोंबणारा गार वाराहि सुटला होता. पावसामुळें बाहेर कुठें चिटपांखरूं दिसत नव्हतें. सारं चिडीचाप झालें होतें. आकाशांत कृष्णवर्णाचे मेघ इतस्ततः फिरत होते. सारें आकाश काळवंडून गेलें होतें. मोत्यांचे सर ओघळावेत त्याप्रमाणें घराघरांवरून पाघोळी ओघळत होत्या. मधेंच विजांचें कडाडणें कानीं येई. मधेंच ढगांचा गडगडाट होई. विजांचा कडकडाट आणि ढगांचें गडगडणें थांबलें कीं बेडकांचें ओरडणें कानीं येई, वहात्या पाण्याची खळखळ ऐकूं येई. बगळ्यांचा चीत्कार कानीं पडे, नाहींतर वाजंत्री वाजल्यागत सारखी पावसाची तडतड कानीं आदळे.

अशा मुसळधार पावसांत एक महार कांबळें पांघरून कुणाची तरी वाट पाहात मंगळवेढ्याच्या वेशीपाशीं उभा होता. डोळ्यावर हाताची झांपड धरून व टांचा उंच करून तो कुणाची तरी सारखी वाट पाहात होता. पावसापाण्यांत काकडलेल्या झाडावरच्या पांखरांनाहि तो कुणाची वाट पाहात आहे तें कळत नव्हतें. मुक्या मनानें ती त्याला हंसत होती.

तेवढ्यांत दुरून वाद्यमेळ ऐकूं येऊं लागला. टाळ, मृदुंग एका ठेक्यांत वाजत होते. जसजसा वेळ गेला तसतसा तो आवाज जवळ जवळ येऊं लागला. आकाशांत पताकांचे भार दिसूं लागले. पावसांतून वारकरी मंडळी आषाढी एकादशीकरितां पंढरीची वाटचाल करीत होती. पावसाचा जोर वाढत होता, आणि वारकरी मंडळींनाहि भजन म्हणण्यास चेव आला होता. भक्तांच्या हातांत सहज सांपडूं नये म्हणून देवच त्यांची सत्त्वपरीक्षा पाहात होता जणुं. भक्त मात्र तो अडथळा मानण्यास तयार नव्हते. भक्तीच्या कैफांत त्यांचें देहभान हरपलें होतें. मुखीं नाम घेतांना त्यांना पाऊस अडवीत नव्हता कीं थंडी बाधत नव्हती. सारी ओढ त्या सांवळ्या विठ्ठलाला भेटण्याची! कृष्णवर्णाचे मेघहि त्यांना त्याचे सहोदर वाटत होते. मग त्यांच्यावर राग तरी कसा करायचा!

पंढरी ही त्यांची सुखाची ओवरी झाली होती आणि विठ्ठल

हा साऱ्या शास्त्रांचा गव्हर आणि वेदांचा सार होऊन राहिला होता. अमृताहूनहि देवाचें नांवच त्यांना गोड वाटत होतें. त्याचे चरण पाहून त्यांची भवव्यथा हरून जाणार होती. त्यांना पंढरीचा आनंद हा सुखाचा सोहळा होता. त्यांच्या कथा म्हणजे त्यांना अमृत संजीवनी होती. त्याला पाहून ते मीपणासहित स्वतःला विसरले होते. विठोबाचें दर्शन व्हावें म्हणून त्यांची तहानभूक हरपली होती. त्याचें मुख बघावें म्हणून त्यांच्या डोळ्यांना मात्र भूक लागली होती. गूळ जसा गोड आहे म्हणून म्हणावा लागत नाहीं तसा देव त्यांना शोधावा लागला नाहीं. अंतरींच्या खुणांनीं त्यांनीं पंढरीचा राणा हाच एकमेव देव मानला आणि त्या पंढरीच्या राण्याला भेटायलाच ही वारकरी मंडळी भक्तिरसांत झिंगत चालली होती.

चोखा महार हा त्यांचा कैफ प्रत्येक वेळेस पाहात आला होता. त्यांना पाहून त्याच्या मनांत हुरहूर दाटली होती. कंठ दाटला होता. नेत्र गहिंवरले होते. त्याला वाटलें होतें कीं, ह्यांच्यांत मिसळून जावें. ह्यांच्यासारख्याच टाळ्या पिटाव्यात, ह्यांच्यासारखेच टाळ वाजवावेत, मृदुंग बडवावेत. ह्यांच्यांत मिसळून आपणहि प्रवाही बनावें. ह्यांच्यांतलाच आपणहि एक घटक होऊन राहावें, असें त्याच्या मनांत अनेक वेळां आलें होतें, आणि हा मोह त्यानें कटाक्षानें टाळला होता. कारण तो अनाथ होता, पतित होता, महार होता, अंत्यज होता. केवढें मोठें पाप हें ! केवढा मोठा गुन्हा हा !

पण ह्या वेळेस त्यानें मनाचा हिय्या करून ह्या मंडळींना विचारायचें ठरविलें होतें. ही मंडळी जवळ आली तशी त्यानें ललकारी पुकारलीः

**जोहार मायबाप जोहार । तुमचे महाराचा मी महार**
**बहु भुकेला झालों । तुमच्या उष्ट्यासाठीं आलों ॥**
**बहु केली आस । तुमच्या दासाचा मी दास**
**चोखा म्हणे पाटी । आणली तुमच्या उष्ट्यासाठीं ॥**

काळीज फोडणारी ती ललकारी ऐकून टाळ थांबले. मृदुंग

विसांवले. ह्या पावसांत ' जोहार मायबाप ' करणारा कोण आहे तें सारी मंडळी पाहूं लागली. काळ्या अंगाचा एक निर्मळ महार गळ्यांत माळ घालून, गोपींचंदनाचे टिळे लावून, हातांत टाळ घेऊन, दोन भुवयांमध्यें बुक्का लावून उभा आहे, असें त्यांना दिसलें. पावसांत तो ओलाचिंब झाला होता. तरी त्याच्या मुखावर प्रसन्नता दिसत होती. पावसाचा त्रास त्याला झालेला नव्हता. किंबहुना आपण पावसांत भिजून गेलों आहोंत हेंच तो विसरून गेला होता. वारकरी मंडळींना त्यानें आपली मनीषा बोलून दाखविली.

" मी महार आहें. मला कोणी सांवलीलाहि उभा करीत नाहींत. तुमचा विठ्ठल तरी मला जवळ करील कां हो ? कारण माझी,

**वाणी नाहीं शुद्ध, धड न ये वचन ।**
**धिक्कारती जन सर्व मज**

**अंगसंग कोणी जवळ न बैसे ।**
**चोखा म्हणे ऐसे जीवित माझे—**

मी यातिहीन आहे म्हणून मला ' दूर हो, दूर हो ' करतात, आणि माझा स्पर्श झाला तरी सचैल स्नान करतात.

त्याची ती करुण वाणी ऐकून त्यांतला प्रमुख वारकरी त्याला म्हणाला, " बाबारे, आतां हा मनांतला विकल्प तूं कायमचा दूर कर आणि आमच्याबरोबर वारीला चल. जेथें शूद्रातिशूद्रांना पाय ठेवण्यासहि जागा नव्हती तें भिवरेचें वाळवंट ज्ञानदानें साऱ्यांना मुक्त केलें आहे. तूं तेथें चल आणि प्रत्यक्षच पाहा. "

चोखोबा वारा प्यायलेल्या वासरासारखा बागडूं लागला. सुखानें प्राण जाईल अशी त्याची अवस्था झाली. कित्येक वर्षें उराशीं बाळगलेलें स्वप्न क्षणांत साकार झालें. वाहत्या प्रवाहांत तोहि वाहूं लागला. गात्या भजनांत तोहि दंग होऊन गेला. वारकऱ्यांच्या टाळांच्या आवाजांत त्याच्याहि टाळांचा आवाज मिसळून गेला. त्यांचा नि त्याचा सूर एक झाला. जणूं तें स्पृश्य नव्हते आणि तो

अस्पृश्य नव्हता. हा सारा चमत्कार ज्या ज्ञानदानें घडविला त्याला डोळे भरून केव्हां पाहीन असें त्याला झालें होतें.

पंढरीचा कळस पाहिल्यावर त्याचे डोळे निवले. दुडदुडत्या चालीनें नि धडधडत्या अंतःकरणानें तो भिवरेच्या वाळवंटांत उतरला. एक कोंवळा पोर सांगत होता नि म्हातारे कोतारे जीवाचे कान करून ऐकत होते. नामस्मरण करण्याचा अधिकार सगळ्यांना आहे. तो शूद्र, अतिशूद्र, अंत्यज, स्त्री कोणीहि असो. '**स्त्रियो वैशास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परागतिम्!**' त्याचें भाष्य संपल्यावर धाकटा सोपानहि म्हणाला—

**पृथिवी सोवळी आकाश सोवळें । मन हे सोवळे अभक्तांचे**
**ब्रम्ह हे सोवळें न देखों सोवळें । असों खेळीमेळी इथें जनीं**
**ब्रम्हांड पंढरी सोवळीं हे खरी । तारिले निर्धारीं एका नामे**

चोखोबानें हे विचार कधींच ऐकले नव्हते. हे शब्द त्याला नवे होते. ह्या गोष्टी त्याला अद्भुत होत्या. ह्या शब्दांपासून त्याला धीर मिळाला. त्याला वाटलें कीं, आपण ह्यांच्यांतलेच आहोंत. ज्ञानदानें आणि नामदेवानें त्याला आलिंगन दिलें. पण बडवे मात्र तसें करण्यास तयार नव्हते. देवाजवळ जाऊन त्याचें दर्शन घ्यावें ही चोखोबाची खरी इच्छा! पण बडवे त्याला देवळांत प्रवेश देईनात. शेवटीं महाद्वारांतूनच त्यानें विठ्ठलाची आळवणी सुरू केली. आंत जाऊन देवाचें दर्शन घेतां येत नाहीं म्हणून चोखोबानें देवळासमोर दीपमाळ बांधली व त्यावर त्यानें विठ्ठलाचें दर्शन घेतलें.

कस्तुरीचा मळवट भरलेला आहे, दोन्ही कानांत कुंडलें झळकत आहेत, गळ्यांत वैजयंती माळ रुळत आहे, सर्वांगाला चंदनाची उटी लावलेली आहे, विटेवर उभा राहून कटेवर हात टेवले आहेत, सोनसळा पिवळा पीतांबर नेसला आहे, असा सांवळा विठ्ठल त्यानें पाहिला आणि तो देहभान विसरला. त्याला वाटलें कीं हा आनंदाचा कंद आहे. भक्तांचा कनवाळू आणि भाविकांचा पाळू आहे. जीवाचें जीवन आणि योगियांचें धन आहे. हा सर्व सुखाचें आगर आहे व दीनांचें माहेर आहे.

चोखा म्हणे माझ्या जीवीचा जीवनु ।
पाहतां तनुमनु भुलोनी जाय ॥

न पाहे उंच नीच याती कुळ ।
स्त्री शूद्र चांडाळ सरते पायीं ॥

चोखा म्हणे ऐसा भावाचा भुकेला ।
म्हणोनि स्थिरावला भीमातटीं—

आणि विटेवरती उभा राहून विठो तर खरोखरच सर्वांना पालवीत होता. अंत्यजांना जवळ करायला त्याची ना नव्हतीच. आडकाठी होती ती बडव्यांची ! आणि त्यांच्या आडकाठीमुळेंच चोखा बरोबर भुकेलेला बंका महार, सेना न्हावी, भागु महारीण, ही सर्व मंडळी पण त्या सांवळ्या विठ्ठलाचें दर्शन व्हावें म्हणून महाद्वारांतच तिष्ठत होती.

एखाद दुसरा बडवा ह्या संतांना अडवूं शकला नसता. एखाद-दुसरा बडवा ज्ञानदेवापुढें उभा ठाकला नसता. एखाद दुसऱ्या बडव्याचा हात धरून त्याला बाजूलाहि सारतां आलें असतें. हा विरोध होता तो कोण्या एका बडव्याचा नव्हे, तो एक बडवा हा निमित्त मात्र होता. तो साऱ्या समाजाचा प्रतिनिधी होता. साऱ्या समाजाची शक्ति आणि त्या समाजाच्या भावना त्या बडव्याच्या मागें होत्या. ही शक्ति त्याच्या मागें नसती, ह्या भावना त्याच्या मागें नसत्या तर हे अंत्यज महाद्वारांत ताटकळत उभे राहिले नसते, आणि ह्या शक्तिविरुद्ध बंड पुकारण्याकरतांच ज्ञानदेव उभे राहिले. त्यांनीं भागवत धर्म स्थापन केला आणि गीतेचा अर्थ सोप्या मराठी शब्दांत बहुजन समाजाला समजावून सांगितला. काम नव्यानें सुरू झालें होतें व त्याला हळूहळू यशहि येत होतें. देवळांत नाहीं तरी भिवरेच्या वाळवंटांत स्पृश्य अस्पृश्य मांडीला मांडी लावून कथा कीर्तनांत डुंबत होते.

चोखामेळा जातीनें महार असला तरी त्याची राहणी स्वच्छ असे. धूतवस्त्र कपाळाला गंध; आणि मुखीं पांडुरंगाचें नांव! पंढरपूरच्या बडव्यांनीं त्याचा छळ कांहीं कमी केला नाहीं. परंतु तुकोबानें म्हटल्याप्रमाणें '**दया क्षमा ज्याचे अंगीं**' असा हा चोखोबा होता. तत्कालीन संत मंडळींत चोखोबास मोठाच मान असे.

तुकोबाप्रमाणें पांडुरंगीं दंग झाल्यावर त्याला संसाराची शुद्ध नसे. कारण एके ठिकाणीं त्याची बायको–सोयरा तक्रार करते,

**घरधन्यासी विठोबाचा छंद। आठविती गोविंद रात्रंदिवस**
**संसारीं सुख नाहीं अणुमात्र। सदा अहोरात्र हाय हाय—**

पण कस्तुरीनें मातीलाहि सुगंध यावा त्याप्रमाणें चोखोबाच्या सहवासानें तीहि पुढें पांडुरंगभक्त झाली व "म्हणतसे म्हारी चोखयाची—" अशी अभंगरचना करूं लागली.

अस्पृश्य म्हणून समाजानें ह्यांना दूर केलें. म्हणून चोखामेळ्यानें, त्याच्या स्त्रीनें व मुलानें अनेक वेळां अभंगांतून हें दुःख विठोबाच्या पायरीपुढें प्रगट केलें आहे. महार संताच्या अभंगांतली ही तक्रार इतर संतांच्या अभंगांत दिसत नाहीं. कारण हा भोगवटा त्यांना कधीं भोगायलाच लागला नाहीं.

**देहासी विटाळ म्हणती सकळ। आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध**
**देहाचा विटाळ देहींच निर्धारी। म्हणतसे महारी चोखियाची॥**

अशी सोयराची तक्रार आहे.

आपद्ग्रस्तांनीं आपलें दुःख परमेश्वराला सांगावें ह्या न्यायानें चोखामेळ्यानेंहि आपलें गाऱ्हाणें कधीं सौम्य शब्दांत तर कधीं कडक शब्दांत विठोबापुढें गाइलें. मनांत आलेले सर्व विचार त्यांनीं तळमळीनें अभंगद्वारा प्रगट केले. देवाची भक्ति चालू असतांहि अस्पृश्यतेचा सर्प त्याला मधून मधून दंश करीत होता. कारण कांहीं ठिकाणीं आर्ततेबरोबर चीडहि उफाळून बाहेर येते.

**वेदासी विटाळ शास्त्रासी विटाळ । पुराणें अमंगळ विटाळांची**
**जन्मता विटाळ मरतां विटाळ । चोखा म्हणे विटाळ आदि अंतीं**

परंतु माझा पांडुरंग मात्र या सगळ्याहून आगळा नि वेगळा आहे.

**चोखा म्हणे देव दोहींचा वेगळा ।**
**तोचि म्यां देखिला दृष्टीभरी**
**विटाळाचे अंगीं विटाळाचे फळ ।**
**चोखा तो निर्मळ नाम गाय**

चोखा खरोखरच निर्मळ होता. त्याचें मन निर्मळ होतें, नि त्याची भक्तिहि निर्मळ होती. कारण,

**ऊंस डोंगा परी रस नव्हे डोंगा ।**
**काय भुललासी वरलिया रंगा**

म्हणून तो देवाला विचारतो आणि त्याला काकुळतीनें सांगतो कीं, विठ्ठला, जन्म घेणें माझ्या हातांत नव्हतें रे. तूं जेथें मला जन्माला घातलेंस तेथें मीं जन्म घेतला. पण जातीनें महार असलों तरी माझा भाव मात्र शुद्ध आहे.

**चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा ।**
**काय भुललासी वरलिया रंगा**

आणि चोखोबाचा भाव खरोखरीच शुद्ध आहे. कारण देवाशीं भांडूनहि तो म्हणतो,

**जोडूनिया कर चोखा विनवितो देवा ।**
**बोलिलों उत्तरें परि राग नसावा**

देव रागवेल म्हणून अशा रीतीनें तो बेचैन होतो. कासावीस होतो.

चोखामेळा वयानें वडील म्हणून म्हणा किंवा मुलापेक्षां चार पावसाळे त्यानें जास्त पाहिले म्हणून म्हणा पण त्याच्या रागाला मर्यादा आहे. त्या मानानें कर्ममेळ्याचा राग अनावर झालेला दिसतो. त्याचें तरुण रक्त वाजवीपेक्षां गरम झालेलें दिसतें. त्याच्या अभंगांतल्या रागाला सुरीची धार आल्यासारखी वाटते. कारण '**जन्म गेला उष्टे खातां । लाज नये तुमच्या चित्ता**' असें,

म्हणून तो ईश्वराची लाज काढतो. अस्पृश्यतेची सुरी त्याच्या माने-वरून सतत फिरत असतांना वेदनेनें त्याला तडफडायला होऊं नये असें तरी कसें म्हणावें ? पण व्यक्तिविरुद्ध एखादा झगडा जितका सोपा असतो तितका तो झगडा साऱ्या समाजाशीं किंवा रूढीशीं देणें सोपें नसतें हें कर्ममेळ्यालाहि समजलें असावें. कारण शेवटीं निराश होऊन तो म्हणतो,

'पांडुरंगा तुझी मजा आहे रे. तुझे सोपस्कार चालूच आहेत.

**तुम्हासी आनंद सुखाचा सोहळा ।**
**आमुचे कपाळा वोखटपण—'**

आपल्याला मंदिर-प्रवेश मिळत नाहीं म्हणून महार लोकांनीं महारवाड्यांत भजन सुरू केलें. सारा महारवाडा रात्रीच्या भजनानें दुमदुमून जाऊं लागला. टाळ घुमूं लागले. पखवाज झडूं लागले. देवळांत महारांना प्रवेश नाहीं म्हणून नामरूपानें देव महारवाड्यांत आला. विठ्ठलालाहि गाभाऱ्यांत चैन पडेना. कारण जनीनें म्हटलेंच आहे ' देव भावाचा लंपट सोडूनी आलासे वैकुंठ '

विठ्ठलालाहि चोखोबाशिवाय करमत नव्हतें. प्रथम तो नामरूपानें अव्यक्त स्वरूपांत महारवाड्यांत आला आणि नंतर व्यक्त रूपांत आला. चोख्याचा हात धरून त्यानें त्याला देवळांत नेलें. जातांना त्यानें त्याला आपला रत्नहार, बुका, तुळशी प्रसाद म्हणून दिला. दुसऱ्या दिवशीं तो हार चोखोबांच्या गळ्यांत मिळाला म्हणून बडव्यांनीं त्याची पाठ मऊ केली. आपला काय अपराध घडला हें सरळ मनाच्या चोखोबाला समजेना. तो विठ्ठलाची आळवणी करतो,

"देवाधिदेवा, तूंच आपल्या हातांनीं मला देवळांत नेऊन दर्शन दिलेंस आणि हा रत्नहार मी नको म्हणत असतांहि माझ्या गळ्यांत तूंच घातलास. पण ह्या बडव्यांची समजूत आतां कशी काढूं रे !

**धाव घाली विठो आता चालूं नको मंद—**
**बडवे मज मारिती ऐसा काय तरी अपराध ? "**

मराठी ... ठाणे
८८५८



त्याच वेळेस '**खाईलें जेविलें त्याचा हा उपकार । दुबळीचा भ्रतार मारूं पहासी—**" हा त्यांच्या कांतेनें केलेला रोकडा सवालहि काळीज हालवितो.

विठ्ठल भेटूनहि चोखोबाच्या कर्मातला मार चुकला नाहीं. चोखोबानें देव बाटविला म्हणून त्यास मार खावा लागला ह्याची साक्ष नामदेवानें लिहिलेल्या चोखोबाच्या चरित्रांतहि पाहावयास सांपडते.

पण नंतर मात्र त्याच्या कामांत विठ्ठल हरघडी मदत करूं लागला. ज्यानें सावत्याचा मळा खुरपला, कबीराचे शेले विणले, नाम्याचें घर शाकारिलें, ज्ञानदाची भिंत चालविली, जनीचें दळणकांडण केलें, त्याच श्रीहरीनें चोखोबा दमलाभागला तेव्हां त्याचीं ढोरेंहि ओढलीं.

ह्या संतांना कोणी निंदो वा वंदो पण देव मात्र ह्यांना 'मागेंपुढें उभा सांभाळत' आहे एवढें खरें. कारण '**संतांचा अनुभव संतांचि जाणति । येर ते हांसती अभाविक—**' जेव्हां हे संत अडचणींत सांपडतात तेव्हां देवच त्यांच्यासाठीं धांवून येतो. व्यवहारांत संत जेथें अपुरे पडतात तेथें देव त्यांची उणीव भरून काढण्यास तयार असतो. चोखीयाची स्त्री गर्भवती झाली तेव्हां चोखा सरळ आपल्या बहिणीकडे निघून गेला. ती महारीण कावरी बावरी झाली तेव्हां पांडुरंग निर्मळेचें म्हणजे चोखोबाच्या धाकट्या बहिणीचें रूप घेऊन 'वहिनी' करीत आला. नामदेवानें त्याचें वर्णन इतक्या रसाळपणें केलें आहे कीं क्षणभर नास्तिक मनुष्यहि गहिंवरून जावा. नामदेव म्हणतात, '**चोखोबाची बहिण झाला सारंगधर । वहिनी उघडा द्वार हांक मारी—**' अशा रीतीनें त्याच्या बहिणीच्या रूपांत येऊन त्यानें सोयराचें बाळंतपण केलें. शेवटीं '**तेरावे दिवशीं बाळ तो पाळणा । घालितसे राणा वैकुंठींचा**' अशा रीतीनें यथासांग बारसें झाल्यावर तो श्रीहरी जाण्यास निघाला तेव्हां चोखोबाच्या स्त्रीस नवल वाटलें. नणदेस ती म्हणते, 'इतकी घाई कां ? **येऊं द्या घरधनी । कर-**

**तील बोळवण । काय मी उत्तीर्ण होऊं आतां ?** पण नणदेच्या वेषांतला सारंगधर थांबत नाहीं असें पाहून ती म्हणते, **'थांबा बाई, आतां शिवतें मी चोळी'** तेव्हां **'नलगे-वनमाळी बोलतसे'** आणि तो बहुरूपी निघून जातो. कारण ह्याच वेळेस मेहुणपुऱ्याहून चोखामेळ्याची बहिण निर्मळा त्याला घेऊन वहिनीच्या समाचाराला निघालेली असते. अशा वेळीं तो बहुरूपी पळून जाईल नाहीं तर काय करील ?

भक्तिविजयांत महिपतीनेंहि चोखोबाच्या जीवनांतील एकदोन प्रसंग मोठे रसाळपणें वर्णिले आहेत. बडवे त्याला खिजवतात.

**विठोबासी तुझी असती प्रीती ।**
**तरी राउळांत नेती तुजप्रती ॥**
**दृष्टीसी न देखतां रुक्मिणीपति ।**
**करिसी व्यर्थ भक्ति कासया—?**

तें ऐकून चोखोबा उत्तर करतो,

**ऊंच लक्ष गांवे वासरमणी । ( सूर्य )**
**दुरुनि सांभाळी जैसा कमळिणी ॥**
**तेवी राउळी असोनि चक्रपाणी ।**
**माझा सांभाळ करीतसे ॥**
**कीं दोन लक्ष गांवें निशापती । ( चंद्र )**
**परी त्याची चकोरावरी अत्यंत प्रीती ॥**
**तेवी अनाथनाथ कृपामूर्ती ।**
**माझे रक्षण करीतसे—॥**

चोखोबानें इतकें चोख आणि काव्यमय उत्तर दिल्यावर बडवे काय बोलणार ? कपाळ ! रत्नाहार चोखोबाच्या गळ्यांत पडला ह्या प्रसंगानंतर 'तूं आल्यावर देव तुला जवळ करतो तर तूं पंढरीस येऊं नकोस' म्हणून बडव्यांनीं त्याला सांगितलें. तेव्हां तो म्हणाला, 'कुणींहि स्नान केलें तरी गंगा विटाळत नाहीं. पृथ्वीवर सर्व जमाती नांदत असून ती विटाळत नाहीं किंवा साऱ्यांच्या श्वसनांनीं वायूहि

विटाळत नाहीं तर सोवळ्याओंवळ्याच्या पलीकडे जो आहे तो तुमचा देव तरी कसा विटाळेल? ' उत्तर देतां आलें नाहीं. तेव्हां बडवे चिडले आणि म्हणाले, ' अरे, तूं अंत्यज असून आम्हां श्रेष्ठ ब्राम्हणांना शहाणपण शिकवितोस? साळुंकीनें गरुडाला उड्डाण करायला शिकवावें? शेषापुढें नागमणी भूषण किती दाखविणार? ' चोखोबानें न संपणारा वाद सोडून दिला. आंत जाऊन देवाचें दर्शन घेतां येत नाहीं म्हणून चोखोबा चंद्रभागेच्या कांठावर कडुनिंबाच्या झाडाखालीं बसून विठ्ठलगान गाऊं लागला. महीपती वर्णन करतात.—

**निंबाचिया वृक्षाखालीं ।**
**पडली होती दाट साऊली ॥**
**त्या छायेसी बैसोनि वनमाळी ।**
**चोरट्यासंगे जेवितसे ॥**

त्यावेळीं त्या वनमाळीच्या अंगावर दहीं सांडलें म्हणून चोखा आपल्या बायकोस म्हणाला, " अग, हा पाहुणा म्हणजे प्रत्यक्ष रुक्मिणीवर आहे. तूं दहीं सांडलेंस आणि त्याचा पीतांबर खराब झाला बघ—"

त्यावेळीं वरून कावळाही निंबोळ्या खालीं पाडीत होता. चोखोबा त्याला म्हणतो,

**मग कावळयासी म्हणे ते वेळीं ।**
**निंबोळ्या चाखूनि टाकिसी खालीं ॥**
**येथें बैसले वनमाळी । त्यांच्या अंगासी लागती ।**
**तरी येथोनि उठोनि त्वरीत ।**
**आणिके शाखेवरी बैसे निश्चित ।**
**ऐसे बोलता वैष्णव भक्त ।**

पुजारी मनांत संतापला—

भक्त आपल्या देवाशीं बोलत होता पण समोर असूनहि देव कांहीं पुजाऱ्याला दिसला नाहीं. त्याला वाटलें, चोखोबा आपल्यालाच

कावळा म्हणत आहे म्हणून रागानें, त्यानें चोखोबाच्या श्रीमुखांत दिली. पण देवळांत आल्यावर त्यानें पाहिलें कीं,

विटेवर उभा शार्ङ्गधर ।
त्याचा दह्यानें भरला पीतांबर ॥

आणि विठ्ठलाचा गालहि सुजलेला ! बालकाची पीडा मातेस व्हावी त्याप्रमाणें भक्तांची झालेली क्षळणा देवास जाणवते ती ही अशी ! पुजारी मनोमन समजला व त्यानें चोखोबाचा हात धरून त्यास राऊळांत आणलें.

यातिहीन चोखामेळा । त्यासी भक्तीचा कळवळा ॥
चोखामेळा संत भला । तेणें देव भुलविला ॥
भक्ति असे ज्याची मोठी । त्याला पावे तो संकटीं ॥

नवनीत अंतःकरणाच्या दासी जनीचे हे उद्‌गार किती यथार्थ आहेत ! साऱ्या संतांवर पोटच्या पोराप्रमाणें प्रेम करून जनी म्हणते तसा विठोबा खरोखरच लेकुरवाळा झाला आहे.

देवळांत प्रवेश मिळाला आणि विठ्ठलाला डोळे भरून पाहिलें; तेव्हां चोखा अगदीं थकून गेला होता. तो म्हणतो,

नाहीं मज आशा आणीक कोणाची ।
स्तुति मनावाची करूनी काय ॥
काय हे देतील नाशवंत सारे ।
यांचे या विचारे न पुरे–

म्हातारपणीं तो मधून मधून अभंग करी. त्याची अभंगरचना इतकी प्रासादिक आहे कीं, अनंतभट अभ्यंग हा ब्राह्मण त्याच्या परमार्थावर लुब्ध होऊन त्याचे अभंग उतरून घेण्याचें काम करूं लागला. ह्यावरून चोखामेळ्याला नंतर नंतर अस्पृश्यतेचा त्रास झाला नसावा असें वाटतें.

'**बहुत हिंडलो देश देशांतर । परी मन नाहीं स्थिर झाले कोठें**' ह्यावरून चोखा खूप हिंडला होता असें दिसतें. पण शेवटीं

१४८३५/ निवड ५
११५६ ३१-१-७१



चोखा म्हणतो, '**चोखा म्हणे पाहतां पंढरी भूवैकुंठ । मनाचे हे कष्ट दूर गेले**' शेवटीं ज्ञानदानीं लावलेल्या भागवत धर्माच्या वृक्षाखालींच त्याला आधार मिळाला. भागवत धर्म आणि पंढरपूर हा इतर संतांप्रमाणें त्याचाहि आधारवड ठरला.

मंगळवेढ्यास गांवकुसू घालण्यासाटीं पुष्कळ महार वेठीनें कामाला लाविले होते. त्यांत चोखोबाची पारमार्थिक शक्ति राजसत्तेला कळली नव्हती. काम करतांना चोखोबा थकला नि विश्रांतीसाठीं बसला. आकाशाकडे पाहात ईश्वराची प्रार्थना केली,

**' चोखा म्हणे मज द्यावे पदरांत ।**
**ठेवा माझे चित्त तुमचे पायीं ॥**

**चोखा म्हणे देवा होउनी उदार ।**
**ठेवा कृपाकर माथा माझ्या ॥**

**चोखा म्हणे माझा हाच नवस ।**
**पुरवा सावकाश देवराया ॥**

**चोखा म्हणे आजि वाटते उदास—**

चोखा उदास झाला होता म्हणून त्याचा नवस देवानें सावकाश न पुरवितां ताबडतोब पुरविला. रूप आपणचि नटलें आणि भक्ता-समीप राहिलें. भावबळानें चोखोबानें विठ्ठलाचें अखेरचें दर्शन घेतलें आणि तो देहीं देहभाव विसरून गेला. कुठल्या तरी अद्भुत शक्तीनें ते गांवकुसूं कडाडून कोंसळून पडलें. पुष्कळ महार चिरडून मरण पावले. त्यांत चोखोबाचाहि अंत झाला. नामदेव पंढरपुराहून त्याच्या अस्थि गोळा करण्यास आला. ज्या अस्थींतून 'विठ्ठल, विठ्ठल' असें नांव निघालें त्या चोखोबाच्या अस्थि म्हणून नामदेवानें ओळ-खल्या. चोखोबाच्या अस्थींतहि विठ्ठलप्रेम आहे हें पाहून नामदेवा-सारखा भगवद्भक्तहि गहिंवरला.

नामदेवांनीं आणलेल्या ह्या निर्मळ मनाच्या महाराच्या अस्थि पांडुरंगानें जेव्हां पितांबरांत घेतल्या तेव्हां तो सोहळा पाहाण्यास तो

महार तेथें नव्हता ! त्या अस्थि महाद्वारीं पुरून तेथें समाधी बांधली त्यावेळेस सोयराबाईनें टाहो फोडला.

**आमची तो दशा विपरीत झाली ।**
**कोण आम्हां घाली पोटामध्यें ॥**
**आमचे पालन करील बा कोण ।**
**तुजवीण जाण दुजे आतां ॥**

भावजय आणि नणंद ह्यांचें बहुधा एकमेकींशीं पटत नाहीं पण निर्मळाचें सोयरावर फारच प्रेम दिसतें. कारण भावाच्या मृत्युप्रसंगीं तर ती हजर होतीच पण नंतरहि जिवाच्या कळवळ्यांनीं तिनें सोयराला संभाळलें असलें पाहिजे. कारण त्याशिवाय "**चोखा निर्मळा एकरूप । दरुशने हरे सर्व ताप**" असे उद्गार सोयराच्या तोंडून निघाले नसते.

अशा रीतीनें हा निर्मळ मनाचा हा महार संत, गुरुवार, वैशाख वद्य पंचमी शके १२६० ला समाधिस्थ झाला ! चोखामेळ्याचें संपूर्ण आणि विस्तृत चरित्र आज उपलब्ध नाहीं हें केवढें दुर्दैव आहे. त्याचा अधिकार इतका मोठा होता कीं, त्याच्यानंतर होऊन गेलेल्या एकनाथ, तुकारामांनीं त्याला जी पुष्पांजली वाहिली तीच त्यांच्या शब्दांत वाहून माझी ही पुष्पांजली मी आटोपती घेतों.

**चरणतळींची वीट निर्मळ ।**
**तो हा जाण चोखामेळ**—एकनाथ

**चोखामेळ संत जीवाचे आवडे ।**
**विसर न पडे त्याचा मज**—तुकाराम

आ. क्र. ८०५८
28-349
११५८
31-7-59

REFBK-0009758